


सर्वांना सांगताना आनंद होत आहे की मी मराठी.नेट इंद्रधनुष्य नावाचे ई-मासिक चालू करत आहे. ज्यामध्ये मीमराठी.नेट च्या सदस्यांनी लिहलेले लेख, कविता, प्रवासवर्णन ह्यांचा समावेश केला गेला आहे. ह्या कार्यासाठी ई-मासिकाची जून महिन्याच्या समितीने मोलाची मदत केली, त्या सर्वांचे अनेकानेक आभार.
त्यांची नावे खालीप्रमाणे.

१. रमताराम
२. निर्मयी
३. डॉ. अशोक कुलकर्णी
४. सागर
५. विसुनाना
६. माया
७. पुष्करणी

❖ अनुक्रमणिका पृष्ठ क्रमांक


**1. प्रवासवर्णन**

❖ कोकणसय - शैलजा.......................................................................................... 3
❖ अद्वितीय - विशाल कुलकर्णी................................................................................ 11

**2. ललित लेखन**

❖ बाबा हरवलाय – अनुराग..................................................................................... 34
❖ मात्रा – गणपा............................................................................................... 35
❖ कोहम ! – अवलिया.......................................................................................... 36
❖ शहीद दिवस - पुणेरी ( प्रसन्न कुमार केसकर ) .................................................... 40
❖ मृत्यू आणि मी - पुण्याचे पेशवे.......................................................................... 41
❖ रेजकुत्रे – मधुकर............................................................................................ 44
❖ दहा वर्ष - ३_१४ अदिती................................................................................... 46

**3. खेळविश्व**

❖ सिडनीपुराणम्॥ - मेघवेडा................................................................................. 47

**4. कविता**

❖ सहज सुचल म्हणुन – जयपाल............................................................................. 54
❖ जन्मा येण्या कारण तू.. – प्राजु.......................................................................... 55`
❖ हताश औदुंबर - गंगाधर मुटे.............................................................................. 56

**5. विनोदी**

❖ उ. न. क. अर्थात उपेक्षीत नवरे कमिटी - आदिजोशी............................................. 57

**6. माहितीपर**

❖ मिल्कः एक चळवळ – ऋषिकेश........................................................................... 58

**7. पाककृती**

❖ लेमन केक - स्वाती दिनेश................................................................................. 61
❖ चिकन साते – गणपा........................................................................................ 62

**8. कथा**

❖ स्पर्श – सागर.................................................................................................. 66

# कोकणसय




२००९ च्या वर्षांताला पुन्हा एकदा आजोळी जायचंच असं ठरवून, आणि नशीबाने त्यात काहीही अडथळे न येता, बऱ्याच वर्षांनी कोकणात पोहोचलो. गेल्यावर लगेच लक्षात आलं, की, अरे, कोकणही आता खूप बदललं.... बरचसं ओळखीचं खरं, पण थोडंसं अनोळखीही वाटायला लागलं.....

दर उन्हाळी सुट्ट्यांमध्ये, कोकणात आजोळी - पणजोळी जायची चैन कधीचीच सरली आहे. मे महिन्यातल्या ऐन दुपारी, विहिरीकाठच्या आंब्यांच्या सावलीत बसून, जिवाला शांतवणारा वारा अनुभवत, गप्पांमध्ये रमण्याचे आणि गावाकडच्या मैत्रिणींनी सांगितलेल्या भुतांच्या "लेटेश्ट" कहाण्या आणि थोडयाफार - निरुपद्रवी का होईना - चहाडया ऐकून फिदफिदण्याचे आणि क्वचित प्रसंगी आश्चर्यचकित होण्याचे दिवससुद्धा कुठल्या कुठे उडून गेलेत...... बघता बघता, ज्या मायेच्या माणसांसाठी तिथे जात होतो, त्यांच्या कुशीत बसून आणि शेजारी झोपून कथा कहाण्या ऐकवत होतो आणि ऐकत होतो, हक्काने कौतुकं करुन घेत होतो, ती माणसंही राहिलेली नाहीत. गावी जायचं मुख्य प्रयोजनच सरलेलं आहे.....

मला आठवतं तसं, माझ्या अगदी लहानपणी आजोळी वीजही पोहोचली नव्हती. जसजशी संध्याकाळ होऊ लागे, तसतसा अंधार हलके हलके अवघ्या आसमंतात पसरत जाई. बघता, बघता मिट्ट काळोखामध्ये सभोवताल हरवून जाई. आजी रोज सकाळी कंदीलांच्या काचा घासून पुसून स्वतः स्वच्छ करायची. संध्याकाळी ह्या कंदीलांच्या वाती ती उजळत असे. घराबाहेर काळोखाचं साम्राज्य पसरलेलं असलं तरीही, घरातला कंदीलांचा उजेड मोठा आश्वासक असायचा. त्या मंद, स्निग्ध प्रकाशात आम्ही सर्व पोरंटोरं शुभं करोति कल्याणम् म्हणत असू...पाठोपाठ, देवघरामध्ये अखंड तेवणाऱ्या समयीची तेलवात ठीक आहे ना हे पाहून आणि मग तुळशीपुढे दिवा लावून, आजी सुस्पष्ट आणि हळूवार स्वरा -लयीमध्ये तिची नेहमीची स्तोत्रं म्हणायला सुरुवात करायची....संध्याकाळचं असं चित्र, तर सकाळी भल्या पहाटे उठून देवापुढं, वास्तुपुरुषाच्या गडग्यापुढं आणि पुढील दारी, तुळशीपुढं सडासंमार्जन आणि छोटीशीच का होईना, रांगोळी चितारायचा तिचा नेम कधीच चुकला नाही. देवघरातल्या देवीला आणि शाळीग्रामांना सोवळ्याचा नैवेद्य असे. घरासभोवताल असलेली कुंपणावर फुलणारी जास्वंद, चाफी, तुळशी, एखाद दुसरं गुलाबाचं फूल, काकडयाची फुलं, अबोलीचे, बकुळीचे वळेसर ह्यांनी फुलांची परडी भरायची. भटजी येऊन पूजा करुन जात.

पिंगुळी येथील दत्त पादुका



पूजेनंतर, चहा आणि रव्याचा लाडू खात, दोन चार सुख दुःखाच्या गप्पा करीत, आणि कुलाचार व्यवस्थित सुरु आहे, त्यामुळे देव देवता नेहमीच ह्या घराण्यावर प्रसन्न राहतील ह्याची ग्वाही देऊन संतुष्ट मनाने निघून जात. खरं तर पूजा सुरु असताना आम्हांला ती जवळून पहायची असे, पण, "चला, चला दूर रवात आणि लांबून काय ती पूजा बघा! समाजल्यात? हात जोडल्यात काय की नुसतीच धुमशानां घालतल्यात?" असं मधून मधून सोवळेपणाचा अधिकार गाजवत, पूजा करता करता, मध्येच मंत्रपठण थांबवून भटजीबुवा आम्हांला दटावत! मग, अश्या ह्या सोवळ्यातल्या भटजींना, बिन सोवळ्या व्यक्तीच्या हातचा चहा लाडू कसा काय चालतो, हा आम्हांला पडणारा प्रश्न असे, आणि त्यांच्या ह्या - आमच्या मते असलेल्या - डयांबिसपणावर, आतल्या सरपणाच्या, काळोखी खोलीत उभं राहून आम्ही खुसखुसत असू. वडिलधाऱ्यांना असले प्रश्न विचारण्यात अर्थ नसे. अगोचरपणाबद्द्ल, कदाचित आम्हांलाच धपाटे पडण्याची शक्यता होती! तरीही एकदा आजीला मी हा प्रश्न विचारलाच होता..... मात्र पूजा करताना सोवळं ओवळं पाहणारे हेच भटजीबुवा मात्र जाताना आवर्जून "शाळा शिकतंस मां नीट? आवशीक त्रास नाय मां दिणस? खूप अभ्यास कर, बरां मोठ्ठा हो, हुशार हो, मोठा होवन आपल्या गावाक विसरां नको हां...समाजलय मां.. ?" असं मायाभरल्या आवाजात सांगून डोक्यावर मायेचा हात फिरवून जात.

ह्या वेळी देवघरात उभं राहून देव्हाऱ्यात स्थानापन्न झालेल्या देवीला आणि शाळीग्रामांना हात जोडताना, पुन्हा एकदा हे सगळं आठवलंच. तेह्वा येणारे भटजीबुवा आता नाहीत, पण कोणी दुसरे भटजीबुवा येऊन पूजा करतात. त्यांचं फारसं, पूर्वीइतकं सोवळं नसावं बहुधा. तुळस मात्र अजूनही तशीच बहरते, सकाळच्या कोवळ्या उन्हांत तिच्या बाळमंजिऱ्या देखण्या दिसतात! तुळशीवृंदावनाभोवती चितारलेल्या देवांना पूर्वीप्रमाणेच हात जोडले जातात आणि त्यांच्या पायांशी रसरशीत जास्वंदी वाहिल्या जातात. हे सारं पाहताना, एवढया छोटया गोष्टींसाठी काय भाबडं समाधान वाटून घ्यायचं, हे घोकतानाच, मनात नकळत समाधान रुजलंच. भाबडेपणा तर भाबडेपणा! तो थोडाफार स्वभावात असण्याची चैन अजून परवडते, हेच नशीब!

सगळ्यांसारखंच शिक्षण, कॉलेज, नोकरी वगैरे शहरी जीवन मीही जगते, जे आता हाडीमांसी रुळून गेलं आहे. असं असलं ना, तरीही, मनाच्या कोपऱ्यात कुठेतरी, जराही न बदललेलं असं, फक्त माझं स्वत:चं असं, कोकणच्या आठवणींनी पालवलेलं एक विश्व आहे. ते कधीही बदलत नाही, त्याला चरे जात नाहीत, ते फिकुटत नाही की विस्मरणात जात नाही. कधी ना कधी, ह्या ना त्या निमित्ताने ते मला सामोरं येतच राहतं. कोकण मनातून बाहेर पडायला तयार नाही! ह्या वेळी, काही वर्षांनी पुन्हा कोकणात जाताना हे असं काहीबाही आठवत होतं....

कोकणात शिरताना आंबोलीतून शिरायचं. निपाणीपर्यंत सरळसोट महामार्ग आहे. महामार्गावर जात असता, निपाणीपाशीच, एके ठिकाणी आजऱ्याकडे जायला रस्ता वळतो. तो रस्ता धरायचा. आतापर्य़ंतचा महामार्ग संपून हा छोटासा रस्ता सुरु होतो. मध्ये मध्ये रस्ता खराब आहे, पण जसंजसं आजरा मागे पडायला लागतं, तसतसं कोकणच्या खुणा दिसायला लागतात आणि एका वळणावर समोर येतो तो आंबोलीचा घाट! आंबोली सदासुंदर ठिकाण आहे. कधीही जा, न कंटाळण्याची हमी!

पूर्वेचा वस इथून दिसणारी आंबोली




आंबोली घाटात 'पूर्वेचा वस' म्हणून एक देऊळ आहे, तिथेच देवळाशेजारी २-३ टपऱ्या आहेत, तिथला मस्त उकळलेला चहा आणि बटाटेवडे खाण्याचं भाग्य अजून तुम्हांला लाभलेलं नसेल, तर मी केवळ एवढंच म्हणू शकते, हाय कंबख्त, तूने...!!!! ह्याच टप्प्यावर जरा पुढे जाऊन थोडा वेळ उभं रहायचं आणि आंबोलीच्या दऱ्या डोंगरातून सुसाटणारा भन्नाट, वेगवान वारा अंगावर घ्यायचा! समोर दऱ्याखोऱ्यांडोंगरांचा आणि वनराजीचा एवढा विस्तीर्ण पसारा पसरलेला असतो... वळणावळणाची वाट पुढे पुढे जात असते.

आपलं रांगडं, सभोवताल वेढून राहिलेलं देखणेपण आणि त्यापुढे आपला नगण्यपणा अतिशय सहजपणे निसर्ग एकाच वेळी आपल्या पदरात घालतो..... सलामीलाच असं चहू बाजूंनी कोकण तुम्हांला रोखठोक सामोरं येतं, जसं आहे तसं. फुकाचा बडेजाव नाही, की उसनी आणलेली दिखाऊपणाची ऐट नाही. इथे जे काही आहे ते साधं, सहज आणि म्हणूनच सुंदर आहे. अगदी दगडी पायऱ्यांच्या खाचेमध्ये उमललेलं एखादं रानफूलसुद्धा!

जाईन विचारीत रानफुला...!



आणि आंबोलीचा घाट उतरला की ह्या देवभूमीत प्रवेश होतो. आणि ही भूमीही अशी, की, सहज चित्त जाय तिथे, अवचित सौंदर्यठसा!

ह्या भूमीचं स्वत:चं असं एक, अनेक घटकांनी बनलेलं अजब रसायन आहे. स्वत:चे कायदेकानून आहेत, अंगभूत अशी एक मस्ती आहे. इथल्या विश्वाला स्वत:ची अशी एक लय आहे, तंद्री आहे. इथला निसर्गही आखीव रेखीव नाही, त्याची रुपं ह्या भूमीवर यत्र, तत्र सर्वत्र उधळलेली आहेत. हे विश्वच वेगळं. इथले लाल मातीचे रस्ते, घरांच्या कुंपणांवरल्या जास्वंदी, माडां पोफळ्यांच्या बागा, आमराया, मागील दारी लावलेली, घरची आंब्या फणसांची झाडं, एखाद दुसरी सोनकेळ, तिच्या पानांमधून डोकावणारं सुरेखसं केळफूल, क्वचित बागेच्या एका कोपऱ्यातला निरफणस ह्यां सगळ्यांमधून डोकावणारी कौलारु घरं... सगळं

कसं एखाद्या चित्रात शोभून दिसेल असं.

सावंतवाडीच्या मोती तलावाचे वेगवेगळे मूड्स सावंतवाडीचा मोती तलाव







मोती तलावात कधीकाळी मोती सापडले होते म्हणे,

म्हणून तलावाचं नाव मोती तलाव. & कोकणात टिपलेली काही दृश्ये







यादी इथे संपत मात्र नाही. इथले वाहणारे व्हाळ, पाणंद्या, शांत, सुंदर, साधीच असली तरी शुचिर्भूत वाटणारी देवालयं, दर्शनाला येणाऱ्या प्रत्येकाच्या कथा व्यथा मनापासून ऐकणाऱ्या आणि केलेल्या नवसांना पावणाऱ्या नीटस सजलेल्या देवता, तरंग, देवळांसमोरच्या दीपमाळा, जिवंत झरे पोटात घेऊन कडक उन्हाळ्यातही नितळ पाण्याने झुळझुळणाऱ्या आणि पंचक्रोशीची वा येणाऱ्या जाणाऱ्या कोणाही तहानलेल्याची तहान भागवणाऱ्या बावी, तीमधे सुखाने नांदणारी कासवं आणि बेडूक, आणि त्यांच्या अवतीभोवती ओलसर वातावरणात उगवलेली नेची आणि मखमली शेवाळी, रस्त्यांच्या, शेतांच्या काठाकाठानं पसरत उमललेली लाजाळू, दोन गावांना जोडणारी मेटं, लहान मोठे धबधबे, कोणा भाग्यवंताच्या घरी असलेली गुरं, त्यांच्या गळ्यांतल्या लयीत वाजणाऱ्या घंटा, ओवळीची झाडं, भातशेती, एखाद्या टिकलीएवढ्या छोट्याश्या गावातलं कमळांनी फुललेलं तळं, काजूंच्या झाडांचे कोवळे लसलसते सोनेरी कोंब, रायवळांचे आणि हापूस पायऱ्यांचे गंध, फणस गऱ्यांचे दरवळ, रानमेवा.... काय आणि किती... लहानपणापासून जरी हे सगळं पाहिलेलं असलं तरी अजूनही ह्या वातावरणाची मोहिनी माझ्या मनावरुन उतरायला तयार नाही. इथल्या भुतांखेतांच्या गप्पांसकट हे सगळं माझ्या मनात कायमचं वस्तीला आलेलं आहे.

**वालावलच्या लक्ष्मीनारायण मंदिराशेजारचं निळंशार तळं** **लक्ष्मीनारायण मंदिरासमोरचे दीपस्तंभ**







**पाट - परुळेपैकी पाट गावात असलेलं भगवती मंदिराशेजारचं कमळांनी भरलेलं तळं**



आणि कोकणातल्या समुद्रकिनाऱ्यांबाबत तर किती सांगायचं? तिथल्या निर्मनुष्य किनाऱ्यांवरुन, मऊ रेतीत पावलं रोवत फिरायचं असतं, छोटे खेकडे वाळूवर तिरप्या रेषा काढत धावताना बघायचं, किनाऱ्यालगतच्या माडांची सळसळ अनुभवयाची आणि समुद्राची गाज ऐकताना 'या हो दर्याचा दरारा मोठा' हेही जाणून घ्यायचं... शांत वातावरणात, त्याच वातावरणाचा भाग होऊन कायमचं, निदान काही तास तरी निवांतपणे बसून रहायचा मोह होतो. हळूहळू समुद्र आपला जीव शांतवून, सुखावून टाकतो. काही वेळासाठी का होईना, सगळ्या चिंता, विवंचना विसरुन जायला होतं. पाठीमागे माडाचं बन, समोर अथांग समुद्र आणि माथ्यावर निळं आभाळ. एखादी होडी हे चित्र अधिक सुंदर बनवेल वाटेपर्यंत तीही नजरेला पडते! दर्या त्यादिवशी माझ्यावर बहुधा एकदम मेहेरबान असतो! दिवस सार्थकी लागतो!

निळी निळी सुरेल लाट, रत्नचूर सांडतो, फुटून फेस मोकळा नवीन साज मांडतो.....

भोगवेचा किनारा  वेंगुर्ले खाडी







भोगवेचा किनारा  लांबून दिसणारा भोगवेचा सागरनजारा







अशी ही देवभूमी. इथे पावलांपावलांवर सौंदर्य आहे, वातावरणात जिवंतपणा आहे आणि ह्या सर्वांपेक्षाही लोभस, जिवंत आहेत ती इथली माणसं. बऱ्या वा वाईट, अनुकूल असो की प्रतिकूल असो, कोणत्याही परिस्थितीमध्ये आपलं माणूसपण न सोडता जगणारी, जिभेवर काटे असले तरी पोटात मात्र निव्वळ माया असलेली माणसं. मायेच्या आतल्या उमाळ्याची आणि फक्त ओठांतूनच नाही, तर डोळ्यांतूनही मनापासून हसणारी, आणि तसंच आपले राग लोभही ठामपणे बोलून दाखवणारी माणसं. त्यांच्यापाशी शून्यातून जग निर्माण करण्याची जिद्द आहे. कष्टांना भिऊन एखाद्या कामापासून मागं सरणं त्यांना ठाऊक नाही, आणि दिलेला शब्द पाळण्याची त्यांच्यात दानत आहे. वेळी अवेळी दारात आलेल्या अतिथीचंही इथे मनापासून स्वागत होतं आणि पाहुण्यासारखं घरादारानं वागावं ही अपेक्षा न ठेवता, घरादारासारखं, त्यांच्यापैकीच एक बनून वागलात, तर कोकणातलं घर तुम्हांला कायमचं आपलसं करुन घेतं! कोणाची आर्थिक पत किंवा मोठेपणा ह्यांनी भारावून वा बुजून जाऊन किंवा त्या बाबींच्या अनुषंगाने आपल्याला ह्या व्यक्तीकडून किती फायदा होऊ शकतो, असा हिशेबी विचार करुन तोंडदेखलं का होईना पण आदरार्थी वगैरे वागायची इथे पद्धतच नाही. बाहेरच्या जगात असणारा एखादा शेठ वगैरे, त्याच्या गावात, शेजारी पाजारी आणि पंचक्रोशीत प्रथमपुरुषी एकवचनी संबोधनानेच ओळखला जातो, अन त्यालाही त्यात काही वावगं वाटत नाही. इथलं कष्टमय आयुष्य हसतमुखानं उपसताना, परिस्थितीच्या शाळेत, अनेक अडचणींचा सामना करत इथल्या जुन्या पिढ्यांनी आयुष्यविषयक आडाखे, मतं स्वत: तयार केलेली आहेत आणि अनुभवांतून शहाणपण शिकलेलं आहे. भलेही त्यांच्याकडे उच्च शिक्षण नसेल - बऱ्याचजणांनी तर शाळेनंतर महाविद्यालयाची पायरीही चढलेली नसेल, पण त्यांचं शहाणपण कोणाहूनही कमी नाही.

हिरवे हिरवे गार गालिचे!  कोकणची माणसं साधीभोळी, काळजात त्यांच्या भरली शहाळी!





**शेतचित्रं**



आता नवी पिढी बाहेरच्या जगातले बदल पाहून त्यानुसार बदलते आहे आणि आपापल्या गावांमध्येही सुबत्ता आणू पहाते आहे, जागरुक बनते आहे, शिकते आहे, त्याचंही कौतुकच वाटत. एके काळी बहुतांशी अठरा विश्वे दारिद्र्य नांदणाऱ्या ह्या कोकणात आता बऱ्यापैकी सुबत्ता नांदताना दिसते. कोकणातलं दारिद्र्य असंच दूर होत रहावं, तिथे चारी ठाव सुबत्ता नांदावी, मात्र, ह्या कोकण प्रांताची कोकणी ओळख मात्र अजिबात हरवू नये ही इच्छा मनात धरून देवघरातल्या देवाला हात जोडत त्याचा आणि आजोळचा निरोप घेतला.

मावळतीला गर्द शेंदरी रंग पसरले, जसे कुणाचे जन्मभराचे भान विसरले...



वेळ थोडा राहिलेला, सूर सारे संपले, या असीमाला तरीही पाहिजे ना मापले?
वाहत्या पाण्यातूनी गुंफीत जावे साखळी, एक नाते मी तसे शोधीत आहे आपले!



निघायच्या आदल्या दिवशी लाडक्या तळ्यावर जाऊन खूप वेळ बसले. लहानपणी खेळायचो तो पाण्यात चपट्या टिकऱ्या फेकण्याचा खेळ मनसोक्त खेळून घेतला. बाजूला तीन, चार छोटी मुलं आपलं हसू लपवत कुजबुजत होती, त्यांनाही खेळात सामील करुन घेतलं आणि मग एकदमच धमाल आली खेळायला! सूर्यास्त झाला, रात्र होत आली, तसं शेवटी तळ्यावरुन उठून घरची वाट पकडली. आठवड्याची सुट्टी संपल्याचं प्रकर्षाने जाणवलं....

दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा एकदा शहराकडे गाडी दामटली.

समाप्त.
शैलजा

# अद्वितीय

"पुत्रा, गुन्हाच तसा घडला होता तुझ्याकडून. भलेही नारदमुनींनी मुद्दाम कळ लावून हे घडवून आणलय. पण चुकून का होइना तू श्रीकृष्णमहाराजांचा गुन्हा केलास आणि त्यांच्या तोंडून शापवाणी निघाली. आणि तूला कुष्ठरोग झाला."

"अगदी योग्य बोललीस माते, पण माझं निर्दोष असणं सिद्ध झाल्यावर तातांनीच त्यावर उ:शाप म्हणून सुर्यपुजेचा उपाय सांगितला. सुर्यदेव जे सर्व त्वचाविकारांचे नाशक मानले जातात त्यांची साधना."

"आणि गेल्या बारा वर्षाच्या अथक साधनेनंतर आज तू त्या महाभयंकर व्याधीतून मुक्त झालास. आता पुढे काय करायचे ठरवले आहेत. सुर्यपुजा अशीच चालू ठेवणार?"

"माते, गेली बारा वर्षे चंद्रभागेच्या तीरी मित्रवनातील या पवित्र जागी सुर्यदेवांची उपासना करत आलोय. त्यांच्या कृपेने या व्याधीतून मुक्त झालोय. त्या सुर्यदेवांचं भव्य मंदीर या ठिकाणी उभे करायची माझी इच्छा आहे."

"अगदी माझ्या मनातले बोललास पुत्रा, पण आधी या आनंदाच्या क्षणी श्रीकृष्ण महाराजांचे दर्शन घेवून त्यांचे आशीर्वाद घेवूया. या मंदीर उभारणीबद्दलही त्यांचे मार्गदर्शन घेणे आवश्यकच आहे, नाही?"

"चल माते, आधी तातांचे आशीर्वाद घेवून त्यांच्यासमोर ही मनीषा व्यक्त करू."

आणि श्रीकृष्णपुत्र सांब आपली माता जांबुवंतीसह पित्याच्या महालाकडे, त्या सर्व शक्तिमान, पुर्ण पुरूषाच्या, देवोत्तमाच्या, श्रीकृष्णाच्या दर्शनासाठी निघाला.......!

**********

नारदाच्या खोडकर, कळी लावण्याच्या स्वभावामुळे एकदा श्रीकृष्णपुत्र सांब याला आपल्या पित्याचे कोपभाजन व्हावे लागले. सांबाने आपल्या स्वभावानुसार एकदा नारदाची खोडी काढली. त्याला धडा शिकवण्यासाठी म्हणून नारदमुनी त्याला एका ठिकाणी घेवून गेले. नेमके ती जागा श्रीकृष्णाच्या बायकांची स्नान करण्याची जागा होती. सांबाला तिथे सोडून नारद त्याच्या नकळत कृष्णाला तिथे घेवून आले. आपल्या बायकांच्या स्नानाच्या ठिकाणी सांबाला पाहून संतप्त झालेल्या कृष्णाने त्यास कुष्ठरोग होइल असा शाप दिला. नंतर सांबाने आपले निर्दोषत्व सिद्ध केले पण एकदा दिलेला शाप परत घेणे शक्य नव्हते. त्यामुळे श्रीकृष्णांनी त्यास सुर्यदेवांची आराधना करण्यास सुचवले. त्यानुसार बारा वर्षे सुर्याची आराधना केल्यावर सांबास आपले आरोग्य आणि सौंदर्य पुनश्च प्राप्त झाले.

(दंतकथा संदर्भ : श्री सांब पुराण)

********************************************************************************
*******

ही आणि अशा अनेक दंतकथा पुराणात वाचायला मिळतात. सांबपुराणानुसार श्रीकृष्णपुत्र सांबाने आपल्या कृतज्ञतेचे प्रतिक म्हणून त्याकाळी चंद्रभागेच्या तीरी (सद्ध्याची चिनाब त्याकाळी चंद्रभागा या नामे ओळखली जात असे म्हणे) पुढे सांबाच्या नंतर मुळ-सांबपुर म्हणुन ओळखल्या गेलेल्या नगरी (सद्ध्याचे पाकिस्तानमधील मुलतान) एक विशाल सुर्यमंदीर बांधले. साधारण सातव्या शतकात भारताला भेट दिलेल्या चिनी प्रवासी ह्यु-एन त्संग याच्या लिखाणात मुलतानच्या या पुरातन सुर्यमंदीराचे उल्लेख येतात. नंतर हे मंदीर जिथे सांबाने प्रत्यक्ष सुर्याची आराधना केली होती तिथे हलवण्यात आले. यामागे देखील एक दंतकथा आपल्या पुराणात तसेच कपिल संहितेत आढळते. उडीया भाषेतील मदला पंजी या स्थानिक ग्रंथातदेखील अशाच प्रकारची दंतकथा सापडते.

आपली तपश्चर्या पुर्ण केल्यावर सांबाने चंद्रभागेत ( हे चंद्रभागा म्हणजे एक छोटेसे सरोवर आहे कोणार्कपासुन काही किमी अंतरावर) स्नान करण्यासाठी म्हणून एक डुबकी मारली, तेव्हा त्याला पाण्यात एक मुर्ती सापडली. जी विश्वकर्म्याने घडवलेली सुर्याची मुर्ती होती. त्या मुर्तीची सांबाने तिथुन जवळच असलेल्या मित्रवनात एक छोटेसे मंदीर बांधून तिथे प्रतिष्ठापना केली. बहुदा आताचे कोणार्क आणि त्यावेळचे मित्रवन या जागा एकच असाव्यात, म्हणूनच सांबाने सांबपूरात बांधलेले भव्य सुर्यमंदीर पुन्हा इथे स्थलांतरीत करण्यात आले.

मला वाटतं आतापर्यंत तुमच्या लक्षात आले असेलच.... मी कोनार्कच्या जगदविख्यात सुर्यमंदीराबद्दल बोलतोय.....!



दुसऱ्या एका दंतकथेनुसार पुढे कधीतरी केसरी राजवंशाच्या पुरंदरकेसरी नामक राजाने कोनार्क देवाचे एक मंदीर उभे केले. कोनार्क हा शब्द बहुदा कोना ( Corner : भारताच्या एका कोपऱ्यातच ओरिसातील हे जगदविख्यात सुर्यमंदीर वसलेले आहे) आणि अर्क (सुर्य) यांच्या संधीतून निर्माण झाला असावा. त्याला त्याकाळी कोनादित्य या नावाने संबोधले जात असे. त्यानंतर तिथे गंगा राजवंशाच्या राजवटीत राजा नरसिंहदेव (१२३८-६४) याने या मंदीरासमोरच दुसरे एक भव्य मंदीर उभे

केले. राजा नरसिंहदेवाचा पिता राजा अनंगभिम याने पुरीच्या जगन्नाथासमोर या मंदीराचे एका भव्य मंदीरात रुपांतर करण्याचे कबुल केले होते. हे मंदीर एका रथाच्या आकाराचे होते. मध्यभागी अतिषय देखणे असे भव्य मंदीर (रथ) ज्याला सात अश्व आणि चक्रांच्या (चाकांच्या) १२ जोड्या म्हणजे रथाला अतिशय सुक्ष्म आणि सुंदर कोरीवकाम केलेली एकुण २४ चाके आहेत.

इथे आणखी एक दंतकथा सांगण्याचा मोह आवरत नाही. राजा नरसिंहदेवाने जेव्हा हे भव्य मंदीर बांधायला घेतले, तेव्हा सुरूवातीला या मंदीराच्या बांधकामासाठे एकुण १२०० कामगार तत्कालीन विख्यात वास्तुविद 'बिसू महाराणा' याच्या हाताखाली राबत होते. मंदीर पुर्ण करायला त्यांना अतिशय कष्टाची अशी १२ वर्षे लागली. पण मंदीर काही पुर्ण होत नव्हते. सगळे बांधकाम कळसापाशी येवून अडकले होते. एवढा विस्तीर्ण कळस पेलायची खालच्या सांगाड्याची ताकत नव्हती. त्यामुळे कळस काही पुर्ण होत नव्हता. नेमका त्यावेळी बिसू महाराणाचा १२ वर्षाचा मुलगा 'धर्मपद' मंदीराचे बांधकाम पाहण्यास आला. आणि पित्याची अडचण पाहून कळस पुरा करण्याचे काम त्याने स्वतःच्या डोक्यावर घेतले. कळसाचा शेवटचा दगड त्याने स्वतःच्या हाताने बसवला, आणि कळस पुर्ण झाला. पण हा शेवटचा दगड काही वेगळ्याच प्रकारचा होता. तो नक्की दगडच होता की......?

पण त्यानंतर काही दिवसातच समुद्रकिनारी धर्मपदाचे शव सापडले. दंतकथा असे सांगते की धर्मपदाने आपल्या योगशक्तीच्या जोरावर आपल्या शरीरातील सर्व उर्जा त्या दगडात ओतून त्याचे एका महा - शक्तिशाली चुंबकात रुपांतर केले होते. त्यामुळे काही दिवसातच त्याचा मृत्यू झाला. पण त्याची पुर्ण ज्ञाती त्याच्या या त्यागामुळे राजाच्या कोपाला बळी जाण्यापासून वाचली.....

ऐकावे ते नवलच.....

पुराणातील अनेक दंतकथा, किवंदंतीने सजलेले तत्कालीन शिल्पकलेचा विलक्षण नमुना असलेले हे सुर्यमंदीर केवळ अद्वितीयच आहे. काही दिवसांपुर्वी ऑफीसच्या काही कामानिमीत्त ओरिसाभेटीचा योग आला. त्या संदर्भातले काही फोटो इथे टाकले होते. काम आटोपल्यावर सुदैवाने लागुनच आलेला एक सुटीचा दिवस पकडून मी भटकंतीला निघालो. हॉटेलहून बाहेर पडलो तेव्हा प्रवासाची काहीच रुपरेषा ठरवली नव्हती. मिळेल ती बस पकडून आधी जगन्नाथ पुरीला जायचे आणि जगन्नाथाचे दर्शन घेतल्यावर वेळ मिळालाच तर आजुबाजुला जवळपास असलेली काही ठिकाणे पाहायची असे ठरवले होते. त्याप्रमाणे एक खाजगी बस पकडून पूरीला पोहोचलो. सुदैवाने जगन्नाथाचे अगदी व्यवस्थीत दर्शन झाले. भोग वगैरे चढवून बाहेर आलो. मंदीरात, आत कॅमेरा नेण्याची परवानगी नसल्याने बाहेर आल्यावर बाहेरूनच मंदीराचे काही फोटो काढले. मंदीराच्या समोरच एक कातीव, भव्य असा स्तंभ उभा आहे. त्याला अरूण स्तंभ असे म्हणतात. तिथल्या एका पुजाऱ्याने सांगितलेल्या माहितीवरून हा स्तंभ आधी कोनार्कच्या सुर्यमंदीरापाशी होता. अठराव्या शतकात मराठ्यांनी आपल्या एका ओरीसास्वारी दरम्यान हा क्लोराईटने बनलेला अरुणस्तंभ कोनार्कहून आणून पुरीला जगन्नाथाच्या दारात उभा केला म्हणे. असे म्हणतात की या स्तंभावरील अरुणाची मुर्ती अगदी श्री जगन्नाथाच्या मंदीरातील मुळ मुर्तीच्या पातळीत येते. ...

(जगन्नाथपुरी : श्रींचे मंदीर)




तिथून बाहेर पडल्यावर थेट पुरीच्या समुद्रकिनाऱ्यावर गेलो. सुटीचा दिवस असल्याने प्रचंड गर्दी होती. भर दुपारचे १२.३० वाजलेले. तिथे चौकशी केली असता कळले की कोनार्क इथुन अवघ्या ४० किमीवर आहे. बस्स, आता दुसरा काही विचार करण्याचा प्रश्नच येत नव्हता.

**(पुरीचा समुद्र किनारा)**





बस स्टँडकडे येताना भर रस्त्यावर प्रेमाने गप्पा गोष्टी करणारे हे दोन मित्र भेटले आणि त्यांचे ते प्रेम पाहून मग मला कॅमेरा हातात घेण्यावाचुन गत्यंतरच राहीले नाही. :-P



बसस्टँडहून कोनार्कला जाणारी बस लागली आणि मीही लटकलो...... ! बसला... ;-)



पुरी ते कोणार्क हा प्रवास बऱ्यापैकी हिरव्यागार भागातून होतो. रस्त्याच्या दोन्ही बाजुला येणारी छोटी छोटी गावे, माडाच्या झाडांच्या दाटीत वसलेली घरे वेड लावतात. हा पुर्ण पटाच हिरव्यागार निसर्गाने भारलेला आहे. मध्येच एका ठिकाणी कुठलीतरी एक छोटीशी नदी लागली आणि मी कॅमेरा सरसावला.





साधारण ४० मिनीटांनी बसायला जागा मिळाली. मी खुशीत येवून सीटवर टेकलो आणि हुश्श.....तेवढ्यात बस थांबली आणि बसवाहक ओरडला (त्याला बोंबलणे हा शब्द जास्त समर्पक ठरावा)......

"उतरो भाय्...कोSSSSSSSSणार...... !

शेवटचा 'क' त्याने खाल्ला की बसमधल्या कोलाहलाने कुणास ठाऊक? पण पुन्हा धक्के खात एकदाचा कोनार्कच्या त्या बसथांब्यावर उतरलो. तसे लगेच तिथले गाईडस माझ्याकडे धावले.......

"यार पहिली बार नही आ रहा हू मै...गाईडकी जरुरत नही है!" या परिस्थितीतला माझा पेटंट डायलॉग.

मेल्यावर उकळत्या तेलाच्या कढईकडे नेणाऱ्या यमदुतालादेखील बहुदा हेच ऐकवीन मी.....! :-P (चमकलात? थेट स्वतःलाच नरकात नेवून उभे केले हे पाहील्यावर. वो क्या है ना भाय, अपन अपने दोस्तलोगको भोत चाहता है भिडू..जिधर तुमे लोगा रहेंगे उधरीच अपुनभी आयेगा, बोले तो ...... Innocent ) तसे त्यांनी स्थानिक भाषेत बहुदा दोन चार शिव्या हासडून माझा नाद सोडला. तरी एकजण मंदीरापर्यंत माझ्या पाठीमागे होताच. शेवटी वैतागून मीच त्याला विचारले सौ रुपये देगा क्या, तो मै तेरेको साथमें लेताय गाईड करके.... तो बिचारा खालमानेने निघून गेला. :अओ: (सज्जन होता बिचारा, खरेतर मी भांडायची आणि तशीच वेळ पडली तर बचावासाठी पलायनाची तयारीही ठेवली होती. ;-) )

मंदीरापाशी आल्यावर कळाले की सुर्यमंदीर आणि तेथील पुराण वस्तु खात्याचे वस्तु संग्रहालय यांचे कॉमन तिकीट एकाच ठिकाणी मिळते. मी २० रुपये मोजून तिकीट घेतले. मंदीरदर्शनाची फी १० रुपये आणि संग्रहालयाची १० रुपये...आणि मंदीराकडे निघालो. समोरून मंदीराचे प्रथमदर्शन झाले ते या स्वरुपात. यावरुनच मंदीराच्या भव्य स्वरुपाची कल्पना येते.



तिकीट खिडकीपाशीच मंदीराबद्दल माहिती देणारे दोन फलक आढळले.




तिथे असलेल्या गार्डकडुन तिकीट पंच करुन घेतले आणि आत शिरलो.

या भव्य वास्तुच्या प्रांगणात आपले स्वागत होते.... ते भोग मंडपाच्या दर्शनाने. आता भोग मंडपाचे फक्त अतिषय सुंदर कोरीव काम असलेले उभे खांब आणि पाया शिल्लक आहेत, पण जे काही आहे, तेही वेड लावायला पुरेसे आहे. परमेश्वराच्या भोजनासाठी म्हणुन हा भोग मंडप (भोग : नैवेद्य) उभारण्यात आला होता. अतिशय सुंदर, आणि बारीक कलाकुसर असलेला भोग मंडप त्यावेळी आपल्या परमोच्च अवस्थेत असलेल्या ओरीसाच्या अत्युच्च शिल्पकलेची साक्ष देत आजही उभा आहे. पुर्णपणे अतिषय बारीक नक्षीकाम केलेल्या एका विस्तीर्ण चौथर्‍यावर सोळा संपुर्णपणे अतिषय सुरेख नक्षीकाम केलेल्या खांबाच्या आधाराने भोग मंडपाचे हे शिल्प उभे होते. आता फक्त चौथरा आणि खांबच शिल्लक आहेत. पण जे काही आहे ते निर्विवादपणे भव्य आणि सुंदर आहे.

(भोग मंडप)











भोग मंडपातून बाहेर पडले की समोर येतो तो सुर्यमंदीराचा दर्शनी भाग. त्याकडे आपण शेवटी येवू....

सुर्यमंदीराच्या उजव्या बाजुला एक पुरातन वटवृक्ष आपल्या स्वागताला हजर असतो..



मी मंदीराच्या प्रदक्षिणेला सुरूवात केली.


डाव्या बाजुला दर्शनी बाजूला सात अश्वांपैकी आता फक्त दोन शिल्लक आहेत, तेही भग्नावस्थेत. मी भारावल्यासारखा मंदीराच्या चारीबाजुनी प्रदक्षिणा घालायला सुरुवात केली. नृत्यकला, यक्ष किन्नर यांच्याबरोबरच कामशास्त्रातील विविध श्रुंगारीक आसने अशा विभीन्न प्रकारांनी नटलेली ती नितांत सुंदर शिल्पे बघताना डोळे एका जागेवर ठरत नव्हते. हे एवढं भव्य, विशाल आणि तरीही इतकं सुक्ष्म नक्षीकाम केलेलं महाशिल्प उभे करायला किती वेळ लागला असेल्..किती जण त्यासाठी राबले असतील? त्या पुरंदरकेसरी ने किंवा नरसिंहदेवाने त्यांच्या प्रजेसाठी काय केले माहीत नाही, पण हे अद्वितीय मंदीर उभारून अखंड भारताला मात्र एक खुप मोठा सन्मान प्राप्त करून दिला आहे एवढे नक्की.

(प्रदक्षिणा मार्ग )















दोन तीन प्रदक्षिणा घालून झाल्यावर जाणवले की ...

अरेच्चा, अजुन आपल्याला खुप काही पाहायचे आहे. इथेच गुंतून राहीलो तर कसे व्हायचे? म्हणून मी प्रदक्षिणेचा नाद सोडला आणि मंदीराच्या प्रांगणात असलेल्या इतर शिल्पांकडे वळलो.

मंदीराच्या डाव्या बाजुला एक छोटेसे सद्ध्या भग्नावस्थेत असलेले शिल्प आहे. याला नटमंदीर या नावाने ओळखले जाते. उपलब्ध माहितीनुसार या मंदीरात नर्तकी (देवदासी ? ) देवासमोर नृत्य करायच्या. भग्नावस्थेत असलेले हे छोटेसेच नटमंदीरदेखील अंगा खांद्यावर आपल्या तत्कालीन वैभवाच्या अनेक समृद्ध खुणा बाळगून होते.

(नटमंदीर)



पुर्वी केसरी वंशातील श्री पुरंदरकेसरी याने बांधलेल्या शिल्पात एक श्रीकृष्णाचे (जगमोहन) मंदीरही होते. बहुदा सुर्यमंदीराची अजस्त्र वास्तू ढासळायला (कळस) सुरूवात झाल्यावर ते बंद करण्यात आले असावे. पण त्या मंदीरातील 'जगमोहना'चे देखणे शिल्प मात्र आजही नटमंदीरात प्रतिष्ठापीत करून जतन करून ठेवले आहे.

(जगमोहन)



जगमोहनाचे (श्रीकृष्णाचे) दर्शन घेवून बाहेर पडलो आणि अहो आश्चर्यम इथे मला अचानक आपली माणसं भेटली.

"वो ताई, हिकडं या. येक फोटू काढू या समदे मिळून....!"

एक पांढरा शुभ्र सदरा आणि पायजामा घातलेले, गांधीबाबांचे समर्थक (?) (त्यांना गांधीबाबांना समर्थन करण्यासाठी गांधी टोपीची गरज नव्हती, डोइवर मस्त पुर्णचंद्र चमकत होता, भर माध्यान्हसमयी कुणातरी ताईंना हाका मारत होते.

त्या परक्या राज्यात मराठी कानावर पडलं आणि माझी अवस्था 'देता किती घेशील दो कराने' अशी झाली. त्यांच्या हातवाऱ्यांच्या रोखाने पाहीलं आणि अजुनच चाट पडलो. ते एका विदेशी तरुणीला बोलावत होते. नंतर तिचाशी बोलताना कळले की ती जपानी असुन, तिचे नाव 'एमिको' आहे, ज्याचा जॅपनीजमध्ये अर्थ होतो 'हसरं मुल' किंवा ' सुंदर मुल' ! दोन्ही नावं तिला अगदी सुट होत होती.

तर या काकांचा, माफ करा काकांची ओळख राहीलीच.

चार काकालोक (अगदी सदरा, पायजामा आणि मुंडासं किंवा गांधी टोपी अशा पारंपारीक महाराष्ट्रीय वेशातले) आणि चक्क नऊवारीतल्या सहा मावश्या (बहुतेक सगळेच ४५-५० च्या पुढचे) असा हा सुरेख ग्रुप खास नाशकाजवळच्या मालेगाववरून थेट ओरीसात जगन्नाथाच्या दर्शनासाठी आणि आजुबाजुचा हा भाग पाहण्यासाठी आला होता. विशेष म्हणजे एवढ्या लांब आलोय, तर काही जामानिमा करून नटून थटून वगैरे न येता अगदी घरगूती पेहरावात ही सगळी मंडळी आली होती. सर्वच जण सामान्य घरातले आहेत हे त्यांच्या पेहरावावरूनच लक्षात येत होते. पण प्रवासाची त्यांची या वयातली ओढ पाहून खुप छान वाटले. विशेष म्हणजे ती जपानी तरूणी 'एमिको' भाषेचा अडसर बाजुला ठेवून त्यांच्यात अगदी सहज मिसळून गेली होती.

कसं असतं ना, तुमची मनं शुद्ध असली, मनापासुन नाती जोडण्याची तयारी असली की वय, शिक्षण, भाषा, रंग, रूप, देश हे सगळे अडसर क्षुद्र ठरतात. केवळ हातवारे आणि खाणा खुणा यांच्या साह्याने त्यांच्या संभाषण चालू होते.

मी लगेचच काकांना गाठले....

"नमस्कार काका, कुण्या गावचे?"

मी संभाषणाला सुरूवात केली, मराठी ऐकली आणि काका हरखले.

"आरं ही तर आपली भाषा हाये. आमी मालेगावहून आलो देवा, तुमी कुंकडून आले?"

"मी मुंबईला असतो, कंपनीच्या कामासाठी आलो होतो. आज सुटी होती मग फिरायला बाहेर पडलो झालं. तुमच्या तोंडुन आईची भाषा ऐकली आणि राहवलं नाही" इति मी.

"लै बेस झालं देवा, आता तुमीच आमची आमच्या नव्या तायशी नीट वळक करून द्या बिगी बिगी."

म्हणाजे आत्तापर्यंत त्यांना त्या जपानी मुलीचं किंवा तिला त्यांचं नाव ही माहीत नव्हतं. मग मी त्यांच्याशी आईच्या भाषेत आणि एमिकोशी इंग्लिशमध्ये बोलत (माझ्या धन्य इंग्लीश ॲक्सेंटमध्ये) त्यांची ओळख करुन दिली. एमिको (याचा उच्चार अमिको असाही करतात का? पण स्पेलिंग EMIKO असेच होते.असो) तिच्या बॉयफ्रेंडबरोबर जगभरातील विविध जाती-धर्मांच्या मंदीरांचा अभ्यास करत, जग बघायला निघाली होती. मी तिला मुंबईला येण्याचे आमंत्रण द्यायला विसरलो नाही.

(गाववाले काका आणी जॅपनीज ताई)



नंतर मालेगावची काका-मावशी कंपनी आणि जॅपनीज ताईचा निरोप घेवून मी पुढे निघालो.

मुळ मंदीराकडे वळण्याआधी मी पुन्हा एकदा आजुबाजुचा परिसर पाहून घेतला. आपल्या पुराण वस्तु संशोधन खात्याने (त्यांच्याकडून अपेक्षा नसतानाही) सुर्यमंदीराच्या आजुबाजुच्या निसर्गाची व्यवस्थीत निगा राखलेली आहे. चारी बाजुला बागा मेनटेन केलेल्या आहेत. सगळीकडे हिरवेगार असल्याने परिसर कसा प्रसन्न वाटत होता.

(सुर्यमंदीराभोवतालचा निसर्ग)




आधीच ठरवल्याप्रमाणे सगळ्यात शेवटी मी मुख्य मंदीराकडे वळलो....



कोनार्कचे हे सुर्यमंदीर तत्कालीन ओरीसा वास्तु शैलीचे एक अतिषय सुंदर उदाहरण आहे. उडीया शैलीप्रमाणे मुळ मंदीराच्या रचनेत देऊळ (गर्भगृह), जगमोहन (सभामंडप किंवा महामंडप) , अंतराळ आणि भोग मंडप अशा वास्तु अंतर्भूत आहेत. भोग मंडपाची वास्तू मुळ मंदीराच्या वास्तुपासून थोडी बाजुला असली तरी तो संपुर्ण योजनेचाच एक मुलभुत घटक आहे हे नक्की. अन्य उडीया मंदीरे आणि कोनार्कचे सुर्यमंदीर यात एकच मुलभुत फ़रक दिसून येतो तो म्हणजे हे मंदीर एका योग्य आणि सुस्थीत चौथऱ्यावर बांधण्यात आलेले आहे. एक भक्कम बेस (पाया, कट्टा .. काय बरे म्हणता येइल त्याला?) बांधून त्यावर मंदीर बांधण्यात आलेले आहे.

टिपीकल वक्रीय शिखरासहीत असलेले गर्भगृह हे उडीया शैलीच्या 'रेखा देउळ' या पद्धतीने बांधण्यात आलेले आहे. तर जगमोहन किंवा सभामंडपाचे बांधकाम हा "उडीया शैलीच्या "पिढा देउळ" या प्रकाराचा उत्कृष्ट अविष्कार आहे. दोन्ही वास्तू म्हणजे रेखा देऊळ आणि पिढा देऊळ मे मुळ प्लानप्रमाणे आतुन आयताकृती असून बाहेरून मात्र उडीया वास्तू शैलीच्या पंचरथ शैलीचे अतिषय योग्य आणि लक्षणीय उदाहरण आहे. या आणि अशाच प्रकारची बरीच माहिती तो गाईड सांगत होता. खरेतर ते सगळे माझ्या डोक्यावरून जात होते. कारण तो ज्या अगम्य हिंदी-इंग्लीश किंवा तत्सम भाषेत बोलत होता ती भाषा जाम डोक्यावरून (की डोक्यात जात होती). मलाच ते फारसं कळालं नाही पण जे कळालं ते इथे लिहीण्याचा प्रयत्न केलेला आहे.

(सर्वसाधारण आराखडा : मुख्य मंदीर + जगमोहन मंदीर)



मुख्यमंदीरालाच लागून असलेल्या या भव्य मंदीरालाच (सभामंडप) जगमोहन म्हणूनच संबोधले जात असावे. कारण तिथले गाईडलोक त्याचा उल्लेख जगमोहन असाच करीत होते. साधारण ३० चौरस मिटर आकारमान आणि तेवढीच उंची लाभलेल्या जगमोहन नामक या वास्तुला लागुनच मुख्य सुर्यमंदीर कळासासहीत उभे आहे (साधारण ६८ मिटर उंच). पुढच्या काळात कधीतरी शिखराचा भाग ढासळला गेला... (त्याची कारणे आजही अज्ञात आहेत)

यासंदर्भात इथे गाईडकडून एक विलक्षण दंतकथा ऐकायला मिळाली. (मी त्याचा फुकट्या ग्राहक होतो). त्यानुसार त्यावेळी जगमोहनाचे शिखर बांधताना त्यात एक विलक्षण शक्तीशाली असा चुंबक बसवण्यात आला होता. तो चुंबक सर्व वास्तुचा (कळस) भार सावरून धरत असे. परंतू मध्ये काही शतकांपुर्वी मंदीरावर वीज कोसळली आणि त्यावेळी तो चुंबक निखळून पडला आणि त्या नंतर मंदीराचे शिखर ढासळायला सुरूवात झाली. ही कथा जर खरी असेल तर त्यावेळचे आपले वास्तुशास्त्र किती प्रगत असेल याची कल्पनाच केलेली बरी. खरे खोटे तो जगमोहनच जाणो. नंतर शिखर कोसळायला सुरूवात झाल्यावर मंदीरात आत, गाभाऱ्यात भर घालून लोकांना जाण्यास मनाई करण्यात आली. तिन्ही बाजुला असलेली दारे आता सुरक्षेच्या कारणास्तव कॉंक्रीटने बंद करण्यात आलेली आहेत. त्यापुर्वी वर सांगितल्याप्रमाणे आतली जगमोहनाची मुर्ती काढून बाहेरील

नटमंदीरात स्थापीत करण्यात आली. जगमोहनाचे छत तीन विभीन्न स्तरात विभाजीत करण्यात आले आहे. या तिन्ही स्तरांवर अतिशय सुंदर आणि सुक्ष्म नक्षीकाम केलेली विविध शिल्पे कोरण्यात आलेली आहेत.

(जगमोहन : सभामंडप)



जगमोहन हे मला वाटते त्यावेळी एकप्रकारचे सभास्थान किंवा देवाचा दरबार भरण्याची जागा असावी. तत्कालीन उडीया मंदीरांप्रमाणे हे देखील पंचरथ पद्धतीचे बांधकाम आहे. एका विस्तृत प्लॅटफॉर्म किंवा पिठावर उभारलेल्या जगमोहनाचा आराखडा पाच आडव्या विभागांमध्ये (स्तर) विभागला गेलेला आहे. सगळ्यात खालचा भाग 'पभगा', त्यानंतर त्यावरील स्तर 'जंघा', 'बंधना' 'उर्ध्वजंघा' आणि त्यानंतरचा भाग म्हणजे 'वरंडा'. हा प्रत्येक स्तर पुन्हा वेगवेगळ्या डिझाईनमध्ये विभागला गेलेला आहे. त्यावर मुर्ती कोरण्यासाठी किंवा नक्षीकाम करण्यासाठी छोटी छोटी खिडकीवजा आकार कोरण्यात आले आहेत. त्याला पिढा मुंडी, खाखर मुंडी आणि वज्र मुंडी अशी नावे आहेत. यापैकी पिढा मुंडीच्या रचनांमध्ये मुख्यतः यक्ष, किन्नर, फुले, नागदेवता कोरलेल्या आहेत. बाडा उर्फ जगमोहनाच्या सगळ्यात वरच्या स्तरात आठ मुक्तपणे उभ्या असलेल्या दिपकला अर्थात अष्टदिशांच्या देवतांच्या मुर्ती उभ्या केलेल्या होत्या. उदा. इंद्र (पुर्व), अग्नि (south east), यम (दक्षीण), नैरुत्य (नैरुत्य), वरुण (पश्चिम), वायू (north west), कुबेर (उत्तर) आणि इशान (इशान्य) इ. यापैकी बऱ्याचशा मुर्ती चोरून परदेशी स्मगल करण्यात आल्या. यापैकी एक मुर्ती परत मिळवण्यात ओरिसा सरकारला यश आले. ती मुर्ती सध्या कोणार्क येथील वस्तु संग्रहालयाची शोभा वाढवते आहे.

असो तर पिढा मुंडीच्या नंतर जरा वर सरकले की क्रमांक लागतो तो खाखरमुंडी रचनांचा. हे आकार बहुतांशी रिकामे आहेत किंवा बहुतेकांमध्ये काही विचित्र आकाराचे प्राणी आणि बहुतांशी अगदी लाईफ साईझ म्हणता येतील अशी कामशास्त्राशी संबंधीत शिल्पे कोरण्यात आलेली आहेत्.पुर्ण वास्तू बहुदा लोखंडी बिम्सच्या आधारावर उभी आहे. आणि मधला भिंतीचा भाग , तसेच दरवाजे बहुदा क्लोराईट किंवा तत्सम पाषाणापासुन कोरण्यात, बनवण्यात आलेले आहेत. या दरवाज्यांवर किंवा चौकटींवर म्हणु हवेतर देखील अतिषय सुक्ष्म आणि सुंदर असे नक्षीकाम करण्यात आलेले आहे. (आराखड्याच्या फोटोत डावीकडील उभे तीन आकार हे पिढा मुंडी, खाखर मुंडी आणि वज्र मुंडीचे आहेत)

जगमोहनाला लागूनच मुख्य सुर्यमंदीर आहे. इथे बाहेरच्या बाजुने, चौकटीमधून तीन सुर्यप्रतिमा स्थापीत करण्यात आलेल्या आहेत. जे काही समोर होते ते विलक्षण भारावून टाकणारे होते. या तिन्ही सुर्यप्रतिमा शैशव, तारुण्य आणि वार्धक्य या मानवी जीवनाच्या तीन कालावधीनुसार बसवलेल्या आहेत. काळ्या पत्थरात (क्लोराईट) कोरलेल्या या सुर्यप्रतिमा अतिषय देखण्या आणि भव्य आहेत. मला इथे आणखी एक रंजक माहिती मिळाली जी आधी कधीच ऐकलेली नव्हती. आपल्याकडे वैदिक काळापासून सुर्यपुजेची पद्धत आहे. पण सुर्य हा आपला देव नाही. सुर्य हा आर्यांचा देव. शेकडो युगांपूर्वी आर्य जेव्हा भारतात आले तेव्हा त्यांनी आपल्या बरोबर आपले देवही आणले. त्यात सुर्य हा प्रमुख देव होता. त्यामुळेच आपल्या इतर देवांपेक्षा वेगळी एक गोष्ट सुर्याच्या प्रतिमेत आढळते ती म्हणजे सुर्यदेवाच्या पायात घोट्याच्याही वर येणारे बुट आहेत.

(सुर्यदेव)



निघण्यापुर्वी मंदीराच्या परिसरातील अन्य काही भग्न शिल्पांचे घेतलेले फोटो.









पाय निघत नव्हता पण निरोप घेणे आवश्यक होते. संध्याकाळ व्हायला लागली होती. मग शेवटी न राहवून पुन्हा एकदा मंदीराभोवती एक प्रदक्षीणा घातली आणि मावळत्या सुर्यनारायणाला नमस्कार करत कोणार्कच्या त्या अद्वितीय चमत्काराचा निरोप घेतला. निघता निघता तिथून जवळच असलेल्या पुराण वस्तु खात्याच्या संग्रहालयाला भेट दिली. मंदीरातून तुटून पडलेली काही शिल्पे इथे जतन करून ठेवली आहेत.



शेवटी पुन्हा एकदा इथून थेट भुवनेश्वरला जाणारी बस पकडली..... अहं लटकलो... बसला !

बॅक टू पॅव्हेलियन.... भुवनेश्वर ! उद्या मुंबईला परत.........

कोणार्कला जायचे कसे?

ट्रेन अथवा विमानाने भुवनेश्वर आणि तिथून मग बस (खाजगी बसेस सुटतात भुवनेश्वरहून). पुरी, कोनार्क एका दिवसात सहज होण्यासारखे आहे. कोनार्कच्या आसपास अजुनही काही बघण्यासारखी क्षेत्रं आहेत. उदा. चंद्रभागा ई. पुरीबरून कोनार्कला जाताना मध्येच हे लागते. मला नाही जमले पण होण्यासारखे आहे. राहण्याची सोय भुवनेश्वर आणि पुरी इथे चांगली होवू शकेल. कोनार्कमध्ये मला काही विशेष हॉटेल्स दिसली नाहीत. भुवनेश्वरला राहणे उत्तम.

विशाल कुलकर्णी

---

# बाबा हरवलाय

बाबा हरवलाय हो.. खूप दिवसांपूर्वी तावातावानं आईशी भांडून गेलाय सक्काळी सक्काळी.. संध्याकाळी कोणी दुसराच माणूस घरी आला... चेहरा तर तोच होता, कपडे तेच,.. पण डोळ्यात ओळख पटायला हवी ना.. हरवलेले डोळे.. झोपाळलेला चेहेरा.. मी बावरुन पाहिल्यावर कसनुसं हसला.. "झोपली नाहीस बाळ अजून.." असं विचारुन लगेच स्वतःच झोपला.. मी जागीच.. खूप काही सांगायच होत.. दिवसातलं.. मनातलं.. पण बाबा घरी आलाच नाही.. साहेबच आला ऑफिसातला.. .. असूदे.. उद्या सकाळी होईल आपला बाबा पूर्वीसारखा म्हणून मी एकटीच झोपले.. सकाळी एक शेअर ब्रोकर बसला होता टी.व्ही. समोर.. बाबांच्याच कपड्यात.. ती सरकणारी पट्टी बघून स्वतःशीच बोलत होता.. मी डोळ्यात पाहिलं.. पुन्हा नजर अनोळखी.. मी जवळ गेले तर म्हणाला, "संध्याकाळी कॅरम आणायचाय ना बबड्या".. संध्याकाळी मला हसायलाच आलं... कुणी कॅरमचा सेल्समनच आला बाबाचे कपडे आणि चेहेरा घालून... सारखं सारखं कॅरमबद्दलच सांगत होता.. मग मी पण नाही विचारलं, मला तर केव्हाचं विचारायचं होतं, "आता तू माझ्याशी कॅरम खेळणार रोज?" म्हणून... पण सेल्समन ला कसं विचारणार?... बाबा हरवला असेल पण मोबाईल तर असेल ना त्याच्याजवळ.. मी फोन केला काल दुपारी, तर नेटवर्क चा प्रॉब्लेम होता बहुतेक... सारखं तिकडून "बाळ मी आत्ता मीटिंगमधे आहे, नंतर फोन करतो" असा मेसेज येत होता.. मी खूप रडले मग.. आईनं सांगितलं संध्याकाळी बाबांचा चेहेरा घालून आलेल्या माणसाला.... पण गंम्मतच झाली.... आज चक्क कुणी प्रवचनवालाच आला होता बाबांच्या कपड्यात.... मला संध्याकाळी बागेत नेऊन असलं पकवलं ना तासभर..... हल्ली असंच होत रोज.. जाताना कोणी वेगळाच असतो.. येताना कुणी वेगळाच.. कधी डॉक्टर असतो, कधी सेल्समन..
असा नव्हता काय माझा बाबा.. चांगला होता तो... त्याच्या जवळ तासंतास बसता यायचं.. न बोलता.. झोपल्याचं नाटक करुन...

अनुराग

# मात्रा

शाळा सुरु होऊन आता आठवडा उलटलाय. महिन्या-दिड महिन्याच्या सुट्टी नंतर पालक आणि त्यांचे पाल्य परत त्यांच्या रहाटाला जुंपलेत. पाऊसही अधून मधून हजेरी लावून जातोय. या वर्षापासून लेकीच्या शाळेच्या वेळापत्रकात बदल झालाय. गेल्या वर्षी ८ ते १२:३० पर्यंत असणारी शाळा आता ९ ते ३ पर्यंत केली आहे. त्यामुळे बऱ्याच मुलांच वेळापत्रक साफ बिघडलय.
पूर्वी १ वाजता घरी पोहोचलं की १ तास खाऊन पिऊन आणि थोडावेळ खेळून २ च्या आसपास मस्त ताणून द्यायची. मग संध्याकाळी फ्रेश झाल्यावर थोडावेळ सवंगड्यांसोबत बाहेर खेळणं, १/२ तास टीव्हीवर टॉम अँड जेरी, मग थोडा वेळ हसत खेळत अभ्यास. सगळ कसं सुरळीत चाललेलं. पण आता बिचारीला घरी पोहोचतानाच ३:३० होतात. मग कसबसं दोन घास खाल्ले की झोप येईस्तो ४ - ४:३० होतातच. किमान तास दीडतासाची झोप अपेक्षित असते. (कारण शाळा जरी ९ ची असली तरी बस ८ लाच येते. त्यामुळे ७ला उठून सगळं आटोपावं लागतं.) मग झोप पूर्ण होत नाही. दहा-दहा वेळा विनवण्या कराव्या लागतात की बास आता. खेळायला वेळ पुरत नाही. त्यामुळे तिची चिडचिड होते.
परवा अशीच ती चिडली. ऐकेच ना. आदळ आपट. आधी समजावून पाहिलं. पण जेव्हा त्याचा उपयोग झाला नाही तेव्हा मग आईचा पारा चढला. चांगलं तासभर लेक्चर चाललं होतं. रात्र झाली होती, सकाळी परत लौकर उठायचं. त्यामुळे तो विषय तिथेच संपला.
सकाळी शाळेची तयारी चालू असताना ती हळूच पुटपुटली, "बाप्पा मला लवकर मोठ्ठं कर." बसची वेळ होत आली होती त्यामुळे आईने विषय वाढवला नाही.
त्या संध्याकाळी तिने लेकीला जवळ घेतलं. सहज गप्पांच्या ओघात विचारल की "का ग सकाळी असं का म्हणालीस?" त्यावर लेक म्हणाली की " मोठ्ठ्यांना कुणी रागवत नाही. लहानांनाच सगळे ओरडतात. काल मला तू किती -किती बोललीस. एकच गोष्ट कंटाळा येई पर्यंत सांगत होतीस."
आईला वाईट वाटल,. तिने तिची चूक मान्य केली. "I'm sorry. खरचं पिट्ट्या, जरा जास्तच बोलले मी तुला. जशी मोठी माणस लहानांच्या चुका दाखवून देतात, तस लहानांनीही जर मोठी माणसं चुकत असतील, तर योग्य रीतीने सांगावं. मला बरं वाटलं तू हे माझ्याशी बोललीस. " एव्हाना लेकही खुष झाली.
आई पुढे म्हणाली, "तुला माझ्या सतत एकच गोष्ट बोलण्याचा कंटाळा आला ना, ठीक आहे. या पुढे मी तुला काहीही सांगायच असेल तर फक्त एकदाच सांगेन. दुसऱ्यांदा चुकून पण बोलणार नाही. पण मग तुझं तुलाच कळलं पाहिजे की आता आपण कुठे थांबायचं ते."
लेक गुणी आहे. तिलाही जाणीव आहे आई नक्कीच आता दुसऱ्यांदा हाक मारणार नाही. तेव्हा पासुन सगळी कामं एका हाकेत पूर्ण होतायत.
सध्या दोनच दिवस झालेत पण ही मात्रा पुरेपूर लागू पडली आहे.
पाहूया अजून किती दिवस टिकते.

गणपा

# कोहम !

जा, बाप्पा जै जै कर, मग तुला शाळेत नेऊन घालते!..." लहानपणी, माझी आई, मला आंघोळ झाल्यावर, कपडे घालून, भांग पाडून झाला की सांगायची. मी पण हळूच देवघराकडे जाउन 'बाप्पा मला चांगली बुद्धी दे, मोठे कर' असे म्हणून नमस्कार करुन शाळेत जायला निघत असे. शाळेत सोडायला कधी आई, कधी आजी किंवा कधी कोणी अचानक आलेले पाहुणे असायचे. रस्त्यात गणपतीचे आणि मारुतीचे देऊळ लागायचे. मी हट्ट करुन घंटा वाजवून नमस्कार केल्याशिवाय पुढे जात नसे. बरोबर असलेले कौतुकाने मला उचलून घंटा वाजवू द्यायचे. मी नमस्कार करत करत शाळेत जात असे.

घरी वडील वेगवेगळे कुलाचार, कुलधर्म व्यवस्थित करायचे. गणपती आणि गौरी म्हणजे आनंदाची पर्वणी. दिवाळीत सगळे एकत्र जमायचे. सगळे लहान मुले फटाके फोडायला अगदी अधीर झालेली असत. पण पूजा झाल्याशिवाय काही नाही असा धाक असायचा. सगळे मिळून एकत्र पूजा केली जायची. वेगवेगळे सण उत्सव साग्रसंगीत साजरे व्हायचे. सर्व काही मात्र देवपूजा या संकल्पनेभोवतीच असायचे. त्यामुळे, देवाला नमस्कार, हा हमखास असायचाच. अगदी नवीन काही वस्तू आणली तरी देवापुढे ठेवल्याशिवाय ती वापरायची नाही असाच जवळपास दंडक होता. अर्थात त्यात वावगे असे घरात कोणालाच वाटत नसे.

आजी किंवा आई लहानपणी, मला किंवा घरात जेवढे लहान असतील, त्यांना एकत्र बसवून वेगवेगळ्या गोष्टी सांगत असत. राजकुमार, राक्षस यांच्याप्रमाणेच राम, कृष्ण, शिवाजी अशा गोष्टी ऐकता ऐकता आपण कसे वागावे, मोठयांबरोबर कसे आचरण करावे, याचे छोटे छोटे धडे गोष्टीरुपाने सांगत असत. ऐकता ऐकता झोप लागत असे. पण देवबाप्पा आपल्याकडे सारखा लक्ष ठेवून असतो, आपण कसे वागतो हे तो पहात असतो, आपले चुकले तर आपल्याला शिक्षा करतो आणि आपले बरोबर असेल तर आपल्याला बक्षिस देतो या कल्पना मनात नीट घर करुन बसल्या होत्या. त्यामुळे, चुकून कोणा मित्राशी भांडण झाले किंवा मारामारी झाली की, लगेच देवघरात जाऊन 'बाप्पा, मी चुकलो. परत भांडण करणार नाही.' असे सांगून, पुन्हा भांडण करण्यास मोकळा होत असे. मुंज झाल्यावर मला फार मोठा आनंद झाला, कारण आता मी स्वतः माझ्या हाताने देवाची पूजा करु शकतो, असे मला वडिलांनी सांगितले.

देवाला तासनतास ताम्हणात ठेवून वरुन पाण्याची धार धरुन अथर्वशीर्ष म्हणायचे, हा माझा आवडता कार्यक्रम असे. बिचारे देव फार काकडून जात असावेत त्यामुळे!

साधारणतः दहावी नंतर मला थोडी फार जाण आली असे मला वाटते. जगाकडे पहातांना कुठेतरी लहानपणापासूनच्या देवाच्या कल्पना किंवा देवाचे अस्तित्व याविषयी बांधलेले आडाखे, आणि प्रत्यक्ष दिसणारे जग यात काहीतरी फरक आहे हे समजत होते. पण नक्की मांडता येत नव्हते. चांगले वागले तर देव आपले चांगले करतो. हे ऐकायला, आणि आचारायला कितीही सोपे असले, तरी प्रत्यक्ष अनुभव मात्र कित्येक वेळेला विपरीतच असतो. आपण चांगले वागलो तरी जग आपल्याशी चांगले वागेलच असे नसते. मग, आपण का चांगले वागायचे? आणि समोरचा आपल्याशी कसाही वागला तरी आपण का त्याच्याशी चांगले वागायचे? लहानपणापासूनचे नेहमी खरे बोलावे, सत्य, अहिंसा वगैरे वगैरे सांगितल्या गेलेल्या संकल्पना प्रत्यक्षात फोल होतांना दिसत असत. सत्कृत्य करा, त्याचे फळ मिळेल; पण आपण जे मानतो ते सत्कृत्य असेलच याची खात्री कोण देणार? मी ज्याला सत्कृत्य म्हणतो ते कदाचित दुस-यासाठी दुष्कृत्य असणार. मला जर पोटभर अन्न मिळत आहे तर कदाचित दुसरा कोणीतरी उपाशी असू शकतो. त्याच्या मनात जर माझ्याविषयी वैरभाव निर्माण झाला तर त्याचे मी निराकरण कसे करणार? त्याला हे देवानेच केले असे सांगुन त्याचे समाधान कसे करणार? देव दयाळू आहे, असे म्हणायचे तर तो केवळ माझ्याबाबतीतच असावा, हे कसे शक्य आहे? कदाचित उद्या हे चित्र पालटले, तर मी त्यावेळेला देव दयाळू आहे

असे म्हणु शकेल का? किंवा तसा युक्तिवाद करणा-याला मी समजून घेऊ शकेन का? नाही. मग, मी मला आता सोईस्कर आहे म्हणुन हा युक्तिवाद का स्वीकारावा?

कळेना, कळेना अशी मनस्थिती झाली, आणि देव वगैरे काही नाही, नुसतेच शब्दांचे बुडबुडे आहे, लोकांना नादी लावण्यासाठी आणि आपले पोट भरण्यासाठी केलेली काही लोकांची मखलाशी आहे, असाच समज माझा झाला. बारावी पास होईपर्यंत मी कट्टर देव विरोधक झालो होतो. देवळात जाणे बंदच झाले. घरी पूजा वगैरेला केवळ औपचारिकता म्हणुन हात जोडत असे. मनाचा सहभाग शून्य असे. कधीतरी गळ्यातले जानवे पण गायब झाले आणि त्याचबरोबर स्नान झाल्यानंतरचा देवाला केलेला नमस्कार आणि प्रार्थना! थोडक्यात इतरांच्या दृष्टीने मी पूर्णपणे नास्तिक झालो होतो. होय! मी एकेकाळी कट्टर नास्तिक होतो !!

कर्मकांडाच्याविषयी एक तिडीक मनात येऊन मी धर्म वगैरे सगळे झूट आहेत, त्यांना समुद्रात बुडवले पाहिजे या मतावर येऊन पोहोचलो. कॉलेजमधे मित्रमंडळी चर्चा करत असत, त्यात नास्तिकतेचा पाठपुरावा करुन आणि जन्मजात (!) वादप्रभुत्वाच्या सहाय्याने मी देवदेवतांची खिल्ली उडवत असे. अर्थातच, अर्थाचा अनर्थ न होण्याची दक्षता घेत. कधी काळी मनावर झालेले संस्कार एका मर्यादेतच रहायला प्रवृत्त करत असत आणि मी मर्यादांचे भान राखून वाद करत असल्याने, धार्मिक तसेच अधार्मिक मित्रांमधे आब राखून असे. वादात कोणतीही बाजू घेतलेली असली तरीही दोन्ही बाजूंकडील मंडळींशी सलोख्याचे संबंध ठेवण्याची कला मला तेव्हापासून अवगत होती असे म्हटले तरी चालेल.

दिवस जात होते. अभ्यास, सबमिशन, परीक्षा यांत आयुष्यातुन देव हद्दपार झाला आहे याची कुठेही काहीही जाणीव नव्हती. सुट्टीच्या काळात किंवा अधे मधे आम्ही फिरायला जात असू. अशाच फिरस्तीमधे अनेक तीर्थक्षेत्रांना पण भेटी दिल्या. देवाचे अन देवळांचे निरीक्षण करत असे. मन लावून देवापुढे डोके टेकवणारे लोक पाहून मनात अनेक प्रश्न उभे रहात, ज्यांची उत्तरे मिळत नसत. लांबून लांबून पदयात्रा करत येणारे भाविक, वारकरी, साधू, बैरागी, गृहस्थाश्रमी एक ना अनेक. याच काळात अनेक जैन स्थानके, बौद्ध विहार, मशीदी, चर्चेस येथे पण भेटी दिल्या गेल्या. सगळीकडे असेच....

तपशीलात थोडा फार फरक. फारच थोडे किंवा नगण्य माझ्यासारखे. मग माझ्यातच काही चूक होती का? मॅन्युफॅक्चरींग फॉल्ट!!??

गाणगापुरास गेलो होतो. तिस-या वर्षाच्या सुट्टीत. संगमावर स्नान केले तर पुण्य मिळते म्हणुन संध्याकाळ झालेली होती, तरी सगळे मित्र पाण्यात उतरलेले. मी ही स्नान करुन बाहेर येऊन बसलो होतो. बाजूलाच काही अंतरावर एक साधू बसला होता. हळूच त्याच्यापाशी जाऊन बसलो. त्याला चाहुल लागली अन त्याने हळूवार डोळे उघडून माझ्याकडे पाहिले. मी त्याचे निरीक्षण करत होतो, अन तो माझे.....

दोन एक मिनिटांनी डोळे मिटून शांत स्वरात तो पुटपुटला ....'भगवान का भरोसा रख. भगवान है. जानना चाहता है तो तलाश कर. मिल जायेगा....'

'कैसे...?' मी.

'उसकी मर्जी होगी तो तुझे रास्ता मिल जायेगा...' साधू एवढेच बोलून गप्प झाला. मी पण त्याची तंद्री भंग न करता हळूच उठून गेलो. नंतर कधीतरी, झालेले हे निरर्थक बोलणे मी विसरुन गेलो.

एके दिवशी वाचनालयातुन पुस्तक आणण्याकरता गेलो असतांना अद्वैतवादावरच्या टीकेचे पुस्तक दिसले. अगदी जुनी आवृत्ती होती. सहज पहावे तरी काय आहे, असे म्हणून उघडले...काही पाने चाळली असता, त्यात काही वेगळीच चर्चा आहे आणि देव

किंवा कर्मकांड नाही असे पाहून, आहे तरी काय असा विचार करुन, ते पुस्तक घेऊन आलो. जेवण करुन वाचायला सुरुवात केली. दहा पंधरा पाने वाचून झाल्यावर, अंगात यावे असे होऊन एका बैठकीत मी ते वाचून काढले.

चहुबाजूंनी आभाळ भरुन यावे, हवा नुसती कोंदट व्हावी, पाउस पडेल असे वाटत असावे पण पावसाचा पत्ता नसावा... वारा भुरुभुरु वाहत असावा आणि एक प्रकारची उदासी सर्वत्र पसरलेली असावी.... अशातच कडाऽऽकन वीज कोसळावी अन जोरदार वा-याचा तडाखा बसावा! आतापर्यंत याच मुहुर्ताची वाट पहात असलेला पाउस, धो धो दहापंधरा मिनिटे मनमुराद कोसळावा! अन जितक्या वेगाने ढग जमले, त्याच्या दसपट वेगाने पळून जाऊन लख्ख उजेड पडावा! मघापासूनचे मनावर साचलेले मळभ क्षणात दूर व्हावे आणि जणू काही, परत नवा जन्म व्हावा, असे माझे झाले. आजपर्यंत मनात आलेल्या अनेक शंकांची जरी पूर्ण उत्तरे मिळाली नाहीत, तरी उत्तरे मिळतील असा विश्वास मनात जागृत झाला होता.

हळूहळू, जमेल तसे अनेक ग्रंथ, उपनिषदे, टीका, वेद वाचुन काढले. झपाटल्याप्रमाणे मी अधाशासारखा वाचत असे. जग हे ब्रह्माचा आविष्कार आहे. सर्व विविधतेचे कारण ब्रह्म आहे. अशा एक ना अनेक संकल्पना हळूहळू समजत होत्या. पचत होत्या. 'कर्तृत्व न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः। ' परमेश्वर माणसाचे कार्य आणि कर्तृत्व निर्माण करत नाही, हे सर्व मानवच आपल्या स्वभावानुसार निर्माण करतो. जसे कर्म कराल तसेच फल मिळेल. मानवापाशी मुक्त इच्छा आहे, तिच्या आधारावरच तो आपली नियती निश्चित करत असतो. प्रत्येक जण केवळ आपल्याच कृत्याचा दास आहे. परमेश्वर स्वतः काहीही करत नाही. जे काही करायचे ते मानवच करतो.

पारमार्थिक जग आणि व्यावहारिक जग यात गल्लत होता कामा नये. परमार्थात मानव आणि परमेश्वर एकच असले, तरीही व्यवहारात मात्र मानव पूजक आणि परमेश्वर पूज्य आहे. गुरु हा सुद्धा शिष्यांना पूज्यच समजला पाहिजे. परमेश्वराशी आणि गुरुशी व्यवहारात अद्वैत पाळू नये. ब्रह्मसाक्षात्कार होणे म्हणजे ब्रह्माशी पूर्णैक्य नव्हे. मनुष्य ब्रह्मज्ञानी झाला, तरीही, मी तुझा, पण तू माझा नाहीस ( 'नाथ तवाहं मामकीनः त्वम।' ) अशी अवस्था असते. सगुणाची आराधना करणा-याला पूर्णैक्य कधीच साधणार नाही. निर्गुण ब्रह्माची उपासना करणा-याला ब्रह्मैक्य प्राप्त होते असे मानले जाते, पण असे करणे कोणाही मानवाला शक्य नाही, कारण तत्क्षणी ती व्यक्ती परमेश्वर बनेल.

अर्थातच, सापेक्ष अस्तित्वाचा म्हणजेच शरीराचा त्याग करावा लागेल. हळूहळू समजत होते. पण अजूनही मनात संभ्रम असायचे. पण आता धूसर धूसर का होईना, पण मनातले विचार निवळत होते. वेदांचे अस्तित्व मानणारा, किंवा वेदांचे प्रमाण मानणारा तो आस्तिक. षड्दर्शनांच्या अभ्यासातून, तसेच जैन व बौद्ध दर्शनांच्या अभ्यासातून समोर आलेली व्याख्या.... जैन वा बौद्ध वेदांना मानत नाहित. त्यांच्या अनेक ग्रंथांतून वेदांची निंदा केलेली दिसते. पण मीमांसा, न्याय, वैशेषिक इत्यादी संभ्रम असल्यास वेद सांगतील ते प्रमाण, अशी भूमिका ते घेतात, आणि हे जे मानतो तो आस्तिक.

हे तर माझ्या आजपर्यंतच्या आस्तिक कल्पनेपेक्षा विपरीत होते. कारण देवाला मानणारा तो आस्तिक आणि न मानणारा नास्तिक, या गृहितकावर मी स्वतःला नास्तिक समजे. पण देवाचे नाही, तर वेदांचे अस्तित्व आणि प्रामाण्य मानणारा तो आस्तिक म्हटल्यावर वेद मानायचे की नाही हा प्रश्न आला. वेदांमधे हजारो वेगवेगळे देव, देवतांचे, कर्मकांडांचे तसेच ज्ञानाचे उल्लेख आहेत. वेद त्याचवेळी, देव आणि देवता ह्या मानव निर्मित आहेत, असे ही सांगतात. मग आधार कसा आणि कुठून मिळवायचा? शंकराचार्य मदतीला तयार होते. मीच मदत मागितली नव्हती.

प्रत्येक वेदवचन प्रमाण मानता येणार नाही. वस्तूचे किंवा क्रियेचे वर्णन करण्यापेक्षा, ते वाक्य निःसंदेह आणि फलोत्पादक ज्ञान देत असेल तरच ते प्रमाण मानावे. अन्यथा त्याला मानू नये. अग्नी शीत असतो आणि त्याचा प्रकाश पडत नाही असे एक नव्हे शंभर ऋचांनी सांगितले तरी ते मानलेच पाहिजे, असे नाही, कारण व्यवहारात त्याची प्रचिती येत नाही, म्हणूनच

वेदांत म्हटले आहे म्हणून स्वर्ग आहे आणि केवळ कर्मकांडानेच स्वर्ग मिळतो असे मानण्याची गरज नाही. बराचसा उलगडा झाला होता, थोडा तपशील बाकी होता. हळूहळू तो ही भरला गेला.

सगुणोपासनेवर विचार मनात येत होते. समजत होते. सर्वसामान्यांच्या दृष्टीने धर्म म्हणजे काय तर पूजा, उत्सव, विधी. मानवाने समाजरुपाने सलोख्याने रहावे यासाठी धर्म निर्माण झाला, सामाजिक बंधनाच्या सहाय्याने एक शिस्त लागावी तसेच परस्परांमधील बंधुभाव वृद्धींगत व्हावा. धर्म दोन पायांवर उभा असतो, एक तत्वज्ञान आणि दुसरे म्हणजे कर्मकांड. पण तत्वज्ञान सगळ्यांनाच पचते, समजते, आचरणात आणणे शक्य होत नाही. बहुतेक जण आपल्यासारखा दिसणारा, वागणारा पण थोडे जास्ती चांगले आचरण असणारा, म्हणजेच देव असे कल्पितात. त्यांना परमेश्वराची मूर्ती आवश्यक असते आणि बौद्धिक वादापेक्षा कर्मकांड आवडते. जर हे त्यांना करु दिले नाही, तर त्यांच्या मनात संभ्रम होईल. वैचारिक आणि भावनिक गोंधळ असलेला समाज संघटीत राहू शकत नाही. म्हणून धर्माला कर्मकांड आवश्यक असते. ठराविक उपचारांनी देवाची पूजा करावी, आरती, प्रार्थना म्हणावी. असे केल्याने आपण काही तरी उच्च कोटीचे करत आहोत अशी धारणा होते. वैदिक धर्म अशा रीतीने सर्वांची इच्छा पूर्ण करतो.

मात्र व्यवहारात हे मर्म झाकोळले गेले. कर्मकांड सर्वस्व बनून वेगवेगळ्या पंथांचा उदय झाला, कटुता वाढली, बुद्धीभेद झाले. आम्ही म्हणतो तसेच केले तर परमेश्वर मिळेल ही भावना वाढीस लागली. म्हणून 'न बुद्धीभेदं जनयेत अज्ञानां कर्मसंङिनाम।' , सामान्य जनांना विविध प्रसंगी विविध गोष्टी सांगून त्यांची बुद्धी भ्रमित करु नका असे गीता सांगते. मानवाला दगडात खोदलेली आणि रंगांनी रंगवलेली मूर्ती अधिक भावते. त्याच्या दृष्टीने ती मूर्ती नसून प्रत्यक्ष सगुणरुपातील ईश्वर असतो. पूजा करतांना काही काळ का होईना, तो ईश्वराशी समरुप होतो, तद्रूप होतो. कर्मकांड हे सर्वस्व नाही, पण धर्मातून ते वजाही करता येणार नाही.

सर्व शंका फिटल्या होत्या. एक चक्र पूर्ण झाले होते. कधीतरी काढून टाकलेले जानवे परत गळ्यात आले होते. देवांना परत अभिषेक सुरु झाला होता. देवळातल्या घंटा परत वाजू लागल्या होत्या. वेदवचन प्रामाण्यावर विश्वास ठेवतो म्हणून मी स्वतःला आस्तिक मानतच आहे, पण देवाला मानतो म्हणून लोकही मला आस्तिक समजू लागले आहेत.

होय! मी आता कट्टर आस्तिक आहे !!

कधीतरी घरी पाहुणे येतात, त्यांच्याबरोबर लहान मूल असते. आंघोळ करुन, कपडे घालून माझ्या समोर येऊन विचारते, "काका! मी कसा दिसतो?"
मी म्हणतो, "अरे वा शाब्बास! पण, बाप्पा जै जै केलास का? जा, पटकन करुन ये, मग आपण फिरायला जाऊ!"

त्या लहानग्याला घेऊन फिरायला जातांना आणि येतांना रस्त्यातील प्रत्येक देवळाची घंटा त्याच्या हातून वाजलेली असते!

अवलिया

# शहिदी दिवस - स्मरण एका धर्मवीराचे

१६ जुन, श्री गुरु अर्जनदेव जी यांचा शहिदी दिवस!

श्री गुरु अर्जनदेव जी हे शिखांचे पंचम गुरु आणि शीख संप्रदायातील पहिले धर्मवीर शहिद. शीख संप्रदाय ज्या लोकांनी आपली निष्ठा, श्रद्धा बदलण्यापेक्षा मृत्युला कवटाळतो त्यांना शहिद मानतो. महत्कार्यासाठी जीवन वेचणाऱ्यांनाही शीख शहिदच समजतात. या दोन्ही अर्थांनी श्री गुरु अर्जनदेवजी शहिद आहेत. त्यांना धर्मस्वातंत्र्याकरता जुलुमी शासकांकडुन सतत अघोरी छळ सोसला आणि तरीही आपल्या निष्ठा कायम ठेऊन त्यांनी निष्ठुर, धर्मांध शासक व धनाढ्यांचा सतत निषेध केला. त्यांच्या या सततच्या संघर्षामुळे त्यांनी त्यांच्या अनुयायांच्या मधे आत्मसन्मानाची भावना जागृत ठेवली. इस्लाम स्वीकारण्यास कडवा विरोध केल्यामुळे त्यांचा प्रचंड छळ करण्यात आला व शेवटी त्यांना प्राणत्यागही करावा लागला.

आधीच लिहिल्याप्रमाणे श्री गुरु अर्जनदेव जी हे शीखांचे पंचम गुरु. एप्रिल १५६३ मधे ते गुरुपदावर आरुढ झाले व त्यांनी शीख समाजाला मार्गदर्शन करणे सुरु केले. श्री गुरु अर्जनदेवजी यांचा गौरवपुर्ण उल्लेख पहिले शीख शहिदसिंग (सिंह) असाही केला जातो. ते १६ जुन १६०६ रोजी शहिद झाले. त्यांच्या प्राणार्पणाला शहिद समाधी असे म्हणतात. आज त्या घटनेला ४०४ वर्षे झाली.

श्री गुरु अर्जनदेवजी यांची शहिदी हा शीख समाजाच्या इतिहासातील एक गौरवशाली अध्याय. त्यांनी मृत्युला कवटाळुन शीख समाजाला धर्मस्वातंत्र्यासाठी लढण्याची मोठीच प्रेरणा दिली. आजही त्यामुळे शीख लोक श्री गुरु अर्जनदेवजी यांच्याबद्दल मोठ्या आदराने व अभिमानाने बोलतात.

श्री गुरु अर्जनदेवजी यांच्या काळात शीख धर्माचा झपाट्याने प्रसार झाल्यामुळे तत्कालिन मुघल साम्राज्याला धोका पुढेमागे उत्पन्न होईल अशी भीती दिल्लीच्या बादशहाला वाटली व त्याने श्री गुरु अर्जनदेवजी यांच्यावर धर्मपरिवर्तनासाठी दबाव आणणे सुरु केले. परंतु श्री गुरु अर्जनदेवजी या दबावाला बळी पडले तर नाहीतच परंतु त्यांनी आपले कार्य अधिकच जोमाने सुरु ठेवले. संतापलेल्या मुघल बादशहाने मे १६०६ च्या शेवटी त्यांच्यावर ससैन्य हल्ला चढवला व त्यांना बंदीवासात टाकले.

बंदीवासात असताना त्यांच्यावर अनन्वित अत्याचार करण्यात आले, त्यांना अनेक प्रलोभने दाखवण्यात आली. परंतु श्री गुरु अर्जनदेवजी आपल्या धर्मनिष्ठेवर ठाम राहिले. त्यांना आगीवर बसवुन व त्यांच्या अंगावर गरम वाळु टाकुन होरपळण्यात आले. असे म्हणतात की श्री गुरु अर्जनदेवजी यांच्याबद्दल आदर वाटत असलेल्या एका सूफी संताला हे कळल्यावर त्याने श्री गुरु अर्जनदेवजी यांच्या सुटकेसाठी प्रयत्न करण्याचे ठरवले परंतु श्री गुरु अर्जनदेवजी यांनी त्याला निरोप पाठवुन कोणतीही अपमानास्पद तडजोड करु नये असे ठणकावले. श्री गुरु अर्जनदेवजी यांनी त्या सुफी संताला परमेश्वराची इच्छा सर्वश्रेष्ठ असुन ते तिचा सन्मान करतात असे कळवले.

असा अनेक दिवस छळ केल्यावर श्री गुरु अर्जनदेवजी यांना रावी नदीत स्नानासाठी नेण्यात आले तेव्हा त्यांच्या दर्शनासाठी नदीकाठी हजारो लोक जमले होते. त्या सर्व लोकांसमक्ष श्री गुरु अर्जनदेवजी यांनी जलसमाधी घेतली. पंचांगानुसार तो दिवस जेठ सुद ४ संवत १६६३ असा होता. श्री गुरु अर्जनदेवजी यांच्या बलिदानाने प्रेरित होऊन असंख्य शीखांनी त्यांचा लढा पुढे चालवला.

(टीपः १९९८ मधे श्री शिरोमणी गुरुव्दारा प्रबंधक समितीने नानकशाही या सौर पंचांगाला मान्यता देईपर्यंत शीख समाज विक्रम संवतनुसार पंचांग पाही. त्यामुळे शहिदी दिवसाची तिथी विक्रम संवत नुसार दिलेली आहे. नानकशाही पंचांगानुसार ती तिथी २ हर अशी येते.)

पुणेरी ( प्रसन्न कुमार केसकर )

---

# मृत्यू आणि मी

कालच ऋषाचा मृत्यूवरचा लेख वाचला. आणि झटकन मन एकदम फार मागे गेले.
४-५ वर्षाचा असेन तेव्हा. सकाळीच सकाळी आमच्या बाबांचा कंपनीमधला मित्र घरी आला. त्याने त्याच्या वडिलांच्या मृत्यूची बातमी दिली. कसे काय गेले कितीवेळ झाला? वगैरे प्रश्न झाले. मग त्याने कोणाकोणाला निरोप दे ते बाबांना सांगितले व पुढचे निरोप द्यायला पुढे गेला. तेव्हा फोन वगैरे काही नव्हते. मग बाबांनी हाफडे येईन असा निरोप एका दुसऱ्या मित्राबरोबर पाठवला व त्याला पक्याचे वडील वारले आहेत ते सर्वांना ऑफिसात सांग असे सांगितले. मग बाबा पुढची तयारी करण्यासाठी मित्राच्या घरी गेले. एव्हाना मी जागा झालो होतो. आईला विचारले "ते गेले म्हणजे कुठे गेले?"
आई: "बाप्पकडे"
मी: "मग बाबा कुठे गेले आहेत आत्ता?"
आई: "त्यांना पोचवायला"
मी: "कुठे पोचवायला?"
आई: "बाप्पाच्या घरी"
मी: "मग बाबांना माहीत्येय बाप्पाचे घर कुठे आहे ते?"
आई: "नाही रे. मधेच रस्त्यात सोडून येणार? मग ते आजोबा जातील पुढे"
मी: "मग बाप्पा कुठे राहतो"
आई: (आकाशाकडे बोट करून) "वर"
मी: "मग बाप्पाच्या घराला आपल्यासारखा जीना आहे का?"
आई: "हो"
मी: "मग तो दिसत का नाही आकाशात?"
आई: "पुण्यवान माणसांना दिसतो"
मी: "मग ते आजोबा बाप्पाकडे का गेले?"
आई: "त्यांना बोलावणं आलं बाप्पाचं म्हणून ते गेले"
मी: "मग बोलावणं कधी येतं बाप्पाचं?"
आई: "वेळ आली की येतं"
मी: "मला जाता येईल बाप्पाकडे?"
आई: "नाही, असं कोणालाही नाही जाता येत बाप्पाकडे?"
मी: "कां?"
आई: "मोठा झालास की कळेल. चल उठ दात घास"

आईने मला दुसऱ्या कामाला लावून विषय संपवला. पण प्रश्न मनात तसाच राहीला. हळू हळू आजूबाजूची जुनी खोडं पडत होती.आणि कोणना कोणतरी बाप्पाकडे गेले म्हणून बाबा त्यांना पोचवायला जात होते. पण प्रश्न कायम. मग हळूहळू

मंदिरातली आजूबाजूची प्रवचनं ऐकू लागलो तसं हे कळलं की सगळेच मरतात केव्हा ना केव्हातरी. माझ्यासाठी हा धक्का होता.म्हणजे मी पण मरणार तर केव्हा ना केव्हातरी. २-३रीत असेन तेव्हा. फार भिती वाटायची. पण आमच्याघरी भागवतादी अनेक पुस्तके त्यांच्यातल्या कथा इ. होते; ते वाचायचो. मग त्यात परमेश्वर भक्ताच्या हाकेला कधीही धावून येतो फक्त प्रेमाने हाक मारावी लागते हे कळले. मग भिती कमी झाली. म्हणलं आला मृत्यू तर मारायची हाक देवाला. ती भिती कमी झाली. पण ते मरण तर अटळ आणि वेळ न सांगता येते, आता काय करायचे? आणि 'मन चिंती ते वैरीही न चिंती' या न्यायाप्रमाणे जवळचे कोणी म्हणजे आई, बाबा कोणी गेले तर काय करायचे? हि चिंता देखील मनास सतावायची.

तेव्हा पुण्यामधे रविवारी बरेच NDA कॅडेट फिरताना दिसायचे. त्यांचा रुबाब, कमावलेलं शरीर पाहून त्याक्षेत्राबद्दल फार आकर्षण वाटायचे. पण त्याततर कायम शीर तळहातावर घेऊन फिरावे लागते. ठिक आहे त्या रुबाबासाठि काहीही कुर्बान करु. मग मिलीटरीत जायचे म्हणून मी आणि माझे २-३ मित्र पिसाटल्यासारखे व्यायाम करू लागलो.

दरम्यानच्या काळात टिव्हीवर शनिवारी दुपारी असाच मनेका गांधींच्या संस्थेद्वार निर्मीत 'हेडस अ‍ॅण्ड टेल्स' हा कार्यक्रम लागायचा. तो पाहण्यात आला. त्यात प्राण्यांवर होणारे नृशंस अन्याय चित्रीत करून दाखवत असंत. तसेही लहानपणापासून घरच्या संस्कारांमुळे नॉनव्हेज खात नव्हतोच. त्यामुले मेलेले प्राणी पाहण्याचा कधी प्रसंग आला नव्हता. पण त्या दिवशी मात्र टिव्हीवरचे दृष्य पाहून जीव हेलावून गेला. महाराष्ट्रातल्याच कोणत्यतरी देवीसमोर बळी देण्याचा विधी त्यात दाखवत होते. त्या खाटकाची सुरी सरसर त्या बोकडाच्या गळ्यावरून फिरत होती. त्या बोकडाच्या छाताडावर खाटकाने एक गुडघा दाबून ठेवला होता. त्याच्यावर रक्त उडून तो रक्ताने माखला होता. फसफस करून दूध उतू जावं आणि जमिनीवर वहावं तसं त्या बोकडाचं रक्त जमिनीवर वहात होतं. डोळ्याने ते दृष्य पाहवत नव्हतं पण टिव्ही बंद करण्याचाही धीर होत नव्हता तसाच बघत राहीलो. म्हटलं किती वेदना होत असतील बिचाऱ्याला. मृत्यूनेच सोडवले असेल. बास्स त्यानंतर चहा पिताना, जेवताना खाताना तेच दृष्य डोळ्यासमोर यायचे. कसंतरीच व्हायचं. जेवण जात नसे २-३ दिवस. आई-बाबांना वाटे हा इतरवेळे नीट जेवणारा आता जेवत का नाही. मग ठरवलं डोळ्यासमोर आणायचंच नाही ते दृष्य. ते विचार मनात येण्याआधीच जेवण संपवोन उठायचं. ही योजना चांगली चाल्ली. पण ती ही पुढच्या आठवड्यापर्यंत. परत पुढच्या शनिवारी हेड्स अ‍ॅण्ड टेल्स बघितलं. या वेळेला तर गाभण मेंढीच्या पोटातले पिल्लू काढून त्या कोवळ्या जीवाची कातडी कमाविणाऱ्या खाटकाचे दृष्य दाखवित होते. पुन्हा तेच मागच्या वेळ सारखे. मग वडील मला डॉक्टरकडे घेऊन गेले.डॉक्टरांनि काहीही झाले नसल्याचा निर्वाळा दिला. मग डॉक्टरांच्या बहुतेक लक्षात आलं. त्यांनी मला विचारलं काही असं पाहीलस का जेवणात पडलेलं की ज्यामुळे जेवणाची किळस यावी. म्हटलं हो. मग सगळा वृत्तांत त्यांना कथन केला. त्यावर डॉक्टर म्हणाले की अशा गोष्टी मुद्दाम पाहू नकोस पण कधी पहावं लागलं तर मन मात्र खंबीर पाहीजे. अरे तू तर हे टीव्हीवर पाहीलस; प्रत्यक्ष पाहीलं असतंस तर काय झालं तसतं रे तुझं. आणि तुला मिलिट्रीत जायचंय ना? मग! तिथे डोळ्यासमोर प्रत्यक्ष मरणारा माणूस कसा पाहशील. खरोखरच धक्कादायक वाक्यं होती ती. मी मनात विचार करायला लागलो खरंच आहे. न जाणो उद्या आपल्यावर अशीच मरायची वेळ आली तर. कोणीतरी गळ्यावरून कराकर सुरी फिरवत आहे. स्स्स्स्स. किती वेदना. खरोखर मरणाने लवकर यावे म्हणून प्रार्थना करत असेन तेव्हा मी. पण माझ्या खरोखर समोर असे कोणाला कापले तर? मग मनात विचार आला की हे बघायला धैर्य जमा करायलाच पाहीजे.

दरम्यान आम्ही घर बदलले व उपनगरात रहायला आलो. शाळेच्या रस्त्यावर तेव्हाच्या अविकसित उपनगरातली म्हणजेच गावतली खाटकाची दुकानं होती. त्यातच एक अशरफी चिकन शॉप. या दुकानाशेजारीच शोपीस नावाचे शोभिवंत माशांचे(मत्स्यांचे) दुकान. याचे मालक एक वृद्ध होते. आम्हि कायम त्या दुकानासमोर उभे राहत असू. शोभेच्या मासोळ्या बघत. त्यां दुकानाशेजारीच अशरफीवाल्याचे कोंबड्यांचे पिंजरे होते. त्या दिवशी तो अशरफीवाला पिंजऱ्यातून काही कोंबड्या बाहेर काढत होता. म्हटलं बघूया कोंबडी प्रत्यक्ष कापताना कशी दिसते ते. मी सरसावून बघू लागलो. त्याने त्या कोंबड्यांना त्यांचे एक तंगडे धरून उचलून वरती ओट्यावर टाकत होता. मग त्याने एका लोट्यात गरम पाणी भरून घेतले. मग एक कोंबडी पकडली तिच्या तोंडात थोडे गरम पाणी टाकले तिच्या गळ्यावर सटकन एकदा चॉपर फिरवला व तिला शेदारच्या

मोठ्या पिंपात टाकले. ती आतमधे विचित्र आवाजात ओरडत होती. त्यामागे दुसरी तिसरी. अशा सगळ्या १०-१२ कोंबड्या कापून आत मधे टाकून झाल्यावर आतून कोलाहल ऐकू येत होता. मग त्यातल्यात्यात थंडावलेली एक कोंबडी बाहेर काढली. तिचा पंजा पार ताणून लांबला होता. तिची पांढरी पिसे पार लाल झाली होती. पाहताना मला घाम फुटला पण मी निग्रहाने बघत राहीलो. कदाचित माझ्यापुढे असा एखादा माझा मित्र वगैरे मरून पडला तर पेट्रून उठणं वगैरे दूर पण कमीत कमी मी घेरी येऊन पडणार नाही हे तरी बघितलं पाहीजे. पण जो मेला त्याला पाहून मी पेटून उठेन? जो आप्त स्वकीय असा पडला असेल त्याचा माझ्यासमोर अशा प्रकारे मरण्याचा धक्का मी पचवू शकेन? हैराण झालो. म्हणलं कदाचित त्या रक्त, मांसाच्या घृणेवर विजय मी मिळवेनही पण त्या आप्ताच्या मृत्यूवर म्हणजे त्याच्या जाण्याने निर्माण झालेल्या परिस्थितीवर विजय मिळवू शकेन?
मग सुरू झाली प्रॅक्टिस. रोज त्या अशरफीमधे जाऊन कोंबड्यांची कत्तल बघणे किंवा शेजारच्या मटणाच्या दुकानासमोर थांबून सकाळी बरोबर ८ला कापला जाणारा बोकड पाहणे सुरु केले. नंतर ते पहायची सवय झाल्यावर प्राणी मरताना पाहून त्याच्या रक्त मांसाची घृणा गेली पण त्या यातनेचे काय हा प्रश्न आ वासून तसाच समोर उभा.

त्यामुळेच कधी मला नंतर मोठा झाल्यावरही नॉनव्हेज खावेसे वाटले नाही. रक्तमांसाची मला घृणा आता राहीली नाही पण प्रश्न हा पडतो त्या प्राण्याचा जसा तडफडून जीव गेला तसा माझा गेला तर तो सहन करायची माझी तयारी आहे का? केवळ दुसऱ्याला माझे मांस खाण्यासाठी हवे असेल तर ते देण्यासाठी निस्पृहपणे असे मरण स्वीकारू शकतो का? उत्तर आलं 'नाही'. म्हणूनच मी अजूनही मांशासन नाही करीत. कदाचित माझी विचारसरणी असेलही चुकीची असेल; मांस निर्माण करण्यासाठीच ते पशू निर्माण केले, वाढवले जातात वगैरे वगैरे सगळं ठीक.पण माझ्यासाठि तरी माझा विचार मला बरोबर वाटतो. कारण मला माहीत आहे कधीही त्या प्रश्नाचें उत्तर 'होय' असे देण्याइतकं माझं मन मोठं होणार नाहीये.

आमचे एक जवळचे नातेवाईक आजोबा. जे मोठे कर्तृत्ववान. त्यांनी पुण्यात येऊन मंगल कार्यालय सुरु केले. पुढे त्यांच्या मुलांना त्याच व्यवसायात आणून रुजवले. व मुलांनीही आपले व्यावसायिक कर्तृत्व स्वतंत्रपणे सिद्ध केले. ते ८०व्या वर्षापर्यंत अगदी ठणठणीत होते. प्रकृती उत्तम. आयुष्यभर पूर्णतः निर्व्यसनी. पण अचानकच त्यांना पोटात दुखू लागल्याचं निमित्त झालं आणि कर्करोगाचं निदान झालं. ३री स्टेज. त्यापुढे काही होणे शक्य नाही, बस. त्यांच्या इच्छेनुसार मुलांनी त्यांना अंतकाळासाठी कणकवलीच्या घरात नेले. तिकडे कर्करोगाने रौद्ररूप धारण केले होते. जसे एखाद्या पिसवीत चेंडू भरावेत तसे त्यांच्या पोटतले ट्यूमर वरून दिसू लागल होते. आम्ही पहायला गेलो तेव्हा ते वेदनांनी कण्हत होते जोरात. पोटात अन्न कणभरही जात नसे. त्यामुळे अंगात त्राण नाही. नंतर नंतर कण्हणे पण क्षीण झाले. कर्करोगाचे निदान झाल्यापासून ६८व्या दिवशी ते गेले. मधले ६८ दिवस कसे काढले असतील त्यांनी देव जाणे. त्यांची वेदना पाहून पुन्हा एकदा माझे मन ढवळून निघाले. अशी वेळ माझ्यावर आली तर. पण या वेळेला असा विचार केला की या गोष्टी आपल्या हातात थोडीच आहेत. आलीच वेळ तर करु सहन नाहीतर कण्हू जोरजोरात त्या आजोबासारखे. मग मन स्थिरस्थावर झाले जरा.

दरम्यानच पेपरात वरदानंद भारती यांच्या समाधीची बातमी आली. त्यांनी विष्णूच्या प्रतिमेसमोर बसून पद्मासनात समाधी घेतली. बऱ्याच वृत्तपत्रातहि ही बातमी आली होती. त्यांनी त्यांच्या काही शिष्यांना आधी बोलावून घेतले होते व समाधिविषयी सूचितही केले होते. मग मनात विचार आला असे पाहीजे आपले मरण आपल्याला पाहीजे तसे आपण बोलावू तेव्हा. कदाचित हेच मुख्य कारण असेल माझ्या अध्यात्मप्रेमामागे. केवळ मृत्यूचे भय? नाही मृत्यूवर विजय. अगदी नचिकेत्यासारखे यश नाही मिळणार पण म्हणून प्रयत्न करायला काय हरकत आहे?

पुण्याचे पेशवे

# रेजकुत्रे

मला आठवत नाही ते वर्ष कोणतं होतं पण मी आजुन गावातीलच शाळेत शिकत होतो. दुसरी किंवा तिसरित शिकत असेन बहुतेक. गावाला शिकताना शेतातिल कामाला पहिलं प्राधान्य असायचं व यातुन वेळ मिळालाच तर शाळा करायचो.

नुकताच पावसाळा संपत आलेला होता, सगळं शेत अगदी हिरवगार दिसु लागलं होतं. गावातुन शेतात जाताना नजर जाईल तेवढ्या दुर सगळीकडे धानाच्या शेताता वा-यामुळे हिरव्या लाटा उसळायचा. या कालावधीत धानाची उंची साधारणतः दिड ते दोन फुटा पर्यंत वाढलेली असते व कोवळी लोंबं आलेली असतात. मग वारा आला कि या सगळ्या हिरव्यागार धानाची जणु लाटच तयार होते. हे सगळ बघताना तिन महिन्या शेतात झिजल्याचं चिज झाल्याचं जाणवत व आनंद होतो. त्या दिवशी वडील सकाळीच गाई, बैलं व शेळ्यांचा कळप घेऊन शेतात निघुन गेले होते. मी १० च्या सुमारास जेवण घेऊन शेतात गेलो. तो वर वडील कळप घेऊन शेतात यायचे होते. ते रानातच कुठेतर कळपाला चांगाला चारा मिळाला म्हणुन चारत बसले. कळपातिल बैलाना चारणे म्हणजे जिथे कुठे चांगलं हिरवंगार गवत दिसेल तिथे बैलांचा कळप नेऊन उभा करायचा. बैल गवत चरायला लागतात. शेळ्या मात्र फार तापदायी प्राणी आहेत. त्याना गवत खाण्यापेक्षा रानातील झाडांचा पाला पाचोळा खायला जास्त आवडतं. मग अशा वेळी शेळ्या बैलांच्या कळपा पासुन दुर जाऊ नये म्हणुन जवळचं एखादं झाड पाहून त्याच्या फांदया कु-हाडीने छाटुन खाली पाडायव लागतं, म्हणजे मग आयतं मिळालेल्या पाल्यावर शेळ्या ताव मारतात व बैलाच्या कळपापासुन दुर जात नाही. वडीलानी असच एका झाडाच्या फांदया छाटुन शेळ्यांची सोय केली होती, व बैलाना पोट भरेस्तोवर गवत चरायला दिलं. एकदाचं बैलांच पोट भरल्यावर ११ च्या सुमारास वडील कळप घेऊन शेतात आले. मी मात्र मा-यावर (शेतात धान खायला आलेल्या पक्षाना हाकलण्यासाटी चार खांब गाडुन तयार केलेलं एक उंच मांडव, जिथून सगळ्या शेतावर लक्ष ठेवता येतं) बसुन पक्षी हाकलत होतो. मला दुरुनच बैलांचं कळप येताना दिसलं. मी मारा उतरुन कळपाच्या दिशेनी गेलो. पोट भरलं असल्या मुळे खेतुलीच्या (शेतातील झोपडी) शेजारीच बिलं बसलीत व रवंथ करु लागलीत. शेळ्यांच मात्र पोट केंव्हाच भरत नाही. त्या नेहमी ईकडे तिकडे भटकत असतात. पण बैलांचा कळप एकदा बसला कि त्या फार दुरही जात नाहि. नेहमी प्रमाणे शेळ्या शेजारच्या रानात शिरल्या आणि मी व बाबा जेवायला खेतुलीच्या बाहेरील बाड्डीवर ( बसण्यासाठी तयार केलेला २-३ फुट उंचीचा लहान मांडव) बसलो. आमचं जेवण चालु होतं पण शेळ्यांवरही नजर होती. कारण रानात एखादं दुसरं कुणाचं कळप दिसलं कि शेळ्या त्या कळपाच्या मागे मागे जातात, म्हणुन शेळ्यांवर सारखी नजर ठेवावी लागते.

रेजकुत्रे – (रानकुत्रे)

शेळ्या अगदी आनंदाने नेहमीच्या रानात हौदोस घालत होत्या, या झाडावर चढ, त्या झाडावरुन उड्या मार, ईकडचं पाला खा, तिकडे धाव हे सगळं शेळ्यांचं खेळ चालु होतं आणि ईकडे आमचं जेवण. आमचं जेवण उरकतच आलं होतं आणि जिकडे शेळ्या चरत होत्या तिकडे मोठ्याने झटापटी सुरु असल्याचा आवाज ऐकु आला. पुढच्या काही शेकंदात सगळ्या शेळ्या आरडा ओरडा करत रानातुन बाहेर पडल्या व शेतात आल्या. आता मात्र काहीतरी गडबड झाल्याचं आमच्या लक्षात आलं. आम्ही दोघेही हातात कु-हाडी घेऊन शेळ्यांच्या दिशेनी धावलो. आम्ही शेळ्यांपर्यंत पोहचण्या आधीच शेळ्यांच्या मागो माग रानातुन रेज कुत्र्यांचं मोठं कळप शेळ्यांच्या दिशेनी शेतात येताना दिसलं. हे रेज कुत्रे फार घातक प्राणी असतात. हि कुत्री एकटि दुकटी असली कि काहिच करत नाही, पण हि कुत्री सदैव कळपानीच फिरतात. आपण वाघाला जंगलाचा राजा म्हणतो पण वाघाची शिकार करणारी जात म्हणजे रेज कुत्री होय. रानाचा राजा जर कुण्या प्राण्याल घाबरत असेल तर ते मात्र रेज कुत्री होत. अशा या रेज कुत्र्याच्या शिस्तबद्द व जमावाने हल्ला करणा-या कळपाला समोर बघुन आम्ही दोघेही गारच झालो. तस आजपर्यंत रेज कुत्र्यानी माणसाची शिकार केलेली ऐकिवत नाहि, पण त्यांच्या रस्त्यात बाधा आणणा-याना ते सहज सोडतही नाही. आम्हाला मात्र आता काय करावे कळेनासे झाले. हे सगळं इतक्या जलद गतिने घडत होतं कि आम्हाला विचार

करायला फक्त काही क्षणांचाच वेळ मिळाला होता. आम्ही काय करावे हे सुचत नव्हतं. रेज कुत्र्याना विरोध करावा कि नाही याचा विचार चालु होता. तोवर त्या कुत्र्यांची फौज आमच्या शेतात बरिच पुढे सरकली होती व आम्ही एक दुस-याच्या तोंडाकडे बघत होतो. आणी तिकडे रेज कुत्र्यानी काही शेळ्यांवर हल्ला चढविला होता.बाकी शेळ्या मिळेत त्या वाटेनी सैरावैरा पळत सुटल्या होत्या. एक शेळी मागे ७-८ च्या संखेनी रेज कुत्री धावत होती. सगळ्या शेळ्यांचा आज फड्शा उडविणार हे चित्र स्पष्ट दिसत होतं. एवढ्यात माझ्या लक्षात आलं कि खेतुलीत परशी/पगई (परशुरामाच्या हातात असणार शस्त्र ) ठेवलेली होती. मी धावत गेलो व पागई काढुन आणली. हि पागई शेतक-यांच्या फार कामाची वस्तु आहे. तिकडे शेतं रानानी झाकलेली असतात. ब-याच हिंस्त्र प्राण्यांचा शेतामधे सर्रास वावर असतो. पागईच्या एका दणक्यात असल्या पाण्यांच्या पायाचे व मानेचे दोन तुकडे पड्ता येतं, असलं हे धारधार हत्यार आहे. मी धावत जाऊन वडिलांच्या हातात पागई दिली.

वडिलानी मला मा-यावर चढायला सांगितलं व पागई घेऊन ते पुढे रेज कुत्र्यांच्या दिशेने जोर जोरात ओरड्त व पागई फिरवत निघाले. मी अगदीच लहान असल्यामुळे मा-यावर बसुन बघण्या शिवाय काहिच करु शकत नव्हतो. हा सगळा शेळ्यांचा आरडा ओरडा जवळच्या शेतातिल लोकाना ऐकायला जात होता. आणि रानात राहुन जीवन जगणा-याना या अशा गोष्टींचा अनुभव असतो. ईकडे वडील रेज कुत्र्यांच्या दिशेन जस जसे सरकत होते तस तशी माझी छाती जोर जोरात धडधडु लागली होती. एवढ्यात तिकडे दुर शेजारच्या शेतातिल माणसं मदतिला धावुन येताना दिसली. मग मात्र मला हिम्मत आली. मी जोर जोरात ओरडुन वडिलाना येणा-या मदतीची कल्पना दिली. हा हा म्हणता शेजारिची माणसं आमच्या शेतात पोहचली, प्रत्येकाच्या हातात काही न काही हत्यार होतं. आता या सगळ्यानी मिळुन रेज कुत्र्यांवर हल्ला चढविला. वडिल पुर्ण ताकदिने पागई फिरवित होते. ती लोकं पण कु-हाड व गोरके (भाला) चालवित होती. एक दोन रेज कुत्री जखमी झालीत व पळून जाउ लागलीत. मी तुम्हाला वर सांगीतल्या प्रमाणे रेज कुत्री माणसांवर हल्ला करत नाही पण त्याच्या शिकारीत अडचन केल्यास हानी पोहचवितात. पण आता ईथे माणसांची तुकडी रेज कुत्र्यांवर भारी पडु लागली होती. आता मात्र रेज कुत्रे सैरावैरा पळु लागले होते. आणी शेळ्या खेतुलीच्या दिशेने पळत होत्या. सगळे रेज कुत्रे रानात पळाले.

रेज कुत्रे निघुन गेल्यावर आम्ही शेतात जखमी झालेल्या शेळ्याना गोळा करु लागलो. रेज कुत्र्यानी जवळपास ४ शेळ्याना जिवे मारलं होतं व काही शेळ्याना जबर जखमी केलं होतं. खरं तर शेळ्या हे आमच्या भागातिल शेतक-याचं बँक खातं असतं. एखादया वेळी पैशाची गरज पडल्यास शेळी विकुन गरज भागविली जाते. कुणी शेळी घेणारा न मिळाल्यास आधल्या दिवशीच्या रात्री गावात जाहिर केल्या जातं कि मी उदया शेळी कापणार आहे. मग दुस-या दिवशी शेळी कापुन गावातच मटन विकुन पैशाची गरज भागविली जाते. आधल्या दिवशी शेळी कापन्याचं जाहिर केल्यामुळे गावातिल बहुतेक लोकं आधीच पैसे देऊन आपला मटनाचा हिस्सा पका करुन घेतात. अशा वेळी शेळीच्या मालकाला चांगला नफा होतो. पण आज मात्र ईथे परिस्थीती वेगळी होती. आम्ही गावत जाऊन शेळ्याना रेजकुत्रानी मारल्याचं जाहिर केलं व आज रात्रीच मटन विकण्याचं सांगितलं. मग गावातील तरुणानी शेळ्या कापुन मटन तयार करायला मदत केली. गावातीळ ब-याच लोकानी मटन विकतही घेतलं पण ईथे चार चार शेळ्यांच मटन होतं. आमची बाजू कमजोर होती. लोकानी खुप कमी किमतीत मटन मागायला सुरुवात केली व मिळेत त्या किमतीत आम्ही ते मटन विकलं. तरी सुद्धा बरच मटन उरलं होतं. मग ते सगळं मटन घरी घेऊन आलो. त्या रात्री व दुस-या दिवशी सकाळ सायंकाळ मटनाची मेजवानी होती.

गावामधे हे असले रानटी शिकारी प्राण्यांचे हल्ले चालु असतात. आजही तिथे हे सगळं घडत असतं व शेतक-यांच नुकसान होतं. पण भामरागडच्या रानात राहायचं म्हटलं कि हे सगळं आलच. त्यावर पर्याय नाही.

- मधुकर

---

# दहा वर्ष

दार उघडून शरयू आत शिरली. आज तिलाच दार बंद करायचं होतं. समोरच्या घरातल्या काकूंची चाहूल लागली तसे तिने डोळे कोरडे केले, पण घाईघाईत दार लावून घेतलं. आत्तातरी कोणाशीही बोलावं असं तिला वाटत नव्हतं. पहिल्यांदा ती जेव्हा एकटीच घरी आली होती ...

आज पहिल्यांदाच ती या घरात एकटी शिरत होती. लग्नाआधी किती दिवस, आठवडे, महिने ती घरी एकटी रहायची पण कधीच त्याचं काही वाटलं नव्हतं. पण लग्नानंतर या घरात आली आणि निस्सीमशिवाय घरात कधी शिरली असं झालंच नाही. लिफ्टमधे असतानाच किल्ल्या काढून ठेवायची तिची सवय, त्यामुळे दार तिने उघडायचं आणि त्याने मागून आत शिरून दार लावायचं. तिने एक क्षण थांबून विचार केला, तिला आठवलंच नाही तिने कधी आतून दार लावून घेतलं नव्हतंच.

संध्याकाळी साडेचारला ऑफिसच्या मित्र-मैत्रीणींबरोबर ती चहा प्यायला जायची, तेव्हाच निस्सीमचा फोन आला. "शरू, मिलींदचा शेवटचा आठवडा आहे इथला. आज संध्याकाळी सगळे मित्र/कलीग्ज बाहेर जाणार आहेत जेवायला..." पुढचं काहीही न ऐकता ती म्हणाली, "मग तू पण जा. आणि एक काम कर, ऑफिसच्या शेजारी केकचं दुकान आहे, तिथून त्याच्यासाठी काहीतरी घेऊन या. नाहीतर तुम्ही पोरं असं काही करणार नाही." "तुला कसं कळतं गं मला काय म्हणायचं आहे ते?" "..... कळतं. माझ्या जेवणाची काळजी नको करूस."

घरी एकटीच स्कूटरवरून जाताना तिला काहीतरी विचित्रच वाटलं. दार स्वतःच बंद केलं तेव्हा डोळ्यांत पाणी आलं होतंच, पण ती स्वतःच हसली. "दोन-चार तासातच येईल तो परत! एवढं काय त्याचं?" आणि तसंच झालं, तिचं जेवण होतंय ना होतंय तोच फोन वाजला. "आत्ताच मिलिंदनी मला गेटपर्यंत सोडलं, आता दोन मिनीटात पोहोचतोच आहे मी घरात!" निस्सीमला बेल वाजवायची गरज पडलीच नाही. "मिलींद म्हणत होता, "आत्ताच तर तुमचं लग्नं होतंय, वर्ष पूर्ण होऊ देत मग काय ती तुझ्या फोनची वाट पहात बसणार नाही.", निस्सीम न विचारताच सांगत होता. ""आमचं लग्नं होऊन दीड वर्ष उलटून गेलंय .... " मग काही बोलला नाही तो." दोघंही हसले आणि शरयूने त्याला संध्याकाळी डोळ्यात पाणी येण्याबद्दल सांगितलं. निस्सीम तिच्याकडे पाहून फक्त हसला आणि तिला जवळ घेतलं.

शरयू पुन्हा वर्तमानात आली, पुन्हा डोळ्यांचा कडा ओल्या झाल्या. आत्ताच ती विमानतळावरून परत येत होती. आता पंधरा दिवस एकटीनेच रहायचं ... आणि तिला अचानक काही आठवलं. आई गेली तेव्हा ती स्वतःशीच विचार करत होती, "मलाच का हे सगळं सहन करावं लागतं?" रात्री सामसूम झाल्यावर हा विचार करताना ती कित्येकदा ओल्या उशीवरच झोपली होती. आता मात्र तिला आईबद्दल खूप वाईट वाटलं "... ती तर दहा वर्ष राहिली, फक्त माझ्यासाठी .... "

३_१४ अदिती

---

श्री गणेशाय नमः। सचिनं वन्दे।
अथ सिडनीपुराणम।




२००३-२००४ चा ऑस्ट्रेलियन समर, बोर्डर-गावस्कर ट्रॉफीचा शेवटचा सामना. ऑस्ट्रेलियाचा सर्वात यशस्वी कर्णधार स्टीव्ह वॉचा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधला शेवटचा सामना त्यामुळे या सामन्याकडे अख्ख्या जगाची नजर वेधलेली होती. एकीकडे मागल्या खेपेला भारतात झालेल्या मानहानीकारक पराभवाची सव्याज परतफेड करून त्यांच्या कप्तानास सन्मानपूर्वक निरोप देण्यास उत्सुक ऑस्ट्रेलियन संघ. तर समोर विश्वचषकाच्या अंतिम सामन्यातील अपमानकारक पराभवाने चवताळलेला, बेंगाल टायगर च्या नेतृत्वाखालील भारतीय संघ. मालिका १-१ बरोबरीत. एकीकडे अनिल कुंबळे भयंकर फॉर्मात तर दुसरीकडे ब्रेट ली सपशेल अपयशी! रिकी पॉण्टींगच्या नावावर दोन, तर राहुल द्रवीडच्या नावावर एक द्विशतक लागू. गांगुली, लक्ष्मण, सेहवाग सर्वांच्या नावावर एकेक शतक लागू. एकूण काय तर सिडनी कसोटी रंजक ठरणार याबाबत जराही शंका नव्हती. ऑस्ट्रेलियन मीडियाने स्टीव्ह वॉला तर अक्षरशः डोक्यावर घेतले होते. या सर्व गोंधळात साहेबांचं कुठेच नाव नव्हतं! सचिनच्या त्या मालिकेतील पहिल्या तीन सामन्यांतल्या धावा होत्या:
ब्रिस्बेनः ०(३) आणि खेळला नाही.
ॲडलेडः १(६) आणि ३७(५९) आणि
मेलबर्नः ०(१) आणि ४४(७९).
पण तरी मैलोन् मैल प्रवास करून केवळ त्याला बघण्यासाठी येणारे ऑस्ट्रेलियन चाहतेही होते. कारकीर्दीचा आलेख घसरत जात असल्यामुळे टीकाकारांना आयतंच मोकळं मैदान मिळालं होतं. पण सामन्याच्या पहिल्या दिवशी ड्रेसिंग रूम मध्ये बसलेल्या सचिनचा चेहरा निर्विकार होता. त्या निर्विकार चेहऱ्यामागे एक वादळ दडलं होतं हे पुढल्या दोन दिवसात जगानं पाहिलं!

सचिनने ५ डावांमध्ये केवळ ८२ धाव्या जमवाव्यात हे चाहत्यांच्या दृष्टीने अपयशच! पण केवळ त्या मालिकेतच नव्हे तर भारताच्या २००३ विश्वचषकाच्या अंतिम सामन्यातील पराभवानंतर तो एकूणच थोडा डाऊन झाला होता. तो पराभव त्याच्या जिव्हारी लागला होता. पूर्ण वर्ल्डकप त्यानं जवळजवळ एकहाती खेचलाच होता. पण अंतिम सामन्यात संघ कसोटीस न उतरल्यानं भारताचा पराभव झाला आणि सचिनचं एक स्वप्न अपूर्णच राहिलं.. १९९६ सालीही असंच घडलं होतं पण तेव्हा नसता माज नडला होता.. वर्ल्ड कप जिंकायची सुवर्णसंधी केवळ 'लाहोरला फायनल खेळायची नाही' या अट्टाहासापायी सोडून दिली होती भारतीय संघाने(नक्की? की मॅनेजमेंटने? आणि कंट्रोल बोर्डाने की आणि कुणी??) असो. २००३ वर्ल्डकप नंतर सचिनचा खरंच बॅडपॅच सुरू झाला. वर्ल्डकपनंतर न्यूझीलंड भारतात आली दोन कसोटी सामने खेळायला. त्या दोन सामन्यांत द्रवीडने एक द्विशतक आणि सेहवाग, गांगुली, लक्ष्मण, ॲस्टलच काय तर रिचर्डसन, विन्सेंट, मॅकमिलन, स्टायरीस या सगळ्या पहिली दुसरीतल्या पोरांनीही एकेक शतके लावली! तर सचिनच्या त्या दोन सामन्यांतल्या धावा होत्या ८,७,५५ आणि १!! तो नुसता धावांच्या बाबतीतच बॅडपॅच मध्ये नव्हता तर त्याची ताकद असणारे कव्हर ड्राईव्हज, स्क्वेअर ड्राईव्हज

यांचं टायमिंग नीट बसत नव्हतं. हातातील कामे सोडून बघत बसावे असे त्याचे ऑफसाईडची भक्कम तटबंदी चिरत जाणारे नेत्रदीपक फटके निष्प्रभ ठरत होते. चेंडूच्या टप्प्यावरून त्याच्या ट्रॅजेक्टरीचा अचूक वेध घेणारी ती गरूडाची तीक्ष्ण नजर जणू धोका देत होती त्याला. चेंडू थोडा 'आऊटसाईड दी ऑफ' पडला की त्याच्या वेगाची जराही तमा न बाळगता मारलेले, पॉईंट आणि कव्हरला जरी जॉण्टी आणि गिब्ब्स उभे राहिले तरी त्यांना हताशपणे बघत बसावं लागेल असे ते त्याचे ते प्रेक्षणीय स्क्वेअर ड्राईव्हज जणू इतिहासजमा झाले होते! चेंडू थोडा फुललेन्ग्थ पडणार असा अंदाज आला की क्षणार्धात पुढला पाय थोडा पुढे सरसावून त्यावर अख्ख्या शरीराचा तोल सांभाळत मारलेले, अंबरात सौदामिनी कडाडल्याचा आभास निर्माण करणारे, अंगावर काटा आणणारे त्याचे कव्हर ड्राईव्हज आता मात्र अलगद त्याच्या बॅटची कड घेऊन स्लिप किंवा गलीतील क्षेत्ररक्षकाच्या हाती विसावत होते. हातहातभर चेंडू वळवणाऱ्या शेन वॉर्नला सेटल होण्यापुरताही वेळ न देणाऱ्या त्याला, स्टुअर्ट मॅकगिल (त्याचेही लेगस्पिन दर्जेदारच म्हणा..) ट्रबलवत होता! एकूण ऑफस्टंपबाहेरच्या चेंडूंनी सचिनची विकेट सहजरित्या मिळत होती. आणि त्यात भरीस भर म्हणून काय तर त्याच्याविरूद्धची पायचितची अपील्स उचलून धरली जात होती तर कधी सरळ चेंडूंना पॅडींग करण्याची दुर्बुद्धी त्याला होत होती.

अशा सगळ्या परिस्थितीत सिडनी कसोटी ही सचिनची खरीच कसोटी होती. मागल्या खेपेस (१९९१-९२ साली) याच मैदानावर १४८ धावा काढून त्याने टीकाकारांची थोबाडे बंड केली होती. यावेळेस मात्र त्याला आल्याआल्याच लीने दोन वेळा दोन अप्रतिम आऊटस्विंगर्सवर गंडवले. दोन-तीन षटकांनतर मॅकगिलचा एक अप्रतिम वळलेला - जवळजवळ काटकोनात वळलेला - चेंडू सचिनला बीट करून गेला! सचिनला इतका गंडताना मी पहिल्यांदाच पाहत होतो. इतर वेळी हाच चेंडू त्याने 'डान्सिंग डाऊन द ट्रॅक' करून, टप्प्यावर उचलून लॉंगऑफच्या वरून स्टॅण्ड्समध्ये भिरकावून दिला असता. पण हाच असतो बॅडपॅचचा परिणाम. इतर वेळी कॉन्फिडण्टली मारले जाणारे फटके अशा वेळी रिस्की वाटू लागतात. मॅकगिलचा तो चेंडू अप्रतिमच होता. एखाद्या कुंभारानं फिरत्या चाकावर मडके अलगद हाताने फिरवावे तसा मला भास झाला अगदी त्याचा तो हातभर वळलेला चेंडू पाहून. (आणि त्याक्षणीच मी मॅकगिलचा फॅन झालो. असो.) त्याक्षणी तो चेंडू जर सचिनच्या बॅटची कड घेऊन गेला असता तर आज कदाचित चित्र वेगळेच असते. कधीकधी अशा लहानसहान गोष्टीच कारकीर्दीची दिशा ठरवू शकतात. खेळांमध्ये नशीबपालट हा अशाच बॅटची कड आणि तिची विड्थ, गोलपोस्ट आणि त्याचा थिकनेस, रेसट्रॅकचा एखादा कॉर्नर आणि त्याचा अँगल यावर अवलंबून असतात. इथंही तसंच घडलं खरं. देवाचे आपण आभार मानायला हवेत की त्या मॅकगिलने त्याला त्या अप्रतिम लेगस्पिनवर बीट केलं. त्यावेळी सचिनच्या चेहऱ्यावरचे भावही बोलके होते. स्वतःवर थोडासा नाराज झाल्यासारखा वाटला तो तेव्हा. कदाचित त्यानं मॅकगिलच्या या चेंडूवर बीट होणं हे कारण ठरलं आणि त्याच्या करिअरची दिशाच बदलली! माझ्यामते, या मॅकगिलच्या चेंडूपासूनच "ऑफसाईडबाहेरच्या चेंडूला स्पर्शच करायचा नाही! ऑफबाहेरचे चेंडू आपल्याला धोका देतायत सध्या, तर आपण त्यांपासून दूरच राहिलेले बरे" असं त्यानं मनास समजावलं आणि आपली कारकीर्दीतील सर्वोच्च खेळी - २४१* - बांधली, उभारली, साकारली. कसोटीच्या दुसऱ्या दिवशी, भारताच्या डावाच्या १७०व्या षटकात, ३९५ व्या चेंडूचा सामना करत जेव्हा त्याने २००वी धाव घेतली, तेव्हा जवळजवळ ४०,००० लोक एससीजीवर (आणि मी माझ्या घरात) उभे राहून एका महान खेळियाला आणि त्याच्या तितक्याच महान खेळीला मानवंदना देत होते. ही खेळी म्हणजे ९ तासांच्या अथक परिश्रमांचे फलित होते. त्याची एक तपश्चर्या पूर्ण झाली होती. तो तब्बल ५३२ मिनीटे खेळपट्टीवर तळ ठोकून होता. या नऊ तासात साऱ्या जगाला दिसलेला सचिन म्हणजे नेहमीचा 'दे दणादण' फटकेबाजी करणारा सचिन नव्हता. तर सावकाशपणे अतिशय संयमाने एक एक धाव जोडत हे द्विशतक त्यानं पूर्ण केलं होतं. मुळात हे शतकच त्याच्यासाठी अतिशय महत्वाचं होतं! सचिन संपल्याच्या टीका करणाऱ्यांना त्याचं सडेतोड उत्तर होतं ते. त्यानं शतक पूर्ण झाल्यावर असा काही पंच मारला हवेत, जणू तो त्याच्या टीकाकारांना सांगत असावा, की आजही मी फक्त मला हवेत तेच शॉट्स खेळून शतक लावू शकतो! हे पहा सचिनचं सेलिब्रेशन, अनुक्रमे शतक आणि द्विशतक पूर्ण झाल्यावर:




वरकरणी, स्कोअरबोर्डवरून आपल्याला कल्पना नाही येणार त्याने त्या मॅरेथॉन खेळीत घेतलेल्या अथक परिश्रमांची. ब्रेट ली, नेथन ब्रॅकन, जेसन गिलेस्पी, स्टुअर्ट मॅकगिल सर्वांनी आपला गृहपाठ व्यवस्थित केला होता. ऑफस्टंपच्या बाहेरच्या चेंडूंची नुसती खैरात वाटली जात होती. या अपेक्षेने, की सचिन काहीतरी छेडछाड करायला जाईल आणि आपली विकेट देऊन बसेल! पण त्यांना बिचाऱ्यांना काय कल्पना आपण कुठल्या निश्चयाच्या महामेरूसमोर उभे आहोत! कांगारूंनी रचलेल्या या सापळ्यात आपण फसायचे नाहीच असं ठरवूनच तो जणू खेळत होता. त्याने इतके चेंडू सोडलेले मी आयुष्यात प्रथमच पाहत होतो! सुरूवातीला थोडं विचित्र वाटलं पण तो ३०-४० च्या आसपास पोहोचेपर्यंत अंदाज येऊ लागला होता की पुढं काय वाढून ठेवलंय या कांगारूंच्या ताटात आणि मी टीव्हीसमोरून अजिबात हललो नाही मग! सचिनला असं कठोर मनोनिग्रहाने ऑफसाईडबाहेरचे चेंडू सोडताना पाहून मला अतिशय आनंद होत होता. यासाठी की आपला सचिन धावांमध्ये पुन्हा परततोय. नेहमी ज्या मार्गाने तो सहजरित्या धावा जमवी, तोच मार्ग धावा जमवण्यासाठी आज तो टाळत होता. आणि माझं असं प्रामाणिक मत आहे, की तो सचिन होता म्हणूनच त्याला हे जमलं. बाकी ऐऱ्यागैऱ्याचं काम नव्हे ते! अगदी याच कारणासाठी मी त्याला माझ्या मागच्या लेखात 'निश्चयाचा महामेरू' म्हटलं होतं. आता त्यानं फॉर्म मध्ये परत येण्यासाठी स्वीकारलेला हा मार्ग योग्य होता की नाही हा वादाचा विषय ठरू शकेल. अगदी बॉयकॉटपासून बेनॉपर्यंत सर्वच यावर चर्चा करत होते. पण मला त्याच्याशी काहीही देणंघेणं नव्हतं. त्या दिवशी एक वेगळाच सचिन जगाला दिसला. अतिशय मनोनिग्रही, आपल्या निर्णयावर ठाम! प्रसंगी लीचे बाऊन्सर्स अंगावर घेणारा. प्रसंगी अगदी ज्युसी टेम्प्टिंग हाफ व्हॉलीज् केवळ ड्राईव्हज् मारायचे नाहीत म्हणून दुर्लक्ष करून सोडून देणारा. आणि अशा सचिनला बघायला मिळालं याचा अपार आनंद मला झाला होता! मी आनंदाच्या भरात बाबांना म्हटलं, "बाबा, आपला सचिन आता कोण्णाला ऐकत नाही.." त्याने सोडलेल्या प्रत्येक चेंडूत मला बॅडपॅचमधून बाहेर पडलेला सचिन डोळ्यांसमोर दिसत होता अगदी! लोक वाट्टेल ते बडबडतात अगदी. पहिल्या दिवसाचा खेळ संपल्यावर "पार बोअर केलान सचिनने आज.. अरे सोडतो कसले हाणायचे सोडून.. या सचिनला पण काय झालंय ना.. अरे काय ते.. किती कूर्मगति" असल्या कमेंट्स पास होत होत्या. पण त्या खुळयांना काय कळतंय, टाकीचे घाव सोसल्याशिवाय दगडाला देवपण येत नाही!



ऑफसाईडचे चेंडू वर्ज्य म्हणून मग त्याने नवनवीन इनोवेशन्स वापरले. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे मिडल स्टंपचा गार्ड घेतला. दोन तीनदा त्याला मोह आवरता आला नाही ऑफबाहेरचे चेंडू स्क्वेअर ड्राईव्ह करण्याचा पण तेवढंच. मग मात्र त्यानं कुण्णाला ऐकलं नाही. चेंडू ड्राईव्ह करण्याऐवजी कट करण्यावर त्यानं भर दिला. पेडल स्वीप्स, रिव्हर्स स्वीप्स, लेट लेट कट्स वापरले. (इथं 'लेट' चुकून दोनदा टाईप झालेला नाही हे लक्षात घ्या!) त्याचा भर मात्र लेगसाईडला स्कोअर करण्यावरच होता. स्टीव्ह वॉने सचिनसाठी नेहमीच ७-२ फील्ड लावली आणि सचिनने त्याचा पुरेपूर फायदा उठवला! मॅकगिलने जरा म्हणून शॉर्टलेन्ग्थ दिली की साहेब बॅकफूटवर गेलेच आणि एखाद्या बापाने आपल्या पोरीला छेडणाऱ्या टपोरी पोराच्या कानाखाली साण्णकन् हाणावी तशा आवेशात हाणलाच एक जोरदार पुल!! ब्रॅकन मुळात लेफ्ट आर्म टाकत असल्याने त्याचे चेंडू अ‍ॅक्रॉस येत होते आणि त्यामुळे जरा का फुललेन्ग्थ दिली की थोडं 'शफल अक्रॉस' करून हलकेच चेंडूला दिशा देत मारलाच एक नितांतसुंदर फ्लिक!! अगदी मिडल-ऑफचे चेंडू - मिडल-ऑफ हां, मिडल-लेगही नाही - तो शेवटच्या क्षणी 'शफल अक्रॉस' करून, मनगट वळवून फ्लिक करत होता. सगळ कसं.. अंडर टोटल कंट्रोल!! ब्रॅकनविरुद्ध फ्लिक्स, ऑन ड्राईव्हज तर मॅकगिलविरूद्ध पुल आणि स्वीप या फटक्यांचा त्यानं सढळहस्ते वापर केला! त्यात अखंड पृथ्वीतलावर फक्त त्यानेच मारावेत असे त्याचे ते पेटंट स्ट्रेटड्राईव्हज् सुद्धा दिमतीला होतेच! एकूण काय तर ऑफसाईड म्हणजे स्कोअरींगसाठी वर्ज्य एरिया! नाही म्हणजे ऑफला एकही फटका तो खेळला नाही असं नाही. पण शक्यतो ड्राईव्हज वर्ज्य! आणि त्यामुळेच ही खेळी ग्रेट ठरली! म्हणजे लूज बॉल मिळेपर्यंत वाट बघायची आणि त्यातही ऑफस्टंपच्या बाहेर लूज बॉल मिळाले तरी त्यांच्या नादाला जायचं नाही! केवढा तो मनोनिग्रह, केवढा तो संयम! पुढील तक्ता पाहिल्यास आपल्याला याचा बरोब्बर अंदाज येईल. (आकडे पहिल्या दिवसअखेरचे आहेत. सचिन त्यावेळी १५६ चेंडूत ७३ धावांवर नाबाद होता. पण हे आकडे त्याच्या मनोनिग्रहाचा अंदाज देण्यास पुरेसे आहेत!)

Total balls faced - 156
Balls outside off stump - 101
Runs scored - off side - 19
Runs scored - leg side - 54
Boundaries - off side - 3
Boundaries - leg side - 9

(ऑफस्टंपबाहेर टाकलेल्या १०१ चेंडूंपैकी त्याने सोडले किती हेही दिले असते तर आणखी चांगला अंदाज बांधता आला असता त्याच्या मनोनिग्रहाचा! माझ्या मते यातले कमीत कमी ५० तरी सोडले असावेत त्याने.)

अर्थात सचिन एका बाजूला आपला पूर्ण वेळ घेत फॉर्म मध्ये परतत असताना, दुसऱ्या बाजूने तितकाच जबाबदारीचा खेळ करणाऱ्या खेळाडूची गरज होती. सचिनचा स्ट्राईकरेट कमी होता आणि त्यात भारताला वेगाने धावा काढणेही तितकेच आवश्यक होते. मालिका जिंकण्यासाठी ही कसोटी जिंकणे अत्यंत गरजेचे होते आणि कसोटी जिंकायची तर लवकरात लवकर जास्तीत जास्त धावा जमवून डाव घोषित करायचा होता. त्यात चोप्रा, सेहवाग, द्रवीड तिघे ७० धावांच्या अंतरात तंबूत परतले! भारत तीन बाद १९४. त्यावेळी एका मजबूत आधारस्तांभाची गरज होती भारतीय संघाला. सचिनने एक बाजू लावून धरली असताना समोरून पडझड थांबवणे अत्यावश्यक होते आणि तितकेच आवश्यक होते वेगाने धावा जमवणे. अशावेळी गांगुलीने स्वतःऐवजी लक्ष्मणला ५व्या क्रमांकावर फलंदाजीस पाठवले. आणि तिथून पुढे अख्खा एक दिवस जे दृष्य पाहायला मिळालं त्याची गोडी खरंच अवीट होती. सचिन एकाबाजूला रामायण महाकाव्य रचत होता तर दुसऱ्या बाजूला लक्ष्मणाने महाभारत रचलं! रामाची धीरगंभीरता, संयम आणि कठोर मनोनिग्रह सचिन क्षणोक्षणी दाखवत असताना, दुसऱ्या बाजूस लक्ष्मण कुरूक्षेत्रावर रणात उतरलेल्या पार्थासारखा तेजस्वी, आक्रमक पण तितकाच संयमी भासत होता. एकाच दिवशी एकाच सामन्यात एकाच वेळी दोन एपिक इनिंग्ज पाहायला मिळणं म्हणजे 'अहो भाग्यम्!' आपली विकेट घालवायची नाही अशा निश्चयाने खेळतानाच ब्रेट ली या प्रतिस्पर्ध्यांच्या हुकुमी एक्क्यावरच लक्ष्मणने आक्रमण केले! अक्षरशः ८ च्या ॲव्हरेजने लीला फोडून काढत होता लक्ष्मण. सचिनला त्याची मोलाची साथ लाभली म्हणूनच सचिन ही महान खेळी रचू शकला! आणि सचिन खुल्या दिलानं ते मान्यही करतो. लक्ष्मण एका बाजूला ८ च्या ॲव्हरेजने फोडत असल्यामुळे सचिनला दुसऱ्या बाजूस सावकाश खेळण्याची संधी मिळाली. ती लढत मैदानापुरती मर्यादित उरली नव्हती तर तो एक उच्च दर्जाचा माईंडगेम झाला होता. स्टीव्ह वॉने या दोघांची भागीदारी मोडण्यासाठी हरतऱ्हेचे प्रयत्न केले. सातत्याने बॉलर्स बदलत राहिला, ॲटॅकिंग फील्डींग लावली, स्लेजिंग वापरलं काय काय नि काय काय! पण दोघांनी ऑस्ट्रेलियन ॲटॅक कुटला अगदी. सचिनच्या शतकापाठोपाठ लक्ष्मणनेही शतक झळकावले. त्याचे पेटंट फ्लिक्स, इनसाईड आउट कवर ड्राईव्हज पुनःपुनः पाहून डोळ्यांचे पारणे फिटत होते! शेवट १७८ धावांची आणखी एक 'व्हेरी व्हेरी स्पेशल' खेळी रचून तो बाद झाला. पण तोपर्यंत त्यानं आपलं काम व्यवस्थित केलं होतं. सचिनला सपोर्टिंग इनिंग्ज असं आज त्या इनिंग्जबद्दल म्हटलं जात असलं तरीही लक्ष्मणची ती खेळी त्याच्या इतर खेळींइतकीच स्पेशल, स्वतःचा ठसा उमटवणारी होती. दोघांनी चौथ्या विकेटसाठी ३५३ धावांची भागीदारी करत नवा इतिहास रचला आणि भारत तोपर्यंत सुस्थितीत पोचलेला होता.





दीडशतक पूर्ण झाल्यावर सचिनला आपला हरवलेला आत्मविश्वास परत गवसल्याची चिन्हे दिसू लागली. एखाद दुसरे ड्राईव्हज दिसू लागले! त्यानं ब्रॅकनला मारलेला एक अप्रतिम लीनिंग कव्हर ड्राईव्ह म्हणजे 'तो' सचिन परत फॉर्मात आल्याची पावती होती! सचिनच्या बॅटमधून तेच बहारदार फटके परत वाहू लागले आणि माझ्यासारख्या सचिनभक्तांच्या डोळ्यांतून अश्रू!! सर्व प्रयत्न करून थकलेल्या बिचाऱ्या कांगारूंकडे हताशपणे बघण्याशिवाय काहिएक पर्याय उरला नव्हता. स्टिव्ह वॉ तर म्हणत असेल, हीच मॅच मिळाली का रे तुला, माझी शेवटची मॅच? का सगळा प्रसिद्धीचा झोत आपल्याकडे घेतोयस वळवून? माझ्यासाठी राख काहीतरी? तीच गत ली गिलेस्पी, मॅकगिल, गिलख्रिस्ट, पॉण्टिंग साऱ्यांचीच! सारेच ऑस्ट्रेलियन खंदे वीर निष्प्रभ झाले होते एका भारतीय ताऱ्यापुढे! त्यांनी अक्षरशः हात टेकले, गुडघे टेकले! ते तरी बिचारे काय करणार म्हणा.. जेव्हा सचिन पूर्ण भरात खेळत असतो तेव्हा तुमच्या हातात काहीच नसतं.. हताशपणे बघण्याशिवाय!



तिसऱ्या दिवशी सकाळी ७०५/७ या धावसंख्येवर भारताने डाव घोषित केला तेव्हा सचिन २४१ धावांवर नाबाद होता! तब्बल ६१३ मिनीटे, ४३६ चेंडूत २४१ धावा, ३३ चौकार आणि एकही षटकार नाही! पुढे भारताने ऑस्ट्रेलियाला ४७४ धावांत गुंडाळून फॉलोऑन न देता पुन्हा फलंदाजी स्वीकारली. सचिनने पुन्हा ६० धावा काढल्या तर राहुल द्रवीडने ९१ धावांची एक अविस्मरणीय खेळी करत भारताला ४३ षटकांत २११ धावांचा पल्ला गाठून दिला. द्रवीड शतकाच्या उंबरठ्यावर असताना ब्रेट लीच्या एका तेज तर्रार बाऊन्सरने त्याच्या कानाचा वेध घेतल्याने भारताने डाव घोषित केला आणि ऑस्ट्रेलियासमोर सुमारे १०० षटकांत ४४३ धावांच आव्हान ठेवलं. पण शेवट स्टीव्ह वॉने ८० धावांची झुंझार खेळी करून सामना वाचवलाच! शेवटच्या दिवसाचा तर क्षणन् क्षण थरारक होता. कुंबळेचा खतरनाक स्पेल, पार्थिव पटेलचं स्टीव वॉ ला डिवचणं, गांगुलीची आक्रमकता, स्टीव्ह वॉने घेतलेल्या प्रत्येक धावेवर होणारा टाळ्यांचा कडकडाट सर्व काही विलक्षण! घरात टीव्हीवर बघताना सुद्धा थरार जाणवत होता! त्या क्षणी तिथं एससीजी वर उपस्थित प्रेक्षक तर भाग्यवंतच खरे! स्टीव्ह वॉच्या खेळीने ऑस्ट्रेलियानं सामना वाचवला खरा पण मालिका १-१ अशी बरोबरीत सुटल्यानं बोर्डर-गावस्कर ट्रॉफी भारताकडेच राहिली! स्टीव्हला मालिकाविजयानं निरोप द्यायचं कांगारूंचं स्वप्न सचिननं हाणून पाडलं होतं आणी स्टिव्हला स्वतःलाही ही जाण होती, त्यामुळेच तर त्यानं सचिनला उद्देशून 'यू आर ॲन इन्स्पिरेशन!' असे गौरवोद्गार काढले! सिडनी कसोटी खेळाडूंनी दाखवलेल्या फायटींग स्पिरीटमुळे गाजली. शेवटच्या क्षणापर्यंत लढला गेलेला सामना अनिर्णित राहिला खरा बट क्रिकेट वॉज द विनर देअर!!

असो. भारताने पहिला डाव घोषित केल्यावर सचिनला २४१* या धावसंख्येवर आनंदाने बॅट उंचावत पॅव्हेलियनमध्ये परतताना पाहून त्याच्याइतकाच आनंद त्या ४०,००० प्रेक्षकांना झाला होता, कारण एकही जण आपल्या खुर्चीत बसलेला नव्हता. हर्षा भोगले, शास्त्री, अक्रम, सिद्धू सगळेच उभे राहून त्याचं अभिनंदन करत होते. त्यां सर्वांनीच काय माझ्यासारख्या कित्येक जणांनीदेखील आपल्या घरात टिव्हीसमोर उभे राहून टाळ्या वाजवल्या असतील! स्टीव्ह वॉच्या शेवटच्या कसोटीवर आता फक्त त्याचंच नाव नव्हतं. ती कसोटी सुरू होण्यापूर्वी स्टीव्ह वॉचा एवढा उदो उदो झाला असताना, मात्र दोन दिवसात प्रसिद्धीचा प्रकाशझोत आपल्याकडे वळवून घेण्यात यशस्वी होणं म्हणजे घरातल्या दिव्याचा झोत वळवून घेण्याइतकं सोप्पंय होय म्हाराजा? जाईल तिथं इतकं प्रेम माझ्या माहितीत तरी आणखी कुठल्याच खेळाडूच्या नशिबात केव्हाच आलं नाही! आणि जगाने इतका उदो उदो करूनही या विनम्र माणसाचे पाय सदैव जमिनीवरच राहिले!! आणि म्हणूनच तो एक महान खेळाडू

आहे. भलेही त्याची ही खेळी लक्ष्मणइतकी मॅजेस्टिक नव्हती. पण अपयशाच्या काट्याकुट्यातून जाणाऱ्या वाटेवरून मार्गक्रमण करत असलेल्या नवशिक्या खेळांडूसाठी नक्कीच आदर्शवत होती. त्याच्या या एका खेळीनं कठीणसमयी खचून न जाण्याची मानसिकता आमच्या अंगी बाणवली! वेळ पडल्यास अंगावर संकटांचा मारा झेला पण प्रतिकार न करताच पराभूत होऊ नका ही शिकवण दिली. कठोर मनोनिग्रह, संयम आणि चिकाटी या गुणांची कास धरली असता मोठ्या दिव्यांतून सुखरूप बाहेर पडता येतं हेही आमच्या तरूण मनावर बिंबवलं! आणि त्याचबरोबर यशाची कितीही उत्तुंग शिखरे पादाक्रांत केलीत तरीही पाय होमक्रीजमध्ये फर्म असायला हवेत असा उपदेश आपल्या खेळातून आणि वागण्यातून तो नेहमीच देत आला आहे!

सचिन आजही त्याच्या या खेळीला आपल्या सर्वोत्तम खेळींपैकी एक मानतो. कालौघात अनेकांना त्याच्या या खेळीचा विसर पडेलही कदाचित. एका साधारण क्रिकेटरसिकासाठी शारजातल्या त्याच्या वादळी, झंझावाती १४३ धावांच्या खेळीइतकी ही २४१* धावांची खेळी संस्मरणीय नसेलही कदाचित. पण स्टीव्ह वॉला एकदा विचारा, सचिनची तुझ्या दृष्टिने सर्वोत्तम खेळी कोणती.. तो नक्कीच सांगेल.. जिथं मी संपलो तिथं नवा सचिन सुरू झाला.. नक्कीच सिडनी कसोटीतील २४१*!
आणि खरंच.. जिथं लारा, स्टीव वॉ सारखे दिग्गज संपतात.. तिथंच आपला सचिन सुरू होतो!!

॥इति सिडनीपुराणम्॥

(सर्व फोटो आणि आकडेवारी क्रिकइन्फोवरून साभार)

-- मेघवेडा

# सहज सुचल म्हणुन

फार वर्षांपुर्वी एका वृध्दाश्रमाला भेट देऊन आल्यावर, तिथल्याच एका देवळाच्या पार कट्यावर एकटाच बसलो होतो आणि तेवढ्यात वा-यावर हेलकावे घेत एक पान गळलेलं बघताना सुचलं.

१.

त्या झाडाला देखील आता,
माझं असणं नकोसं वाटलं.
कसं वा-याच निमित्त करुन,
मला एकटं टाकलं.
याचा श्वास मी होतो.
याचा ध्यास मी होतो.
उन,वारा पाउस झेलत,
याला मी जगवलं
बघा तुम्हीच,
आता त्यांनी कसं वागवलं.
त्या झाडाला देखील आता,
माझं असणं नकोसं वाटलं.
कसं वा-याच निमित्त करुन,
मला एकटं टाकलं.

२.

घातले सुखाने,
हे अवघड उखाणे.
सोडवितो जन्मभर,
तुझ्या आठवाने.

तुटली माळ,
विखुरले मोती.
उरला धागा,
केवळ हाती.

- जयपाल

# जन्मा येण्या कारण तू..

जन्मा येण्या कारण तू, प्रितीचं अभिसारण तू
सारे जीवन फुलवणारी, सुखाची पाखरण तू

वसंताचं आगमन तू, कंच हिरवा श्रावण तू
सावळ्या नभी फुललेलं, शरदाचं चांदण तू

सळसळणारं यौवन तू, निळंजांभळं गगन तू
क्षितिजावरती पसरणारं, लोभस सूर्यकिरण तू

लावण्याची उधळण तू, नात्यांमधली गुंफ़ण तू
अनेक धागे बांधणारं, एक अतूट बंधन तू

दुःखाला लिंपण तू, मायेचं शिंपण तू
गंधभरल्या फुलाफुलांचं, सुंदर मोहक अंगण तू..

शुभशकुनांचं तोरण तू, मांगल्याचं औक्षण तू
झिजतानाही दरवळाणारं, देव्हाऱ्यातलं चंदन तू

भाळावरचं गोंदण तू, नवरत्नांचं कोंदण तू
विसवण्या या जगताला गे, मिळालेलं आंदण तू

- प्राजु

# हताश औदुंबर

(बालकवींचा क्षमाप्रार्थी)

ऐल तीरावर लाल शिरावर,लुकलुकता घेवून
निळा पांढरा थवा चालला, रजकण पांघरून
ढोल-चौघडे, बोल बडबडे, खाकी गर्दी पुढे
सरावल्यांची पोपटपंची, गगन भेदुनी उडे

पैल तीरावर पत्र घरावर, तुळशीचे ठेवून
बेत शिजविला,देह निजविला, काळघुटी घेवून
अभागीनीचे कुंकूम पुसता, अचेतन ती पडे
पोशिंद्याचा बाळ भुकेला, तिच्या उराशी दडे

दोन तीरांना अभये धारा, विलगे निरंतर
पाने गाळुनी मुंडण करीतो, हताश औदुंबर

गंगाधर मुटे
.........................................
("त्या" सर्व हजारो स्वर्गिय शेतकऱ्यांना
भावपुर्ण श्रद्धांजलीसह सादर समर्पित.)

गंगाधर मुटे

---

# उ. न. क. अर्थात उपेक्षीत नवरे कमिटी

नुकतंच महिलांना ३३% आरक्षण देणाऱ्या विधेयकाला संमती मिळाली. ह्या आरक्षणाचे भविष्यात होणारे भयानक परिणाम ओळखून लालू प्रसाद यादवांसारख्या काही द्रष्ट्या नेत्यांनी ह्याला विरोध केला, पण मध्यंतरी बराच काळ ते नुसतेच बोलविते धनी असल्याने त्यांचा आवाज लोकांपर्यंत पोहोचला नाही. ह्या आरक्षणाचा आणि महिला मुक्ती चळवळीचा फार जवळचा संबंध आहे. महिला सक्षमीकरणाची चळवळ साधारण ७० च्या दशकात सुरू झाली. पण त्या आधीही आपल्याला अनेक ठिकाणी लाक्षणिकरित्या सक्षम आणि भक्कम महिला दिसतंच होत्या. असो. आजचा मुद्दा हा नव्हे. महिला मुक्ती चळवळी इतकाच, किंबहुना त्याहूनही जुना इतिहास पुरूषमुक्ती चळवळीला आहे. ह्या चळवळीची बीजे जेंव्हा पहिल्या पुरूषाने विवाह केला तेव्हाच रोवली गेली. त्यानंतर ह्याविरूद्ध ब्र काढण्याइतपत हिंमत गोळा करण्यातच पुरूषांची हजारो वर्षे गेली. त्यामुळे अशा पिडीत, दु:खी आणि पिढीजात गुलामगिरीची जाणीव घेऊन जन्मास येणाऱ्या समस्त पुरूषांसाठी आम्ही मुक्काम पोस्ट बंगळूरू इथे असताना आमचं लग्न व्हायच्या आधीच मोठ्या दुरदृष्टीने उ. न. क. म्हणजेच 'उपेक्षीत नवरे कमिटी' ह्या अखील भारतीय समितीची स्थापना केली. कारण आमच्याही नाकात वेसण आणि हातात दळणाची पिशवी देण्याचं कुटील कारस्थान घरी शिजत होतंच. न जाणो पुढे मागे आपणांसही गरज पडेल हा हेतूही ह्या संस्थेच्या स्थापने मागे होताच.

आज ह्या कमिटीच्या स्थापनेला अजून एक दिवस पूर्ण झाला. अर्थात लोकांना ह्यात काही विशेष वाटणार नाही पण सचिनने काढलेली प्रत्येक धाव जसा एक नवा विक्रम प्रस्थापीत करते तसंच मावळणाऱ्या प्रत्येक दिवसागणिक आमच्या समितीच्या आयुर्मानात भर पडते. अल्कोहोलीक ॲनॉनिमस संस्थेचे सदस्य जसे लपून छपून भेटतात तसेच आमचेही सदस्य जीव मुठीत घेऊन चोरून भेटतात. अपेयपान करणारी माणसंही आजकाल देवळात शिरल्यासारखी उजळ माथ्याने गुत्त्यात शिरतात आणि आमच्या संस्थेच्या सभासदांवर मात्र असं दिवाभितासारखं जगायची पाळी येते ह्यासारखं दुर्दैव नाही. पण मुळातच मान खाली घालून जगायचं पक्कं ट्रेनींग घरूनच मिळाल्याने आमच्या सभासदांना ह्यात काही विशेष वाटत नाही ही बाब वेगळी.

आज सांगण्यास अत्यंत आनंद होतो की आम्ही रोवलेल्या बिजाला पहिला अंकूर फुटला आहे, आमच्या बाळाने पहिला ट्यॅहॅं केला आहे, आम्ही घातलेल्या अंड्याला पहिला तडा गेला आहे. नुकतीच आमच्या उ. न. क. च्या मुंबई शाखेची पहिली बैठक पार पडली. त्यात काही अत्यंत ज्वलनशील मुद्द्यांना हात घालण्यात आला. सामाजिक, आत्मीक, भावनीक अशा सर्व प्रकारच्या जाणीवा जागृत व्हायच्या ह्या काळात आमच्या सदस्यांच्याही जाणीवा, बंद दाराच्या आत का होईना, जागृत होत आहेत हे पाहून अस्मादिकांस संतोष जाहला. तर, बैठकीत चर्चीले गेलेले काही ठळक मुद्दे मी इथे मांडत आहे.

१ - मुंबई शाखेच्या पहिल्याच बैठकीत एका सभासदाने संस्थेच्या नावात बदल सुचवला. एकाच नावात उपेक्षीत आणि नवरे हे दोन समानार्थी शब्द ठेवण्याऐवजी नुसतंच नवरे कमिटी अथवा उपेक्षीत कमिटी असं नाव असावं असा प्रस्ताव मांडण्यात आला.
२ - आई म्हणून आपल्या लेकरांवर जिवापाड प्रेम करणारी स्त्री जेंव्हा बायकोच्या भुमीकेत शिरते तेंव्हा हा प्रेमळ स्वभाव अचानक कुठे गायब होतो असा सवाल उपस्थित करण्यात आला.
३ - हुंड्याचा प्रश्न सद्ध्या फार बिकट होत आहे. हुंडा दिला नाही म्हणून आमच्या एका सदस्याला त्याच्या बायकोने चक्क स्वतः बनवलेला चहा दिला आणि तो संपवायलाही लावला. ह्या अन्यायाविरूद्ध कुठल्या कलमाखाली तक्रार नोंदवावी?
४ - लेडीज डब्याशेजारच्या डब्यातील लोकांनी बायकांच्या गप्पांचा त्रास होतो म्हणून त्या आवाजवर कडी करण्यासाठी भजनी मंडळ सुरू केले. त्यास प्रत्युत्तर म्हणून लेडीज डब्यातील बायकांनी बसल्याबसल्या आपल्या खड्या आवाजात ह्या भजनांचे निरूपण करण्यास सुरूवात केली. त्यामुळे, ह्या अशा निरूपण मंडळांबर बंदी आणावी अथवा लेडीज स्पेशल गाड्यांची संख्या

वाढवावी अशी आम्ही रेल्वे प्रशासनास विनंती करतो.
५ - सगळीकडे ३३% आरक्षण मागणाऱ्या बायका लग्नानंतर काही महिन्यातच घरातल्या एकुलत्या एका बेडचा जवळजवळ ६७% भाग व्यापतात ह्यावर कुणाकडे उपाय आहे का? मोठा बेड घ्यावा हा उपाय विचारात घेतला जाणार नाही.
६ - जेवणाव्यतिरीक्तही नवऱ्यांना तोंड उघडण्याची संधी द्यावी ह्या मुद्द्यावर लवकरच देशव्यापी आंदोलन छेडण्यात येईल. बोलायची सवय नसल्याने ह्या आंदोलनात कुठल्याही घोषणा दिल्या जाणार नाहीत, फक्त फलक नाचवले जातील.
७ - घरातल्या कपाटात ३३% नव्हे तर किमान १०% तरी आरक्षण मिळावे ह्यासाठी लवकरच जेल भरो सारखं कपाट खाली करो हे देशव्यापी आंदोलन छेडण्यात येईल. आम्ही स्वतः बंगळूरूहून मुंबईस येऊन महिना झाला तरी आमचे कपडे त्याच बॅगांमधून काढतो आणि धुवून आल्यावर घड्या घालून पुन्हा बॅगेत ठेवतो ह्यावरून ह्या समस्येचं गांभिर्य लक्षात यावं.
८ - पुरूषांसाठी टिव्ही वर चार दिवस सासऱ्याचे, कारण सासराही कधी काळी जावई होता अशा फॅंटसी मालिका सुरू कराव्या.
९ - टिव्ही वरून अजून एका मेंबरला एक नवकल्पना सुचून रिमोटवरील म्यूट बटणाचा उपयोग घरातल्या इतर जिन्नसांवर करता येऊ शकेला का ह्यावर संशोधन करायचे ठरले.
१० - हा कागद वाचून झाल्यावर तो लगोलग नष्ट करून टाकावा.

तर मित्रांनो, अशा रितीने आपल्या उपेक्षीत नवरे कमिटीच्या मुंबई शाखेचे कामकाज मोठ्या जोमाने सुरू झाले आहे. पुढल्या बैठकीची वेळ, तारीख आणि जागा लवकरच तुम्हाला सांकेतीक भाषेत कळवण्यात येईल. जगलो वाचलो तर भेटूच पुढल्या वेळी.

आपला उपेक्षीत,


ऍडी जोशी

---

# मिल्कः एक चळवळ

माणसाने माणसांवर इतक्या प्रकारे अन्याय केला असेल की त्यापुढे कोणतीही गोष्ट फिकी पडावी.. माणसाला गोष्टि इतर कोणत्याही प्राण्यापेक्षा अधिक वर्गीकृत करता येतात हे मनुष्यप्राण्याचे वैशिष्ट्य समजले जाते. मात्र या गुणामुळे माणसाने माणसाला केवळ वर्गीकृतच केले नाहि तर आपल्या भोवती ही वर्गीकरणाची कुंपणे घालून घेत स्वतःला संकूचिततेच्या सीमेपार ढकलले.. काळा, गोरा, तपकीरी असे रंगांवरून वर्गीकरण करून तो थांबला नाहि तर गोरा श्रेष्ठ, काळा कनिष्ट हे ही त्यानेच ठरविले.. स्त्री-पुरूष हे वर्गीकरण तर निसर्गाने केलेले.. म्हटल्यास तुल्यबळ.. पण त्यातही माणसाने पुरुषाला श्रेष्ठ ठरविले.. पुढे भाषा, वंश, विचार, आचार, धर्म, जाती इत्याही पायदाने ओलांडत माणूस इतका वर्गीकृत झाला होता/आहे की त्याचा वेळ आपले समाजातील स्थान ठरविण्यात व ते सांभाळण्यातच जाऊ लागला/जातो. श्रेष्ठ-कनिष्ठ आले की मान आला.. त्यामुळे कनिष्ठावर होणारा अन्याय आला.. पुढे जग जसजसं एकमेकाला ओळखू लागलं तसं जाणवू लागलं की हा अन्याय एका प्रांताची , समाजाची, धर्माची, वर्गाची मक्तेदारी नसून तो प्रत्येक माणसात भिनला आहे. जगाला अन्यायाची इतकी सवय झाली आहे की बऱ्याचदा आपल्यावर अन्याय होतो आहे हेच त्याला कळत नाहि.. जाणवत नाहि.. त्यातही ज्यांना ते जाणवतं त्यांच्यात ते बदलायची धमक असतेच असे नाहि.. आणि त्यामुळेच त्यातही जे अन्यायविरूध केवळ लढत नाहित तर लढून जिंकतात त्याचे कार्य केवळ उठून दिसत नाहि तर ते प्रेरणादायी असते.

तसा मी भरपूर चित्रपट पाहतो.. वेगवेगळ्या भाषेतले, प्रांतातले, प्रकारचे. यात अनेक चित्रपट आवडतात अनेक आवडत नाहित.. मात्र काहि असे असतात जे मनावर गारूड करून जातात.. भरपूर काळ लोटला तरी चित्रपट मनातून पुसलाच जात नाहि.. असाच गेल्या विकांताला बघितलेला चित्रपट "मिल्क".. माणसाने आपल्या वर्गीकरणाच्या गुणामुळे केलेले अजून एक वर्गीकरण भिन्नलिंगी आणि समलिंगी संबंध ठेवणाऱ्या व्यक्ती. अन इथेही माणूस केवळ वर्गीकरण करून थांबला नाहि तर केवळ भिन्नलिंगी संबंधाने प्रजोत्पादन होते ह्या कारणाला पुढे करून तुलनेने अल्पसंख्य असलेल्या समलिंगींवर अन्याय सूरू केले.




कथेची सुरूवात होते हार्वी मिल्क याने काढलेल्या फोटोजच्या दूकानापासून. एका खुलेआम समलैंगिक माणसाने सूरू केलेले दूकान हे त्याचे वैशिष्ट्य असतेच पण त्याच बरोबर ते दूकान हळूहळू समलैंगिक संबंध ठेवणाऱ्यांचा एक भेटायचा अड्डा होऊ लागतो. आणि बघता बघता "लोग आते गये और कारवाँ बनता गया" ह्या न्यायाने एक धडाडीचा "कंपू" जमू लागतो. अंगभूत गुणांमुळे त्याच्याकडे आपोआपच नेतेपद येते. सूरवातीला केवळ एकत्र जमताना तो अख्खा एरियाच "त्यांचा" म्हणून ओळखला जाऊ लागतो व हार्वीला "कॅस्ट्रो स्ट्रीटचा महापौर" म्हणूल लोक म्हणू लागतात

दूसरीकडे समाजाची अन्याय करण्याची नैसर्गिक प्रकृती काहि राजकीय व्यक्तींमधे जोमाने उसळते व समलैंगिकांना नोकरीवरून काढायचे असा ठराव मांडला जावा अशी सूचना पुढे येते. आणि इथेच कथेला सूरवात होते.. हार्वी मिल्क इथे "ती" प्रसिद्ध सभा घेतो.."मित्रांनो मी तुम्हाला नोकरी देण्यासाठी आलो आहे" हे त्याचे उद्गार साऱ्या अमेरिकेत खळबळ माजवतात. पुढे तो सुपरवायजरच्या निवडणूकीला उभा रहातो.. व सलग दोनदा हरतो.. इथे तो प्रयत्न सोडून देणार तेव्हाच एका मुलाचा त्याला फोन येतो तो सांगतो "मी आता आत्महत्या करणार आहे. मला हे (त्याचे कुटुंबिय) उपचारासाठी घेऊन चाललेत. त्यांच्यामते माझ्यात काहितरी कमी आहे." हार्वी सांगतो काहितरी करू नकोस "आपण लढू.. अशी आशा सोडू नकोस. तू इथे ये इथे रहा".. तो मुलगा अपंग असतो आणि त्यामुळे तो येऊ शकत नाहि. त्यामुलाला आलेले नैराश्य त्याला तिसऱ्यांदा लढण्यास

प्रवृत्त करतं.. आता मात्र त्याचा पार्टनर त्याला सोडतो.. तरीही हा न्याय्य हक्कांसाठी लढतो.. व शेवटी अमेरिकेचा पहिला खुलेआम समलैंगिक संबंध ठेवणारा घटनादत्त प्रशासकीय पद भुषविण्यासाठी निवडला जातो. निवडणूकीचा व त्याही पुढचा सॅनफ्रांसिस्को मधे "गे राईट" ऑर्डिनन्स संमत करून घेण्याचा त्याचा हा संघर्षपूर्ण प्रवास म्हणजे हा चित्रपट "मिल्क".इथे हा चित्रपट केवळ समलैंगिकांवरील अन्याय अथवा समलैंगिकांचा लढा इतकाच सिमीत नाहि. त्यामागची भावना, हार्वीचे उत्तम तर्कशुद्ध मुद्दे, सार्वजनिक वाद वगैरेनी चित्रपट रंगत जातो.

तरीही, हार्वीला हेही माहित असतं की आपल्यावर कधी ना कधी हल्ला होणार आहे.. आपल्याला कोणीतरी मारणार आहे म्हणून तो त्याची कहाणी रेकॉर्ड करून ठेवतो त्यातील मला आवडलेल्या शेवटाच्या परिच्छेदाचे हे स्वैर भाषांतरः
"तुम्हाला एका गे माणसाला निवडून दिलंच पाहिजे.. कारण एका तरूण मुलाला.. आणि त्याच्याचसारख्या हजारो मुलांना गरज एक गोष्ट मिळेल ती म्हणजे "आशा".. त्यांना आशा मिळेल ती एका उद्याची, एका चांगल्या आयुष्याची, एका चांगल्या भविष्याची...
जर माझा कधी खून झाला तर मला पाच, दहा, शंभर, हजार व्यक्ती उभ्या दिसल्या पाहिजेत अशी माझी इच्छा आहे. जर एखादी गोळी माझ्या डोक्यात मारली गेली तर त्या गोळीने प्रत्येक बंद दरवाजा नष्ट झाला पाहिजे. ही चळवळ अशीच चालू राही पाहिजे कारण ती माझी चळवळ नाहि. ही चळवळ माझ्या स्वार्थासाठी नाहि, पॉवरसाठी-सामर्थ्यासाठी नाहि, ती तिथे असलेल्या "आमच्यासाठी"ची चळवळ आहे.. ही चळवळ फक्त समलिंगींसाठी नाहि तर ही ब्लॅक्सची चळवळ आहे, ही आशियायींची चळवळ आहे, वृद्धांची चळवळ आहे, अपंगांची चळवळ आहे.. ह्या "आम्ही"ची चळवळ!
आशा नसली की हे "आम्ही" प्रयत्न सोडून देतो.. आणि मला माहिती आहे की "आम्ही" केवळ आशेवर जगू शकत नाहि पण आशा नसेल तर ह्या आयुष्यात जगण्यासारखे काय आहे? तेव्हा तू, तू आणि तूसुद्धा.. उठ.. तुमच्या प्रत्येकाला त्या "आम्हीं"ना आशा द्यायची आहे.. तुम्हाला त्यांना आशा द्यायचीच आहे"

थोडक्यात ही कथा आहे एका बंडखोरीची, एका चळवळीची.. माणसाने फक्त माणूसकीसाठी माणसाविरूद्धच उभारलेल्या एका चळवळीची! प्रत्येकाने पहावी, समजून घ्यावी अशी चळवळ!

ऋषिकेश

# लेमन केक

साहित्य-

२५० ग्राम साखर, २५० ग्राम मैदा, २५० ग्राम लोणी/तूप, ५ अंडी

२ चहाचे चमचे बेकिंग पावडर, २ चहाचे चमचे वॅनिला अर्क, १ चिमूट मीठ

१००-१२५ ग्राम पिठीसाखर, ४ ते ५ लिंबांचा रस, लिंबाची किसलेली साल १ ते २ चमचे

कृती-

लोणी/तूप भरपूर फेटणे,नंतर साखर घालून फेटणे,मीठ घालून फेटणे,अंडी घालून फेटणे. वॅनिला इसेन्स घालून फेटणे. लिंबाची साल घालून फेटणे. मैदा+बेकिंग पावडर एकत्र करणे व ते घालून फेटणे.

केक च्या साच्याला बटर लावून घेणे व त्यात ते मिश्रण ओतणे.

अवन प्रिहिट करणे, १८० अंश सेल्सिअस वर ५५ ते ६० मिनिटे बेक करणे.

केक तयार झाला की मोल्डमधून बाहेर काढणे व जाळीवर ठेवणे म्हणजे वाफ धरणार नाही. कोमट झाला की त्याला टोचणीने/विणायच्या सुईने (विणायच्या सुईशी माझा एवढाच संबंध! ) सर्व बाजूंनी भोके पाडणे.

लिंबांचा रस + पिठीसाखर एका ट्रे/मोठ्या ताटलीत घेणे व त्यात हा केक उलट सुलट सर्व बाजूंनी घोळवणे. कडा जास्त घोळवणे. रस सगळीकडे लागायला हवा आणि केक च्या आतही जायला हवा.

पिठीसाखरेने सजवणे.

गार झाल्यावर तुकडे करणे. गरम गरम कॉफीबरोबर खाणे.

(जर्मनांना केक बरोबर कॉफी लागतेच लागते! आपण जसे चहाफराळाला बोलावतो तसे ही मंडळी 'काफे उंड कुकन' साठी बोलावतात!)

हे तुकडे प्लास्टीक कागदात गुंडाळून प्लास्टीक डब्यात घालून डीप फ्रिझ मध्ये ठेवले तर ४/५ महिने टिकतात.

(अर्थात तसेही ते खाण्यातून उरायला तर हवेत.. )



स्वाती दिनेश

# चिकन साते

या विकांताला काही मित्र घरी आले होते. थोडीफार आचमन झाली. त्या सोबत तोंडी लावायला केलेल हे एक चिकन स्टार्टर. करायला सोप्प आणि झटपट तयार होणार चिकन साते.

**साहित्यः**



चिकन ब्रेस्ट लांब उभे तुकडे करुन




डार्क सोया सॉस.
स्वीट चीली सॉस.
टॉबॅस्को सॉस.
१/२ लहान चमचा कोल्हापुरी ठेचा (जास्त तिखट आवडणाऱ्यांसाठी)

१लहान चमचा आल-लसुण पेस्ट
चवी नुसार मीठ.

**कृती:**



वरील सर्व सॉस, मीठ, आल-लसुण पेस्ट आणि ठेचा चिकनला लावुन कमीत कमी २ तास मुरत ठेवावे.



लांब काड्यांमध्ये मुरवलेले चिकनचे तुकडे अडकवावे. एका नॉन्स्टीक पॅन मध्ये १ लहान चमचा तेल तापवुन त्यावर हे चिकन दोन्ही बाजुंनी फ्राय करुन घ्यावे.



झटपट चिकन साते तयार.



लहान मुलांना न्युडल्स आणि सुप बरोबर सर्व्ह करा (मुलांसाठी काही चिकन कमी तिखट वापरुन वेगळे मुरवुन करता येइल.)



आणि हे मोठ्यांसाठी

एन्जॉय माडी

**गणपा**

# स्पर्श

— **प्रारंभ** —

रात्रीची दोन वाजताची वेळ होती.
मुंबईच्या हिंदुजा रुग्णालयात एका खाजगी रुममध्ये शलाका बेडवर पडली होती.
डोळे उघडे होते पण त्यांत कोणतीही संवेदना जाणवत नव्हती.
तिच्या डोक्याभोवती पूर्ण बँडेज गुंडाळले होते. अजूनही रक्ताने माखलेली तिची आवडती आंबा कलरची साडी तिच्या अंगावर होती. आजूबाजुला चार नर्सेस आणि दोन शिकाऊ डॉक्टर उभे होते. डॉक्टर अभिजीत नुकतेच सहका-यांना तिची काळजीपूर्वक देखभाल करण्यासाठी सांगून गेले होते.
ते स्वत: शलाकाचे मेंदूचे C.T. Scan चे रिपोर्टस् बघायला चालले होते.

डॉक्टर अभिजीत यांना शलाकावरचे उपचार आणि आईची समजूत घालणे हे दोन्ही बघावे लागत होते. आदित्यच्या आईच्या डोळ्यांतून अखंड अश्रूधारा वहात होत्या. गेल्या तीन तासांत ती सतत रडतच होती.
डॉक्टर अभिजीत शलाकाचे रिपोर्टस् बघायला जाताच आईचे विचारचक्र सुरु झाले.

आदित्यची आई,सावित्रीबाई, अतिशय देवभोळी, शकुन-अपशकून आणि पायगुण मानणारी होती. त्यामुळे कोणत्याही गोष्टीची सांगड तिला देवाशी, शकुनाशी किंवा त्या व्यक्तिच्या पायगुणाशी घालण्याची सवयच होती.
शलाका घरातून निघतानाच आईला समोरच्या जोशी काकूंच्या घरचे मांजर दिसले होते.
आई म्हणाल्यापण होत्या - "अगं घरातून बाहेर जाताना मांजर दिसणं चांगलं नसतं. तू नको जाऊस."
"आई मी गेले नाही तर ह्यांची खबरबात कशी मिळेल. मला जायलाच हवं. रोजच तर ते मांजर दिसते." असं म्हणून शलाका आदिची कार घेऊन वेगाने एअरपोर्टकडे निघाली होती.

सावित्रीबाई शलाकाशेजारीच बसल्या होत्या. बघता बघता सावित्रीबाईंच्या अश्रूनी ओल्या झालेल्या डोळ्यांसमोर गेल्या चार तासांतील घडामोडी धूसरपणे दृश्यरुप घेऊ लागल्या.

—१ —

आज सकाळपासूनच शलाका भलतीच खुशीत होती.
अगदी पहाटे पाचलाच ती उठली होती. उठल्या उठल्या स्नान करुन लगेच देवपूजेला देखील बसली होती.
देवाची पूजा करून होताच मग ती आपल्या सासूच्या,सावित्रीबाईंच्या, सेवेस लागली.
नेहमी प्रमाणे तिने त्यांना सकाळचा नाश्ता दिला. आज सासूबाईंच्या आवडीचे कांदापोहे शलाकाने केले होते.
शलाकाच्या हातात कांदापोहे असलेली डिश् बघूनच सावित्रीबाई म्हणाल्या-
"आज आदि येणार आहे म्हणून माझी चांगलीच चंगळ होणार असे दिसतेय."
आदित्य आज अमेरिकेहून दुबईमार्गे येणार होता.
"हे हो काय आई?" शलाका लटक्या रागाने म्हणाली - "दुपारच्या जेवणाला मग तुम्हाला कांदाभजी देणार नाही मी"
नाहीतरी अभिजीत काकांनी तुम्हाला तळलेले पदार्थ खायला मनाई केली आहेच."

सावित्रीबाई मनाने चांगल्या होत्या. तशीच त्यांची सून शलाका पण स्वभावाने खूप चांगली होती. मुख्य म्हणजे ती देव मानणारी आणि मोठ्यांना मान देणारी होती. छोट्या छोट्या गोष्टींवरुन आजकालच्या मुलींसारखी सासूशी भांडणारी अजिबात नव्हती.

**-- थोडेसे मागे --**

शलाकाचे वडील दामोदरपंत सप्तर्षि एकदम कर्मठ ब्राह्मण होते. समाजात त्यांना संस्कृतचे प्रकांड पंडीत आणि वेदांचे गाढे अभ्यासक म्हणून खूप मान होता. घरातदेखील अतिशय सुसंस्कृत वातावरण होते.पुण्यातील एक नावाजलेले व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचा लौकीक होता.

दामोदरपंत जरी धार्मिक असले तरी त्यांना विज्ञानाची कास होती, म्हणूनच त्यांनी आपल्या मुलांना चांगल्या संस्कारांबरोबरच विज्ञानाचा दृष्टीकोणदेखील दिला होता. त्याचाच परिपाक म्हणून त्यांची दोन मुले वेगवेगळ्या क्षेत्रांत वैज्ञानिक म्हणून नावलौकीक मिळवते झाले होते. शलाका ही सर्वात धाकटी आणि सर्वात हुशार मुलगी. तिने स्वत:च संगणकतज्ञ व्हायचं ठरवलं होतं.

जेव्हा पुणे विद्यापीठांतील हुशार स्नातकांना एका नावाजलेल्या कंपनीने मुलाखती घेऊन निवडायचे ठरवले तेव्हा शलाकाची त्यांत निवड होणे अपेक्षितच होते. त्याप्रमाणे तिची निवड झाली देखील.खरेतर शलाकाने एक गंमत म्हणून ही मुलाखत दिली होती फक्त स्वत:चे मूल्यमापन करण्यासाठी.कंपनीचे ऑफिस नवी मुंबईला असल्याने पुणे सोडून तिकडे जाण्याचा प्रश्नच नव्हता. पप्पांची ती खूप लाडकी असल्याने पप्पा तिला परवानगी देणार नाही याची तिला खात्री होती.

एक दिवस ती 'जावा'च्या क्लासवरून घरी येताच दामोदरपंतांनी तिला बोलावले.

"अगं शलू, हातपाय धुवून आधी इकडे ये बघू"

"आलेच. दोन मिनिटांत येते" म्हणून खरोखरंच ती दोन मिनिटांत आली.

"अगं तुझं पत्र आलंय. हे काय आहे? कंपनीचं नेमणूक पत्र आलंय. "

"ओह, ते होय? अहो पप्पा मी सहज गंमत म्हणून मुलाखत दिली होती. त्यामुळे तुम्हालाही सांगायचे विसरले."

"अगं पण कंपनी खूप चांगली आहे. आणि ही संधी तू गमवू नयेस असे मला वाटते"

दामोदरपंतांच्या तोंडून परवानगीचे हे शब्द ऎकताच तिचा एक क्षण विश्वासच बसेना.

"पप्पाssssssssssssss" म्हणत तिने एकदम दामोदरपंतांना मिठी मारली.

मनातून शलाकाला ही संधी गमावू नये असेच वाटत होते. पण दामोदरपंतांच्या आकस्मिकपणे मिळालेल्या परवानगीने सगळे चित्रच बदलून गेले होते. दामोदरपंतांनी शलाकाची रहाण्याची व्यवस्था नवी-मुंबईलाच त्यांच्या बहीणीकडे केली होती.

आणि बघता बघता शलाकाचे करियर सुरु झाले.

दोन वर्षांत शलाकाने कंपनीत आपले स्थान पक्के तर केले होतेच. पण तिच्या मनमोकळ्या पण घरंदाज स्वभावाने सर्व थरांवरच्या लोकांशी अतिशय चांगले संबंध तिने निर्माण केले होते.अशातच गेल्या एक वर्षापासून कंपनीतील एका इंजिनिअरने, आदित्यने, तिचे लक्ष (खरे तर चित्त)वेधून घेतले होते. आदित्य हा देखील अगदी मनमोकळ्या स्वभावाचा आणि सर्वांना स्वत:चे कामदेखील संभाळून सतत मदत करण्यास तत्पर रहात असे. एक वर्षापूर्वी जेव्हा आदित्यला सर्वोत्कृष्ट नवीन कर्मचा-याचे पारितोषिक जाहीर झाले तेव्हाच शलाकाला त्याचे मनमोकळे आणि प्रसन्न व्यक्तीमत्त्व आवडले होते. पण तिचा त्याच्याशी बोलण्याचा धीर होत नव्हता. तिला असे वाटायचे की त्याला देखील तिच्यात रस आहे. पण हे केवळ वाटणेच असेल तर? असा विचार करुन ती गप्प बसली होती. दरवर्षीप्रमाणे आज पुन्हा कंपनीत समारंभ होता. आणि सर्वोत्कृष्ट कर्मचा-याचे पारितोषिक आदित्यलाच मिळाले. मॅनेजमेंटने त्याला प्रमोशन देऊन शलाकाच्या प्रोजेक्टवर आता रिक्रूट केले होते.

खरे तर शलाकाला मनापासून आनंद झाला होता. त्यानंतर अवघ्या तीन महिन्यांत दोघांची घनिष्ठ मैत्री झाली.

हळू हळू बाहेर भेटणे, फिरायला जाणे या गोष्टी होऊ लागल्या. एवढेच नव्हे तर तो तिला घरीदेखील सोडत असे.

लवकरच शलाकाच्या आत्याच्या कुटुंबालादेखील आदित्यने आपल्या मनमोकळ्या स्वभावाने जिंकले.
आणि ऐके दिवशी आदित्यने तिला गेटवे ऑफ इंडियाला फिरायला नेले. तेथे त्याने तिच्यावरचे प्रेम व्यक्त करुन तिला लग्नासाठी मागणी घातली ती पण एकदम स्पष्ट शब्दात. मला तुला काही सांगायचे आहे वगैरे फाटे न फोडता.
"शलाका! माझे तुझ्यावर प्रेम आहे, माझ्याशी लग्न करशील का?"
एक क्षण शलाका बावरुनच गेली. मग लगेच तिच्या गालावर रक्तिमा पसरला. त्यातच तिचा होकार सामावलेला होता.
नंतर बराच वेळ दोघे बोलत होते.
शलाका म्हणाली - "तू केव्हापासून माझ्या मनात भरला होतास. पण तुझ्याशी बोलायची पण भिती वाटत होती."
हसून आदि म्हणाला - "तुला काय वाटतं मी तुझ्या प्रोजेक्टवर कसा रिक्रूट झालो?"
"मी डायरेक्ट आपल्या प्रोजेक्ट मॅनेजरला सांगितले की मला या प्रोजेक्टवर काम करायचे आहे म्हणून.
मी त्यांचा आवडता असल्याने त्यांनीही लगेच सूत्रे हलवून मला इकडे शिफ्ट केले होते."
यावर शलाका थोडीशी लटक्या रागाने म्हणाली- "म्हणजे सगळे तू ठरवून केले होतेस तर"
"आता रागवू नका बाईसाहेब. तुमच्यासाठीच हे सर्व मी केले होते."
आदिने शलाकाला त्याची सगळी माहिती सांगीतली.
आनंदराव पाटील म्हणजे एक हरहुन्नरी व्यक्तीमत्त्व होतं. व्यवसायाने डॉक्टर असलेला हा माणूस कुस्तीचा शौकीन होता. मूळचे कोल्हापूरचे असल्याने कुस्तीचा वारसा त्यांना उपजतच मिळाला होता. स्वत: आनंदरावांनी त्यांच्या तरूणपणी कोल्हापूरच्या मी मी म्हणणा-या मल्लांना अस्मान दाखवले होते. अर्थातच तो त्यांचा शौक होता, ध्येय नव्हते.
इतिहासाची अतिशय आवड असणा-या आनंदरावांनी घरातील एका खोलीत इतिहासाच्या पुस्तकांचे एक छोटेसे ग्रंथालय पण केले होते. ते पण कमी होते की काय म्हणून त्यांना भटकंती करायची खूप हौस होती. स्वारी दोन तीन महीन्यांतून एकदा तरी भटकंतीसाठी जात असे. अशातच आनंदरावांची बदली मुंबईला झाली. आणि गेले १५ वर्षांपासून ते तिथेच स्थायिक झाले होते.
अशाच एका भटकंतीच्या नादात आनंदरावांचे एका गडावरून खोल दरीत पडून अपघाती निधन झाले होते.
आनंदरावांच्या निधनानंतर मोठे दोन्ही भाऊ बायकांच्या मुठीत असल्याने त्यांनी वेगळी बि-हाडे थाटून आईची सगळी जबाबदारी लहानग्या आदित्यवर टाकली होती. तेव्हापासून आदित्यचाच सावित्रीबाईंना आधार होता.
आदित्य देखील हुशार होता. वयाच्या पंचविसाव्या वर्षीच एका आंतरराष्ट्रीय संगणकप्रणालीच्या कंपनीत नोकरीला लागला होता. अर्थात त्याने खूप कष्ट केले होते. रात्रंदिवस काम आणि अभ्यास दोन्ही केले होते.

हळू हळू एकमेकांच्या सहवासात धुंद होऊन कधी खंडाळा तर कधी एलेफंटा केव्हज् या सफरी होऊ लागल्या.
तरीही दोघे घरंदाज असल्याने त्यांनी प्रेम करताना कुठेही मर्यादा ओलांडली नव्हती.
अशा रितीने प्रेम-प्रकरण फुलल्यानंतर काही महिने मजेत गेले.
नंतर शलाकाच्या आईने शलाकासाठी स्थळ बघण्यासाठी युद्धपातळीवर मोहीम हाती घेतल्यावर आपल्या प्रेमवीरांना जाग आली.
शलाकाने आधी आईला एवढी काय घाई आहे असे सांगून टाळायचा प्रयत्न केला होता. पप्पांनादेखील पुढे केले होते.
पण तिच्या आईने या बाबतीत तरी मी तुमचे काही ऐकणार नाही असे सुनावून तो मार्ग बंद केला होता.
त्यामुळे आदि आणि शलाकाला याबाबतीत काय करावे हे सुचेनासे झाले. एक दिवस शलाकाला हिरमुसलेली बघून आत्याने तिला विचारले - "काय गं, काय झालं"
शलाकाच्या आत्याला एव्हाना त्या दोघांचे प्रेमप्रकरण माहीत होते.
आदिचे त्यांच्या घरी येणे-जाणे तर होतेच पण काकू मला भूक लागली आहे काहीतरी खायला द्या असे हक्काने सांगू शकेल असे घरोब्याचे संबंध निर्माण झाले होते. आणि तिचा त्यांना पाठींबादेखील होता.
शलाकाने सगळी हकीगत आत्याला सांगितली.

आत्या म्हणाली - "एवढंच ना? तू अजिबात चिंता करु नकोस.शांतपणे जाऊन झोप बघू.मी बघते काय करायचे ते"
आत्याने मदत केल्याने अनपेक्षितपणे हा मोठा तिढा सहजपणे सुटला होता.
आत्याचे म्हणणे डावलायची हिम्मत दामोदरपंतांच्या घरात कोणातच नव्हती एवढा तिचा दरारा होता.
पण स्वतःच्या मुलीचाच प्रश्न असल्याने सुरुवातीला दामोदरपंतांनी तिच्याशी वाददेखील घातला.
आत्याने त्यांना नीट समजावून सांगितले-"मुलाला मी चांगले ओळखते. आपली शलाका अगदी सुखी राहील त्याच्याबरोबर" काही झाले तर मला जबाबदार धरा. तुम्हाला हवं तर आधी तुम्ही मुलाला बघा. मगच तुमचे मत सांगा"
दामोदरपंत आपल्या बहिणीला चांगले ओळखून होते.
आपली बहीण एवढ्या खात्रीने हमी देत आहे म्हणजे मुलगा नक्कीच चांगला असणार. भेटून तर बघू असे म्हणून सुरुवात झाली
आणि लवकरच सर्वसंमतीने आदि-शलाकाचे लग्न देखील झाले।

**- पुन्हा वर्तमानात...**
आदित्यचे लग्न होताच अवघ्या चार महीन्यांत तिने आपल्या वर्तनाने सासूचा पूर्ण विश्वास जिंकला होता.
आता तर तिच्याशिवाय त्यांचे पानदेखील हलत नव्हते.
तेव्हा सावित्रीबाई हसू लागल्या. "तू कधीही असे करणार नाहीस हे मला माहीत आहे.
तूच तर माझी काळजी घेते आहेस.पोटच्या २ मुलांनी मला वा-यावर सोडले तेव्हापासून आदिच माझं सगळं बघायचा.आणि आता तर तू देखील मला काही कष्ट करु देत नाहिस की काही कमी पडू देत नाहीस."
त्यांचं म्हणणं अगदी खरं होतं. आनंदराव जेव्हा अचानकपणे अपघातात गेले तेव्हापासून धाकटा असूनही आदिच आईची सगळी काळजी घ्यायचा.
जेव्हा आदित्यने आईला सांगितले "आई माझे एका मुलीवर प्रेम आहे. आणि तिच्याशी मला लग्न करायचे आहे."
तेव्हा आईने तसे आधी नाक मुरडले होते की आदि स्वतःच्या पसंतीच्या पोरीशी लग्न करणार म्हणून.तेही दुस-या जातीच्या. शलाका ही देशस्थ ब्राह्मण आणि आदि हा मराठा.
मुलगी उच्च कुलीन असो वा नसो तिला दुसरा समाज सहसा स्वीकारायला तयार होत नाही. तसेच झाले होते.
आदित्य आईवर खूप प्रेम करत होता. त्यामुळे आईची सहमती अत्यावश्यक होती. आदित्य म्हणाला
"आई, तू एकदा शलाकाला बघ तरी. तुला पसंत नाही पडली तर मी नाही तिच्याशी लग्न करणार..."
सावित्रीबाईंनी विचार केला की बघायला काय जातंय? किमान आदिचे मन राखण्यासाठी एवढेतरी आपण करू शकतो. पण आदित्यला शलाकाबद्दल खात्री होती. तेव्हा आईने शलाकाला बघायचे ठरवले तेव्हाच तो मनातून हसला होता.
आणि आदित्यने जेव्हा शलाकाला आईला भेटण्यासाठी घरी आणले तेव्हा मात्र आईच्या कौतुकाला पारावार राहिला नाही.
शलाका हि दिसायलाही गोरीपान, देखणी, हुशार, आणि संगणक तज्ञदेखील होती.
तिच्या घरंदाज वागण्याला बघून सावित्रीबाईंनी मनोमन हे मान्य केले की अशी देखणी, हुशार आणि मोठ्यांना मान देणारी सून आपण काही आदिसाठी शोधू शकणार नाही.
जणू आईच्या चेह-यावरचे हावभाव वाचूनच आदिने आईला विचारले.
"काय आई, नाही म्हणून सांगू का हिला?"
आई एकदम उत्तरली "काहीतरीच काय म्हणतोस आदी? मला पसंत आहे शलाका."
बोलल्यानंतर एकदम सावित्रीबाईंना उमगले की आपण आपला होकार देऊन बसलो आहोत. आदी हसू लागला-
"मला माहीत होते आई म्हणूनच तर तुला आत्ता विचारले. अजुनही तुझी आकस्मिक प्रश्नाने गडबडून जायची सवय काही गेली नाही."
"अरे लबाडा! असा दावा साधलास होय. माझा गैरफायदा घेतोस होय? थांब बघतेच आता"
असे म्हणत सावित्रीबाई आदिमागे धावल्या.

तेवढ्यात शलाकाने त्यांना पडता पडता वाचवले आणि हसत हसत म्हणाली - "आई, आदिला तुम्ही सोडून द्या, तुमचा राग मी शांत करते." असे म्हणून ती आईच्या पाया पडली.
"सुखाने संसार कर हो मुली" असा अवचितपणे त्यांच्या तोंडून शलाकाला आशिर्वाद दिला गेला.
ते पाहून आदि अजूनच जोरजोरात हसू लागला.
आई म्हणाली - "छान, तुम्ही दोघा मुलांनी माझी चांगलीच फिरकी घेतलीत."

— २ —

लवकरच दोघांचा विवाह सोहळा वैदीक पद्धतीने थाटामाटात पार पडला. लग्नाची सगळी आर्थिक बाब आदित्यने स्वत: संभाळली होती. एकाही पै ची मदत कोणाकडून घेतली नव्हती. लग्नानंतर नोकरी सोडायचा निर्णय हा सर्वस्वी शलाकाचाच होता. आणि आईची काळजी घेण्याच्या दृष्टीने तो आवश्यक देखील होता.

लग्नाला दोनच महिने झाले होते आणि आदित्यला कंपनीने तीन महिन्यांसाठी अमेरिकेला पाठवायचे ठरवले होते.
आई म्हणाली - "गृहलक्ष्मी लाभली हो तुला आदि. शलाकाचा पायगुण खूप चांगला आहे."
खरंतर लग्नाला फक्त दोनच महिने झाले होते आणि आदि अमेरिकेला जाणार म्हणून शलाका हिरमुसली झाली होती.
पण भविष्यकाळाच्या दृष्टीने अमेरिकेची वारी करणे आदिला आवश्यक होते. हे शलाका चांगले समजून होती.
शेवटी तीन महीन्यांची ताटातूट आज संपणार होती.
आदिची फ्लाईट रात्री ११.३० वाजता एअरपोर्टवर येणार होती.आणि ती त्याला रिसिव्ह करायला पण जाणार होती.
सकाळपासूनच ती तयारीला लागली होती. आदिच्या आवडीचे पदार्थ करायचे सर्व ताजे सामान तिने बाजारातून आणले होते.

— ३ —

संध्याकाळी साडे आठला तिचा स्वयंपाक झाला होता. आणि आदिसाठी ती थांबणार असल्याने आईला जेवायला देऊन ती नेहमीप्रमाणे टी.व्हीवर आईसोबत बातम्या पाहू लागली.

तोच बातम्यांमध्ये दुबईवरुन येणारे विमान अपघातग्रस्त झाल्याची बातमी तिला बघायला मिळाली. सर्व प्रवासी मरण पावले होते.मृतांच्या नातेवाईकांसाठी विमानतळावर एक हेल्पलाईन काऊंटर उघडले होते.
संबंधितांनी अधिक माहितीसाठी प्रत्यक्ष विमानतळावर चौकशी करावी असे आवाहन करण्यात आले होते.शलाकाच्या काळजात तर एकदम् धस्स झाले.लगेच उठून ती म्हणाली "आई मी आत्ताच एअरपोर्टवर जाऊन येते."

एअरपोर्टजवळच एका सिग्नलपाशी तिला सिग्नल सुटलेला दिसला. तेथे ती थांबली असती तर पुन्हा ४-५ मिनिटे गेली असती. तिने तो सिग्नल पकडता यावा म्हणुन जोरात गाडी घातली. तिची गाडी सिग्नल ओलांडून तर गेली पण त्यावेळी लाल दिवा लागलेला होता, त्यामुळे डाव्या बाजूने येणा-या वोल्व्हो गाडीकडे तिचे लक्षच गेले नाही. तिचे सर्व लक्ष आदिची माहीती घेण्याकडे होते. आणि तिला लवकरात लवकर एअरपोर्टवर पोहोचायचे होते.एखाद्या महामार्गावर एक-दोन सेकंदाचे दुर्लक्ष खपूनही गेले असते. पण शहरातल्या रहदारीत अजिबात नाही.याचा व्हायचा तोच परिणाम झाला.
त्या वोल्व्हो गाडीने शलाकाची कार उडवली आणि शलाका रक्ताच्या थारोळ्यात पडली होती.

— ४ —

पोलिस तेथेच असल्यामुळे त्यांनी शलाकाची पर्स पाहिली तर त्यात त्यांना डॉ.अभिजित देशपांडेंचे कार्ड मिळाले होते.
पोलिसांनी फोनवर शलाकाचे वर्णन सांगताच ते म्हणाले की ती माझ्या परिचयाची आहे. तिला ताबडतोब हिंदुजा रुग्णालयात

पाठवा. शलाका रुग्णालयात येईपर्यंत डॉक्टर अभिजीत यांनी ऑपरेशनची सर्व तयारी केली होती तसेच आदिच्या एका मित्राला सांगून आईला देखील रुग्णालयात बोलावून घेतले होते.

आनंदराव सरकारी नोकरीत आरोग्य खात्यात मोठे अधिकारी होते तेव्हाची ही गोष्ट. त्यांनी अभिजीत देशपांडे या हुशार तरुणाला डॉक्टर होण्यासाठी खूप मदत केली होती. आनंदरावांना नेहमीच चांगल्या माणसांची कदर असायची. पैशाअभावी गुणांना वाव मिळत नसेल तर प्रसंगी स्वत:च्या पदरचे पैसे खर्च करायचे ते. त्यामुळेच अभिजीत आनंदरावांना खूप मानत असेल. त्यांच्या निधनानंतर देखील तो त्यांचा कुटुंबीयांशी संबंध ठेऊन होता आणि आज त्या उपकारांचा उतराई होण्याची संधी त्याच्यासमोर आलेली होती.

शलाकाला दोन - सव्वा दोन तासांच्या अथक परिश्रमानंतर सर्व उपचार करुन तिच्या खोलीत आणण्यात आले.
डॉक्टर अभिजीत आईंना समजावून सांगत होते, पण आईंना अश्रू आवरत नव्हते. तेवढ्यात कोणीतरी डॉक्टरांना सांगितले की C.T. Scan चे रिपोर्टस् तयार आहेत. तेव्हा डॉ. अभिजीत गेले होते.
शलाकाचा मोबाईल आईकडेच होता. तो अचानक वाजू लागला. आईला नवलच वाटले. आईला या सगळ्या धामधुमीत शलाकाच्या आई-वडीलांचा विसरच पडला होता. त्यांना शलाकाच्या अपघाताबद्दल त्या काही सांगू शकल्या नव्हत्या. कदाचित् त्यांचाच फोन असावा म्हणून आईंनी फोन घेतला.

— ५ —

तो काय आश्चर्य आईंना आदित्यचा आवाज ऐकू आला.
"आई! अगं कुठे आहात तुम्ही? घरी कोणी फोन का नाही उचलत?"
"अरे! तु कुठे आहेस?" सावित्रीबाई एकदम उत्तेजित स्वरात म्हणाल्या
"अगं आई मी आत्ताच एअरपोर्टवर आलोय. माझी अमेरिकेची फ्लाईट उशीरा आली त्यामुळे मला दुस-या फ्लाईटने यावे लागले."
"तू लवकर हिंदुजा ला ये बरं, शलाकाला अपघात झालाय, "
"काय? शलाकाला अपघात? कसा झाला आई" आदित्यचा तो जे ऐकत होता त्यावर विश्वास बसत नव्हता.
"अरे तुझ्या दुबईच्या फ्लाईटला झालेल्या अपघाताची बातमी ऐकून ती लगेच एअरपोर्टवर जायला निघाली अन् वाटेत हे झाले. तू आधी इकडे ये बरं"
"बरं" म्हणून आदित्यने फोन ठेवला. फोन ठेवताच आदित्य फोनच्या जागीच खाली बसला. तो एकदम सुन्न झाला होता. काय करावे हे त्याला सुचलेच नाही. १० मिनिटांनी जेव्हा सिक्युरिटी गार्डने विचारले, "भईसाहब क्या चाहिये?" तेव्हा तो भानावर आला आणि लगेच त्याने हिंदुजाकडे धाव घेतली.

इकडे C.T. Scan चे रिपोर्टस् पाहून डॉक्टर अभिजीत आईंशी बोलायला आले.
तोपर्यंत सावित्रीबाईंनी शलाकाच्या वडीलांना फोन करुन कळवले होते. आणि ते लगेच पुण्याहून यायला निघाले होते.
"काकू, मी सगळे रिपोर्टस् पाहिले, गाडीने डाव्या बाजूने ठोकर मारल्यामुळे शलाकाला मुका मारच जास्त लागला आहे. आणि ब-याच ठिकाणी रक्त आले आहे पण त्या दुखापती फारशा गंभीर नाहियेत.
फक्त डोक्याला झालेली दुखापत मला गंभीर वाटत होती म्हणून मी C.T. Scan केले होते.
पण ते रिपोर्टस् देखील एकदम Normal आहेत. मला अजूनही कळत नाहिये की, ती कोमात का गेली आहे"
"काय कोमात?" आई एकदम घाबरुन उद्गारल्या.
"होय कोमात. शलाकाला आदित्यच्या जाण्याचा एकदम मानसिक धक्का बसला आहे, त्यामुळे..."
डॉक्टर अभिजीत यांचे बोलणे आई तोडत मधेच म्हणाल्या.

"पण आदि जिवंत आहे अभिजीत, आत्ताच त्याचा फोन आला होता मला.तो इथेच येतोय"
"मग तर खूप चांगलं झालं. आता आदित्य आल्यावर शलाकाला आपण कोमातून बाहेर आणायचा प्रयत्न करु
आदि आल्यावर डॉ. अभिजीत त्याला म्हणाले - "शलाकाचे सर्व रिपोर्टस् एकदम Normal आहेत. पण शलाका आत्ता कोमात आहे. तिचे डोळे उघडे आहेत, पण त्यांत संवेदना नाहियै आदि."
तू येतोय ही बातमीदेखीला आईंनी शलाकाला सांगितली तरी तिची पापणीदेखील हलली नाही.
आदित्य म्हणाला- "काका मला आधी शलाकाला पहायचंय"

**— शेवट —**
डॉक्टर त्याला घेऊन शलाकाच्या रुमपाशी आले.
आदित्यला पाहताच आई त्याला बिलगून एकदम स्फुंदून रडायला लागली.
"आदी असं कसं रे झालं हे?" आदिच्या डोळ्यांतून पण अश्रू वहात होते.
पण लवकरच त्याने स्वत:ला आणि आईलादेखील सावरले. आदित्य शलाकापाशी बसला.
तिला हाक मारली."शलाका.....अगं ऐकलस का?"
अगं.... तुझा आदी आलाय...बघ ना माझ्याकडे....
तरीही शलाकाचा प्रतिसाद आला नाही. आदित्यचा कंठ दाटून आला.
तो तिचा हात हातात घेऊन रडू लागला.
एवढा वेळ आवरलेले अश्रू आता अविरत वहात होते.
तेवढ्यात शलाकाचा हात थरथरु लागल्याची जाणीव त्याला झाली. दुसरा हात तिने आदिच्या डोक्यावर ठेवला.
आदिने पाहिले तर शलाका त्याच्याकडे बघून मंदपणे हसण्याचा प्रयत्न करत होती.
डॉक्टर अभिजीत एकदम आनंदाने म्हणाले की "अरे वा....अभिनंदन आदित्य, शलाका कोमातून बाहेर आली. तुझ्या स्पर्शानेच तिला कळाले की तू आला आहेस म्हणून.खरंच स्पर्शात खूप शक्ती असते. कधी कधी आपल्याला बाह्य गोष्टी दिसत नाहित पण स्पर्शाची भाषा मात्र नक्की कळते." यावर शलाकाने हलकेच स्मित केले.
जणू आदिच्या स्पर्शानेच तिला पुनर्जीवन मिळाले होते
तेवढ्यात पुन्हा डॉक्टरांचा आवाज ऐकू आला.
आणि बरं का? या सगळ्या गोंधळात मी एक गोष्ट तुम्हाला सांगायची विसरलो होतो. ती आता सांगतो.
एक गोड मुलगी आई होणार आहे बरं.
"काय?" आ वासून आदित्य आणि आई डॉक्टरांकडे पाहू लागली.
हे खरं होतं की आईला आणि शलाकाला देखील लहान मुले खूप आवडत असल्याने पहिल्या बाळाच्या बाबतीत प्लॅनिंगच्या भानगडीत पडायचे नाही असे आदी आणि शलाकाने ठरवले होते. पण लगेच देव आपल्या पदरी हे दान देईल असे दोघांनाही अपेक्षित नव्हते.
आई लगेच म्हणाली - "बघ हो आदि, मुलाचा पायगुण चांगला आहे. बेट्याने जन्माला येण्याआधीच आपल्या आईला वाचवले."
आईचे हे बोल ऐकताच शलाका आणि आदिच्या ओठांवर हसू उमटले.

लवकरच सकाळपर्यंत शलाकाचे आई-वडील तिच्या आत्याला घेऊन आले.
तेथे येताच त्यांना नातू होणार असल्याची बातमी मिळाली.
दामोदरपंत सावित्रीबाईंना म्हणाले - "अहो केवढे घाबरवून टाकले तुम्ही आम्हाला? आणि येथे बघतो तर काय?
आनंदी आनंद गडे जिकडे तिकडे चोहीकडे"

दामोदरपंतांची ही अस्सल पुणेरी फोडणी ऐकून सगळेच जण हसू लागले...

**• • • समाप्त • • •**

**- सागर भंडारे**

(२००६) सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित आहेत.ही कथा तुम्ही तुमच्या संगणकावर उतरवून घेऊन शकता, साठवून ठेवू शकता अथवा तुमच्या मित्र मैत्रिणींना पाठवू शकता. पण या कथेतील कोणताही भाग किंवा कोणतीही कल्पना कोणत्याही व्यावसायिक कारणासाठी वापरण्यासाठी लेखकाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे)